CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, २२ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३२३ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



परंपरागत गोष्टीनुसार आपल्या लोकशाहीचा विकास करणे आमचे कर्तव्य होते. लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया आवश्यक आहे; पण निवडणूक प्रक्रिया म्हणजे लोकशाही नव्हे, तो लोकशाहीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे. लोकशाही तर निवडणूक प्रक्रियेनंतरच सुरू होते.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# ‘अदानी’ची महागुंतवणूक

## महाराष्ट्रात ६६ अब्ज डॉलर्सचे प्रकल्प

### दीर्घकालीन भागीदारीची योजना

### विमान वाहतूक, स्वच्छ ऊर्जा, शहरी पायाभूत सुविधा उभारणार

◆ **दावोस, २१ जानेवारी**

अदानी समूहाने बुधवारी महाराष्ट्रासाठी ६६ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची योजना आखली आहे. यात विमान वाहतूक, स्वच्छ ऊर्जा, शहरी पायाभूत सुविधा, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि प्रगत उत्पादन क्षेत्रांचा समावेश आहे. या माध्यमातून अदानी समूहाने राज्याच्या पायाभूत सुविधा-आधारित विकास कार्यक्रमात दीर्घकालीन भागीदार म्हणून स्वतःला सादर केले आहे.



हे पोर्टफोलिओ ऊर्जा संक्रमण, व्यवसाय सुलभता आणि उत्पादन क्षेत्रातील आत्मनिर्भरता यासारख्या भारताच्या प्राधान्यक्रमांशी संरेखित असलेल्या एकात्मिक आणि भविष्यासाठी सज्ज मंच तयार करण्याच्या दिशेने झालेल्या बदलाचे प्रतिबिंब आहे, असे समूहाने दावोस येथील ५६ व्या जागतिक आर्थिक मंचच्या (डब्ल्यूईएफ) वार्षिक बैठकीत आपल्या योजना सादर करताना सांगितले.

महाराष्ट्रामध्ये प्रस्तावित गुंतवणूक मोठ्या प्रमाणावरील शहरी परिवर्तन आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा प्रकल्पांवर आधारित आहे. यामध्ये धारावीच्या पुनर्विकासाचा समावेश आहे. हा भारतातील सर्वांत गुंतागुंतीच्या शहरी नूतनीकरण प्रकल्पांपैकी एक आहे,ज्याचा उद्देश आशियातील सर्वांत मोठ्या अनौपचारिक वस्तीचे रूपांतर एका नियोजित आणि आर्थिकदृष्ट्या चैतन्यशील जिल्ह्यात करणे आहे.

हा समूह मुंबईच्या विकास योजनांवर भर देत आहे. नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी केली जात आहे. हे विमानतळ भारतातील सर्वांत मोठ्या ग्रीनफिल्ड विमानतळांपैकी एक असून, त्याचे काम २५ डिसेंबर रोजी सुरू झाले आहे. या विमानतळामुळे मुंबई महानगर क्षेत्राची विमान वाहतूक क्षमता वाढण्याची अपेक्षा आहे तसेच यामुळे लॉजिस्टिक्स, आदरातिथ्य आणि व्यावसायिक विकासाला चालना मिळेल. ◀(वृत्तसंस्था)



**अदानी समूह असो अथवा इतर कुणीही, महाराष्ट्रात गुंतवणूक करणाऱ्या कोणत्याही गुंतवणूकदाराचे स्वागत करू. कारण, गुंतवणुकीशिवाय आपल्या तरुणांसाठी रोजगार निर्माण होणार नाही.**

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

### सेमीकंडक्टर प्रकल्पाचाही समावेश

**अतिरिक्त प्रकल्पांमध्ये एकूण तीन हजार मेगावॅट क्षमतेचे हरित, एकात्मिक डेटा सेंटर पार्क, विमानतळाजवळ एकात्मिक एरिना जिल्हा, कोळसा वायूकरण सुविधा, एकूण ८७०० मेगावॅटचे पम्प-स्टोरेज जलविद्युत प्रकल्प आणि खाजगी सहभागासाठी विकसित होत असलेल्या आराखड्यानुसार प्रस्तावित सेमीकंडक्टर आणि डिस्प्ले फॅब्रिकेशन युनिट्सचा समावेश आहे.** ■

### नियोजित गुंतवणूक पुढील १० वर्षांत

**गुंतवणुकीचा आवाका आणि क्षेत्रांतील विस्ताराची माहिती अदानी एंटरप्रायजेसचे संचालक प्रणव अदानी यांनी दिली. ही नियोजित गुंतवणूक पुढील सात ते दहा वर्षांत केली जाईल, असे त्यांनी नमूद केले.** ■




**नागपूर : भारताने पहिल्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडचा ४८ धावांनी पराभव करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. बुधवारी नागपूरमध्ये प्रथम फलंदाजी करताना भारताने २३८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, किवी संघाला फक्त १९० धावा करता आल्या. अभिषेक शर्माने तुफानी खेळी करत ८४ धावा केल्या.**

## महत्त्वाचे

### भूराजकीय तणावामुळे सेन्सेक्स ८२ हजारांखाली

**मुंबई** : वाढलेला भूराजकीय तणाव, जागतिक बाजारांमधील घसरण आणि सातत्याने बाहेर जाणारी विदेशी गुंतवणुकीमुळे बुधवारी सलग तिसऱ्या सत्रांत शेअर बाजारांत घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक घसरून ८२ हजारांखाली आला. या व्यतिरिक्त रुपयाची घसरण, वित्तीय, बँकिंग आणि उपभोगाच्या वस्तूच्या समभागांत झालेल्या विक्रीचा दबावही बाजारावर पडला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशाक २७० अंकांनी घसरून ८१,९०९ या पातळीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ७५ अंकांनी घसरून २५,१५७ या पातळीवर बंद झाला. आजच्या सत्रात आयसीआयसीआय बँक, ट्रेंट, भारत इलेक्ट्रॉनिक्स, ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक, एल ॲण्ड टी, भारतीय स्टेट बँक आणि मारुतीला सर्वाधिक फटका बसला. दुसरीकडे, इटरनल, अल्ट्राटेक सिमेंट, इंटर ग्लोब एव्हिएशन आणि रिलायन्स इंडस्ट्रीला सर्वाधिक फायदा झाला. ■

### महंत नृत्य गोपाल दास रुग्णालयात

**अयोध्या** : श्रीराम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांची प्रकृती खालावल्याने त्यांना लखनौतील मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली. महंत नृत्य गोपाल दास यांनी मागील ३६ तासांपासून अन्न ग्रहण केलेले नाही. त्यांना सतत उलट्या आणि जुलाबाचा त्रास होत आहे, असे त्यांचे वैयक्तिक डॉक्टर एस. के. पाठक यांनी सांगितले. महंत नृत्य गोपाल दास यांची प्रकृती खालावल्याने डॉक्टरांनी त्यांना लखनौ येथील मेदांता रुग्णालयात पाठवले, अशी माहिती त्यांचे निकटवर्तीय महंत कमल नयन दास यांनी दिली. मेदांता रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टांच्या पथकाने त्यांच्या तपासणी करून उपचारसुरू केले. त्यांना सध्या वैद्यकीय निगराणीत ठेवणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. महंत नृत्य गोपालदास यांची प्रकृती खालावल्याची माहिती मिळाल्यानंतर संत समाज आणि भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. ■

### कल्याण-डोंबिवलीत मनसेचा उबाठा, भाजपाला धक्का

**कल्याण** : नुकत्याचा झालेल्या कल्याणडोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. शिवसेनेला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी सत्तेपासून हा पक्ष दूरच आहे. बहुमतासाठी ६२ आकडा गाठणे आवश्यक आहे. महायुतीकडे पुरेसे संख्याबळ असताना शिवसेनेने मनसेला सोबत घेत आणि उबाठाचे काही नगरसेवक फोडत सत्ता मिळविण्याचा निर्णय घेतला आहे. मनपा निवडणुकीत शिवसेनेचे ५३, भाजपाचे ५०, उबाठाचे ११ तर मनसेचे ५ नगरसेवक निवडून आले आहेत. ठाकरे गट कोकण विभागीय आयुक्तांकडे गटाची नोंदणी करण्यासाठी जात असताना चार नगरसेवक गायब झाले होते. यापैकी मधूर म्हात्रे आणि किर्ती ढोणे हे दोघे आधीच गायब होते. उबाठाच्या चारही नगरसेवकांना शिवसेनेने गळाला लावल्याची चर्चा आहे. दरम्यान, कल्याणमधील मनसेचे नेते राजू पाटील आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्यात चर्चा होऊन मनसेने शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. मनपा निवडणुकीत दोन्ही ठाकरे बंधू एकत्र लढले असताना निकालानंतर मनसेने शिवसेनेला पाठिंबा दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेनेने ही खेळी खेळली आहे.

# जि.प.च्या ६८ जागांसाठी ७५६ तर पं.स.साठी १३७१ उमेदवारी अर्ज

### २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली असून, पुणे जिल्ह्यासह १२ जिल्ह्यांतील जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ही निवडणूक जाहीर झाली आहे. नगरपालिका, सोलापूर महापालिका निवडणुकीनंतर आता सोलापूर जिल्हा परिषदेचीही निवडणूक लागली असून, यामध्ये ६८ जागांसाठी (गटासाठी) चुरशीचे मतदान होणार आहे.

दरम्यान, या निवडणुकीसाठी जिल्हा परिषदेसाठी आज अर्ज दाखल करायच्या शेवटच्या दिवशीपर्यंत जिल्हा परिषदेसाठी ७५६ अर्ज तर पंचायत समितीच्या १३६ जागांसाठी १३७१ अर्ज दाखल झाले आहेत. तर २७ जानेवारीपर्यंत अर्ज माघारी घेता येणार असून, यानंतरच निवडणूक लढविणारे अंतिम उमेदवार कळणार आहेत.

शेवटचा अर्ज भरायचा दिवस असल्याने या दिवशी सर्वच तालुका कार्यालयात अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. सोलापूर महापालिका निवडणुकीनंतर आता ग्रामीण भागाचे राजकारण चांगलेच तापणार आहे. दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसीसाठी राखीव आहे.

**तालुकानिहाय दाखल अर्ज**

| तालुका | जि.प. | पं.स. |
|---|---|---|
| करमाळा | ८४ | २२४ |
| माढा | ७७ | १६९ |
| बार्शी | ६० | ११० |
| उ. सोलापूर | ३४ | ६० |
| मोहोळ | ९० | १०१ |
| पंढरपूर | १६२ | २७२ |
| माळशिरस | ९४ | १५४ |
| सांगोला | १४१ | १९७ |
| मंगळवेढा | ६२ | १२० |
| द. सोलापूर | ७३ | १४५ |
| अक्कलकोट | ६८ | १०७ |

या निवडणुकीसाठी गेल्या २ महिन्यापासून काही राजकीय मल्ल लंगोट लावून बसले असून, त्यांच्या गटातील मतदारसंघात त्यांच्या २-२ राऊंडही झाल्या आहेत. दरम्यान, ही निवडणूक भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेतच रंगणार असल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक पक्षाच्या नेत्यांनी आपापल्या उमेदवारांना एबी फॉर्म दिले आहेत. भाजपाकडून एकेका जागेसाठी १५ ते २० उमेदवार इच्छुक असल्याने एबी फॉर्म अवघ्या १ तासाच्या फरकाने संबंधित कर्मचाऱ्यांकडे देण्यात आल्याचे समजते. तर हे एबी फॉर्म एका बंद लखोट्यातून दिले असल्याने अधिकृत उमेदवारांची त्यावर नावे आहेत. यामुळे अधिकृत उमेदवार कोण? याबाबत बराच काळ दक्षिण सोलापूर तहसील कार्यालयासमोर उलट-सुलट चर्चा सुरू होती.

जिल्ह्यात १२ नगरपालिकांची नुकतीच निवडणूक पार पडली आहे. यामध्ये भाजपाच्या जागा वाढल्यानंतर महापालिकेतही भाजपाला बहुमत (८७ जागा) मिळाले आहे. त्यातच अवघ्या राज्याचं लक्ष लागलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. त्यानुसार, राज्यातील १२ जिल्ह्यात निवडणुकांचा धुरळा उडणार असून, १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी मतदान प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार, राज्यात ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, रोजी ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता निकाल जाहीर होणार आहे. **(उर्वरित पान ३ वर)**

# बांगलादेशला भारतातच खेळावे लागेल

## नकार दिल्यास स्कॉटलंडला खेळविणार, आयसीसीने फटकारले

◆ **दुबई, २१ जानेवारी**

टी-२० विश्वचषकातील सर्व सामने बांगलादेशला भारतातच खेळावे लागणार आहेत. खेळायचे की नाही, याचा निर्णय २२ तारखेला घ्यावा. नकार दिल्यास स्कॉटलंड संघाला खेळविण्यात येईल, असा इशारा आयसीसीने बुधवारी बांगलादेश संघाला दिला.

International Cricket Council

बुधवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बांगलादेश क्रिकेट मंडळ आणि अन्य सदस्य देशांसोबत या मुद्यावर चर्चा केली. एकूण १६ सदस्य बैठकीत सहभागी झाले. यावेळी झालेल्या मतदानात १४ देशांनी बांगलादेशच्या विरोधात मतदान केले. केवळ पाकिस्ताननेच ‘बीसीबी’ला पाठिंबा दिला.

बांगलादेशचे खेळाडू, माध्यम प्रतिनिधी, अधिकारी आणि चाहत्यांना भारतात कोणताही धोका नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सामन्यांचे स्थळ बदलण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. भारतात खेळावयाचे की नाही यावर निर्णय घेण्यासाठी बांगलादेशला एक दिवस म्हणजे गुरूवारपर्यंत वेळ देण्यात आला आहे. होकार दिल्यास सर्वकाही सुरळीत होईल पण बांगलादेशने प्रतिष्ठेचा मुद्दा निर्माण केल्यास आणि खेळण्यास नकार दिल्यास पात्रता स्पर्धेत तिसऱ्या स्थानावर असलेल्या स्कॉटलँडला खेळण्याची संधी मिळेल. स्कॉटलँडचा ‘क’कटात समावेश केला जाणार आहे. सात फेब्रुवारीपासून टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ होणार आहे.

**स्थळ बदलण्यासही नकार**

सुरक्षेचे कारण देत बांगलादेश क्रिकेट बोर्डाने त्यांचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळविण्यात यावे, अशी मागणी आयसीसीकडे केली होती. परंतु, प्रसारणाचे हक्क, सुरक्षा व्यवस्था, खेळाडूंची राहण्याची व्यवस्था, प्रवास आदी बाबी आधीच निश्चित झाल्या आहेत. त्यामुळे ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच स्पर्धा होईल, असे आयसीसीने स्पष्ट केले आहे.


**पाकिस्तान पडला तोंडघशी**

बांगलादेश खेळणार नसेल तर आम्हीही स्पर्धेत खेळणार नाही, अशी भूमिका पाकिस्ताननेही घेतली. तसेच बांगलादेशच्या बाजूने मतदानही केले. आयसीसीच्या निर्णयाने बांगलादेशबरोबर पाकिस्तानही तोंडघशी पडला आहे. ◀(वृत्तसंस्था)

### मुस्तफिजूरला आयपीएलमधून वगळल्याने वाद



बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांच्या घटनांमुळे भारतीय क्रिकेट मंडळाच्या निर्देशानुसार कोलकाता संघाने मुस्तफिजूर रहमानला संघातून वगळले. या घटनेला बांगलादेशने राष्ट्रीय आत्मसमानाचा मुद्दा बनवत भारतात खेळण्यास नकार दिला. ■




# श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्यानिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई

**पंढरपूर** : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्या निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, श्री संत तुकाराम भवन तसेच श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे आकर्षक व भव्य विद्युत रोषणाई करण्यात आली आहे, अशी माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. श्री विठ्ठलांच्या गाभाऱ्यावरील कळसास विशेष विद्युत रोषणाई करण्यात आल्यामुळे भाविक कळस दर्शनासह रोषणाईचा आनंद घेत आहेत. संपूर्ण मंदिर परिसर प्रकाशमय झाले आहे.

### शिवसेना वादावर शुक्रवारी सुनावणी

◆ **नवी दिल्ली, २१ जानेवारी**

तीन वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित असलेला शिवसेना नाव आणि चिन्ह यावरील खटला पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी याप्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली आणि शुक्रवारी खटल्यावर अंतिम सुनावणी घेण्याचे निश्चित केले.

शिवसेनेच्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी बुधवारी अंतिम सुनावणी घेण्याचे निश्चित केले होते. मात्र, व्यस्त वेळापत्रकामुळे केंद्र सरकारची बाजू मांडणारे महान्यायाअभिकर्ता यांनी आजची सुनावणी रद्द करण्याची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करीत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी शुक्रवारी सुनावणी घेण्याचे निश्चित केले.अंतिम सुनावणी पुढे ढकलल्याने उद्धव ठाकरे यांना पुन्हा झटका बसला आहे. अंतिम सुनावणीनंतर न्यायासन या खटल्यावर निकाल देणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# अटल पेन्शन योजनेला २०३१ पर्यंत मुदतवाढ

### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

◆ **नवी दिल्ली, २१ जानेवारी**

केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी झालेल्या बैठकीत सरकारची महत्त्वाकांक्षी अटल पेन्शन योजना आर्थिक वर्ष २०३०-३१ पर्यंत सुरू ठेवण्यास मंजुरी दिली तसेच प्रचारात्मक आणि विकासात्मक उपक्रमांसाठी निधी सहाय्य तसेच तूट भरून काढण्यासाठी निधी विस्तारालाही मान्यता दिली.

असंघटित क्षेत्रातील कामगारांना वृद्धापकाळात उत्पन्नाची सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने ९ मे २०१५ रोजी अटल पेन्शन योजना सुरू करण्यात आली. १९ जानेवारी २०२६ पर्यंत एपीवायअंतर्गथ ८.६६ कोटींपेक्षा जास्त सदस्य नोंदणीकृत झाले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या अधिकृत निवेदनानुसार, असंघटित कामगारांमध्ये जनजागृती आणि क्षमता बांधणीसह पोहोच वाढवण्यासाठी प्रोत्साहनपर आणि विकासात्मक उपक्रमांना सरकारी पाठिंब्यासह ही योजना २०१९-३०पर्यंत सुरू राहील. एपीवाय योजनेत योगदानाच्या आधारावर ६० वर्षे वयापासून दरमहा एक हजार ते पाच हजार रुपयांपर्यंत किमान पेन्शनची हमी दिली जाते.

**सिडबीला पाच हजार कोटींची भांडवली मदत**

एमएसएमई उद्योगांना कर्जाचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी केंद्र सरकारने बुधवारी भारतीय लघू उद्योग विकास बँकेला (सिडबी) पाच हजार कोटी रुपयांची भांडवली मदत देण्यास मंजुरी दिली. हा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मागील आर्थिक वर्षाच्या ३१ मार्च रोजीच्या बुक व्हॅल्यूनुसार प्रत्येकी हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल, असे निवेदनात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### दीपेंद्र गोयल इटरनल समूहाच्या सीईओ पदावरून पायउतार

**नवी दिल्ली** : दीपेंद्र गोयल समूहाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालकपदावरून पायउतार होतील आणि ब्लिंकिटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अलबिंदर धिंडसा १ फेब्रुवारीपासून समूहाचे सीईओ म्हणून त्यांची जागा घेतील, अशी माहिती इटरनलने बुधवारी दिली. ■

# शत्रूला काही तासांतच गारद करण्याची क्षमता

### ● हवाई दल प्रमुखांचा पाकिस्तानला इशारा ● युद्ध झाल्यास निर्णायक निकाल भारताच्या बाजूने लागणार

◆ **नवी दिल्ली, २१ जानेवारी**

भारतील वायुदलात शत्रूला काही तासांतच गुडघे टेकवण्याची क्षमता आहे. शत्रूची अनेक लक्ष्य आमच्या रडावर असून, ती नष्ट करण्यासाठी आम्हाला काही तासाचीच आवश्यकता भासणार आहे. भविष्यात युद्ध झाल्यास त्याचा निर्णायक निकाल लागेल आणि तो भारताच्या बाजूने राहील असा इशारा भारतीय वायू दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए.पी. सिंग यांनी पाकिस्तानला दिला.



२२ व्या सुब्रतो मुखर्जी कार्यशाळेला बुधवारी संबोधित करताना, वायू दल प्रमुखांनी अलिकडच्या जागतिक आणि देशांतर्गत संघर्षांचा उल्लेख केला आणि धोरणात्मक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हवाई शक्ती सर्वात प्रभावी शस्त्र म्हणून कशी उदयास आली यावर प्रकाश टाकला.

प्रत्येक देशाकडे सक्षम सेना असणे आवश्यक आहे. ती नसेल तर कोणीही हल्ला करू शकतो. व्हेनेझुएला आणि इराक ही त्याची अलीकडची उदाहरणे आहेत. सैन्यशक्तीचा वापर करण्याची इच्छाशक्ती तितकीच महत्त्वाची आहे. इच्छाशक्ती नसेल तर संयम दाखवला तरी तो दुर्बलता समजली जाते. मात्र, जेव्हा तुम्ही बलवान असता आणि तरीही संयम बाळगता, तेव्हा तो सामर्थ्याचा संकेत ठरते, असे त्यांनी नमूद केले. ◀(वृत्तसंस्था)

### हवाई शक्ती सर्वांत प्रभावी

जगभरात आणि भारतात जे घडत आहे ते पाहता, हवाई शक्ती सर्वात प्रभावी आहे. अचूक लक्ष्य आणि आवश्यक परिणामासाठी वायुदलाची उपयुक्तता सरस ठरत आहे. मानवी मदतीपासून ते लढाऊ कारवायांपर्यंत, प्रत्येक आघाडीवर वायू दलाने आपली क्षमता सिद्ध केली आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये दहशतवादी अड्ड्यांचा झालेला विध्वंस याचे उदाहरण आहे, असे ते म्हणाले. ■

### भविष्यातील आव्हानांसाठी गुंतवणूक आवश्यक

भारताला जगातील शक्तीशाली राष्ट्र बनवायचे असेल, तर वायुदलाची क्षमता वाढविण्यावर लक्ष केंद्रीत करावे लागेल. भविष्यातील आव्हानांवर मात करण्यासाठी संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करणे महत्त्वाचे असेल. एखाद्या देशाची सार्वभौमता जपण्यासाठी केवळ आर्थिक बळ पुरेसे नसते. सैन्यशक्ती हेच राष्ट्रीय शक्तीचे अंतिम मोजमाप आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असतानाही देश सुरक्षित राहीलच असे नाही. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



**गणेश जयंती तयारी :** गणेश जयंतीनिमित्त विविध गणेश मंडळांनी जय्यत तयारी केली आहे.गुरुवारी मानाचा कसबा गणपती मंडळांने भाविकांसाठी महाप्रसाद व दर्शनासाठी वीस बाय दीडशे मीटरचा शामियाना उभा केला आहे.





### भारती विद्यापीठ बाल विकास मंदिर विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**


भारती विद्यापीठ बाल विकास मंदिर विभागाचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भारती विद्यापीठ माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य पवार, ग.सा. पवार प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका गोळे हे उपस्थित होते. तसेच भारती विद्यापीठ बाल विकास मंदिरच्या मुख्याध्यापिका वैशाली मोहोळे, ज्येष्ठ शिक्षिका शिंदे, पत्रकार गवळी उपस्थित होते. पालक वर्ग उत्साहाने मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगरावजी कदम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच सरस्वतीचे पूजन व स्टेजची पूजाही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. बाल विकास मंदिरच्या शिक्षिकांनी भारती विद्यापीठ गीत व स्वागत गीत सादर केले. बाल विकासच्या मुख्याध्यापिका वैशाली मोहोळे यांनी प्रास्ताविक केले. अहवाल वाचन शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन तोटद यांनी केले. विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. रंगीबेरंगी विविध वेशभूषेत मुलांचा थाट काही औरच होता. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची गाणी कोळीगीत, शेतकरी गीत, बालगीते, तसेच ऐतिहासिक घटनांवर आधारित कार्यक्रम सादर केले. बालविकासच्या मुख्याध्यापिका वैशाली मोहोळे यांनी सर्व बालचमुनचे कौतुक केले.

# विमानसेवेचं मिटलं... आता 'आयटी पार्क'ची उत्कंठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

गेल्या काही महिन्यांपासून मुंबई, गोवा विमानसेवा चालू झाल्यावर आता इंदोरचीही हवाई वाहतूक सुरू झाली आहे. दरम्यान, यापूर्वी शहराच्या दाही दिशांना महामार्ग, हायटेक रेल्वेसेवा झाली असून, आता सोलापूरकरांना आयटी पार्कबाबतची तीव्र उत्कंठा लागली आहे.

थेट मुख्यमंत्र्यांची आयटी पार्कचे मनावर घेतल्याने यास आता विलंब लागणार नाही आणि आयटी पार्क सोलापुरात आल्यावर सोलापूर थांबणारही नाही. जलसंपदा विभागाच्या ५० एकर जमिनीच्या हस्तांतरणासाठी प्रयत्न सुरू आहेत, ज्यासाठी उद्योग विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे, तसेच रोबोटिक्स कंपनी येणार असून, मुख्यमंत्री लवकरच या प्रकल्पांना अंतिम रूप देणार आहेत, ज्यामुळे सोलापूरच्या आयटी क्षेत्राला आता लवकरच चालना मिळणार आहे. सोलापूरमध्ये पुणे आणि बंगळुरूप्रमाणे एक मोठे आयटी पार्क उभारले जाणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकल्पासाठी पुढाकार घेत असल्याने सोलापूरकरांच्या अपेक्षा पल्लवित झाल्या आहेत. आजवर येथील उच्चशिक्षित




मुलांना पुणे, मुंबई, बेंगलोर, हैदराबाद आदी ठिकाणी नोकरीसाठी जावे लागत असे. आता आपल्याच शहरात आयटी पार्क उभारणी होत असल्याने अनेक उच्चशिक्षित युवकांना शिक्षण होताच आपल्याच शहरात नोकरी मिळणार आहे. यामुळे भविष्यातील स्थलांतराचा लोंढा तरी थांबणार आहे. शहराचा व्यासही वाढून आर्थिक उलाढालही वाढणार आहे.

आयटी पार्कमुळे सोलापूरमध्ये रोजगाराच्या संधी वाढतील अशी अपेक्षा आहे आणि लवकरच या प्रकल्पांना अंतिम रूप दिले जाईल अशी माहिती नुकतीच जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आली. इतकेच नाहीतर या आयटी पार्कसाठी राज्याच्या उच्चस्तरीय समितीचीही मान्यता मिळाल्याने आता सोलापूरकरांचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. सोलापुरातून गोवा, मुंबईपाठोपाठ लवकरच इंदोरला विमानसेवा सुरू होत आहे. इतकेच नाहीतर तिरूपती, बेंगलोरलाही हवाई सेवा सुरू होणार असल्याने या आयटी पार्कसाठी नव्याने अजून उद्योजक मिळणार आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे सोलापूर आयटी पार्कचा प्रकल्प वेगाने पुढे सरकत असून, जमिनीची उपलब्धता आणि कंपन्यांना आकर्षित करण्यावर भर दिला जात आहे, ज्यामुळे सोलापूरचे आयटी हब म्हणून रूपांतर होण्याची शक्यता आहे.

# सोलापूर विमानतळावरून इंदौरसाठी हवाईसेवा सुरू

- २:५० ला उडाण अन् ५:५० इंदौरमध्ये पोहोचणार
- उद्योजकांतून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूर ते इंदौर अशा नवीन विमानसेवेचा सोलापुरातून आजपासून शुभारंभ झाला आहे. यामुळे या दोन शहरांमधील प्रवास आता केवळ ३ तासांत पूर्ण होईल. यामुळे उद्योजक आणि स्थानिक नेतेमंडळी अन् नागरिकांतून समाधानाचे वातावरण पसरले आहे.

सोलापूर-गोवा, सोलापूर-मुंबई विमानसेवेला चांगला प्रतिसाद मिळत असतानाच सोलापूरकरांसाठी आणखी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. सोलापूर-इंदौर विमानसेवेची अधिकृत सुरुवात झाली. स्टार एअर या विमान कंपनीकडून ही सेवा सुरू करण्यात आली असून, त्यामुळे सोलापूर आता देशातील आणखी एका महत्त्वाच्या शहराशी हवाई मार्गाने जोडला जाणार आहे. याचा फायदा नव्याने सोलापुरात होणाऱ्या आयटी पार्कसाठी होणार आहे. या विमानसेवेमुळे नव्याने अनेक उद्योजक सोलापुरात येण्याची शक्यता जाणकार नागरिकांतून व्यक्त होत आहे. सोलापूरकरांना तिरूपती हवाईसेवेची प्रतिक्षा लागली आहे.




**अशी राहणार हवाईसेवा**

सोलापूर-मुंबई ही विमानसेवा आता इंदौरपर्यंत वाढवण्यात आली आहे. सोलापूरहून विमान दु. २.५० वाजता उड्डाण करेल आणि ३.५५ वाजता मुंबईला पोहोचेल. मुंबईत सुमारे ४५ मिनिटांचा थांबा घेतल्यानंतर विमान सायंकाळी ४.३५ वाजता इंदूरकडे रवाना होईल. हे विमान सायंकाळी ५.५० वाजता इंदूर विमानतळावर पोहोचेल, अशी माहिती देण्यात आली आहे.



**नव्या कारभाऱ्यांसाठी सभागृह सज्ज!**
**सोलापूर : महापालिकेचा कारभार ज्या सभागृहातून चालतो ते कै. यशवंतराव चव्हाण सभागृह सज्ज झाले आहे....**

# पूंछच्या सिमावर्ती भागात १०५ फुट तिरंगा ध्वज लहरणार

**श्रीपूरच्या प्रवर्तन फाऊंडेशनच्या संकल्पनेला मूर्त रूप; रश्मी बागल यांचे अर्थसहाय्य**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२० जानेवारी-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील प्रवर्तन फाऊंडेशनच्या माध्यमातून येत्या २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत काश्मिर मधील पुंछ भागाच्या सिमावर्ती भागात म्हणजेच भारत-पाकिस्तान सिमेलगत भव्य १०५ फूट उंचीचा तिरंगा ध्वज लहरणार असल्याची माहिती प्रवर्तन फाऊंडेशनचे अध्यक्ष निनाद पटवर्धन यांनी दिली.

याप्रसंगी फाऊंडेशनचे क्रियाशील सदस्य बांधकाम व्यावसायिक चंद्रशेखर मोकाशी, शाम मांगले, श्रीपाद कुलकर्णी, मोहन कवडे, अकलुज येथील सचिन शिंदे उपस्थित होते. अधिक माहिती देताना पटवर्धन म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून आम्ही प्रवर्तन फाऊंडेशनच्या माध्यमातून कश्मिर मध्ये सामाजिक उपक्रम राबवत आहोत. आजपर्यंत कश्मिर मधील दुर्गम भागातील महिलांना गृह उद्योगाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती उपलब्ध करून दिली आहे. तर विद्यार्थ्यांसाठी क्रिडा स्पर्धा, स्वयंरोजगार निर्मितीचे प्रशिक्षण असे उपक्रम राबविले आहेत . याबरोबरच पुण्याच्या भाजपाच्या विद्यमान खा. माधुरीताई कुलकर्णी यांनीही आम्ही दुर्गम भागात रुग्णांना दवाखान्या जाण्यासाठी यातना होतात ही बाब सांगताच त्यांनी सुसज्ज असणारी रुग्णवाहीका उपलब्ध करून दिली आहे. कश्मिरमध्ये



काम करत असताना अनेक दिवसांपासूनची आमची इच्छा होती भारत-पाक सीमेलगत भारताचा ध्वज उभारावा आम्ही ही कल्पना लष्करी अधिकाऱ्यांच्या कानावर घातल्यावर त्यांनी तातडीने होकार दर्शवला परंतू १०५ फूट उंचीचा ध्वज उभारणे म्हणजे अर्थकारणही महत्वाचे होते. परंतू करमाळा तालुक्याच्या माजी आ. रश्मीताई बागल यांच्या भेटी दरम्यान हा विषय निघाला असता रश्मीताईंनी क्षणाचाही विलंब न लागता ध्वज उभारणीसाठी येणारा सर्व खर्च देण्याचे जाहीर करून निधीही उपलब्ध करून दिला.

# पराभूत उमेदवारांनी 'शॅडो नगरसेवक' म्हणून काम करावे : खा. प्रणिती शिंदे

**प्रभारी मोहन जोशी यांच्या उपस्थितीत काँग्रेसचे पराभूत उमेदवार, कार्यकर्त्यांची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

पराभवाने खचून न जाता नव्या जिद्दीने संघटन मजबूत करावे. जनसामान्यांचा आवाज बनून रस्त्यावरचा संघर्ष वाढवा, नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा द्या. काँग्रेस ही तत्त्वांची लढाई लढणारी पार्टी आहे. लढून हरलो तरी तो पराभव सन्मानाचा आहे, पराभूत उमेदवारांनी 'शॅडो नगरसेवक' म्हणून काम करत नागरिकांच्या समस्या मांडाव्यात, लोकांशी संपर्क कायम ठेवावा आणि पुढील निवडणुकांसाठी संघटनात्मक ताकद वाढवावी, असे आवाहन खा. प्रणिती शिंदे यांनी केले.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाच्या उमेदवार व कार्यकर्त्यांची आढावा बैठक खासदार प्रणिती शिंदे आणि शहर जिल्हा काँग्रेसचे प्रभारी मोहन जोशी यांच्या उपस्थितीत पार पडली. शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. यावेळी खा. शिंदे पुढे म्हणाल्या, पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्यांना थारा दिला जाणार नाही, असे स्पष्ट करत लवकरच सल्लागार समिती स्थापन केली जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.



या बैठकीस नगरसेवक नरसिंह आसादे, माजी महापौर संजय हेमगड्डी, अरिफ शेख, माजी नगरसेवक रियाज हुंडेकरी, प्रवीण निकाळजे, नरसिंग कोळी, प्रवक्ते अशोक निंबर्गी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, महिला काँग्रेस अध्यक्षा प्रमिलाताई तुपलवंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, ब्लॉक अध्यक्ष देविदास गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, अल्पसंख्याक काँग्रेस अध्यक्ष जुबेरभाई कुरेशी, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, भटक्या-विमुक्त विभाग अध्यक्ष युवराज जाधव, प्रवक्ते सेल अध्यक्ष नागनाथ कदम, शहर मध्य युवक काँग्रेस अध्यक्ष वाहिद बिजापूर, उत्तर शहर युवक काँग्रेस अध्यक्ष महेश लोढे, मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, माजी नगरसेवक सिद्धाराम चाकोते, भारती ईपलपल्ली, एन. के. क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वनाथ साबळे, अशोक कलशेट्टी, दत्तू बंदपट्टे, प्रीती देवकते, कल्पना रव्वा, धोंडप्पा तोरणगी, खुद्दुसिया मणियार, नसीम खलिफा, शहजादिबेगम बडेपीर, शोहेब महागामी, सपना म्यागेरी, कल्पना नरोटे, डॉ. आप्पासाहेब बगले, वशिष्ठ सोनकांबळे, दिनेश म्हेत्रे, सुभाष वाघमारे, राजेश झांपले, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**संघटना मजबूत करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे घेण्यात येणार**

निवडणूक निकालांवर बोलताना शहर प्रभारी मोहन जोशी यांनी भाजपवर जोरदार टीका करत, "भाजप नव्हे, ईव्हीएम निवडून आला आहे," असा आरोप केला. प्रभागरचना, मतदार यादी आणि शासकीय यंत्रणांचा गैरवापर झाल्याचा आरोप त्यांनी केला. निकालानंतर खचून न जाता संघटना मजबूत करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे घेण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

### ह. दे. महाविद्यालयाचे विविध स्पर्धांमध्ये यश

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

संगमेश्वर महाविद्यालय येथील भाषा संकुलाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांमध्ये हरिभाई देवकरण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

या स्पर्धेत समर्थ सिद्धाराम हिरकुर याने कन्नड अभिवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. इंग्रजी अभिवाचन स्पर्धेत सोनाली सोनटक्के हिने तृतीय क्रमांक मिळवला. तसेच संस्कृत अभिवाचन स्पर्धेत समर्थ सिद्धाराम हिरकुर, हिंदी अभिवाचन स्पर्धेत रिहाना राजअहमद शेख आणि हिंदी सुलेखन स्पर्धेत रेणुका परशुराम बनसोडे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. प्रसिद्ध नाट्यकलावंत अनिरुद्ध जोशी यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना प्रा. धन्यकुमार बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्या दीपा फाटक, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे व पर्यवेक्षक राऊत यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पद्मशाली नगरसेवकांनी नागरी प्रश्नांची सोडवणूक करावी : डॉ. सूर्यप्रकाश कोठे

**पद्मशाली संस्थेतर्फे नूतन नगरसेवकांचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या पद्मशाली समाजाच्या १७ नगरसेवकांनी जास्तीत जास्त नागरी प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी केले.

पद्मशाली ज्ञाती संस्थेतर्फे बुधवारी सिद्धेश्वर पेठेतील मार्कंडेय मंदिरात आयोजित पद्मशाली समाजाच्या नूतन नगरसेवकांच्या सत्कार कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, सरचिटणीस संतोष सोमा, महांकाळ येलदी, रमेश कैरमकोंडा,विश्वस्त रामचंद्र जन्नू, नरसय्या इपाकायल आदींची प्रमुख उपस्थिती होती.



पद्मशाली ज्ञाती संस्थेला महापालिकेकडून आरसीसी माध्यमातून मिळणाऱ्या १८ कोटी ऐवजी तीन एकर जागा मिळवून देण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून प्रयत्न करणार अशी ग्वाही यावेळी नगरसेवक विनायक कोंड्याल यांनी दिली. या कार्यक्रमात नगरसेवक प्रशांत पल्ली यांनी नगरसेवक पदाच्या माध्यमातून पद्मशाली समाजाचा प्रत्येक नगरसेवक दरवर्षी किमान पाच लाखांचा निधी समाजाला विकास कामांसाठी देण्याचा प्रयत्न करतील, असे सांगितले. नगरसेवक मेघनाथ येमुल यांनी ज्ञाती संस्थेच्या जागेत विकासकामासाठी तसेच पद्मशाली स्मशानभूमीसाठी जास्तीत जास्त निधी देण्याचे आश्वासन दिले.

तत्पूर्वी प्रास्ताविकामध्ये सुरेश फलमारी यांनी सर्व नूतन नगरसेवक, नगरसेविकांचे अभिनंदन करून महापालिका निवडणुकीत आमदार देवेंद्र कोठे यांनी पद्मशाली समाजाचे जास्तीत जास्त उमेदवार आणून समाजाचा झेंडा रोवल्याचे सांगितले.कार्यक्रमास माजी नगरसेवक राजमहेंद्र कमटम, श्रीनिवास करली, गोपी वड्डेपल्ली, नागेश सरगम, दामोदर पासकंटी, दत्तात्रय बडगु, शेखर कटकम, राम गड्डम, श्रीनिवास गड्डम आदी उपस्थित होते.

**या नगरसेवकांचा सन्मान**

विनायक कोंड्याल, प्रथमेश कोठे, मेघनाथ येमूल, व्यंकटेश कोंडी, डॉ. अजय पोन्नम, शेखर इगे, सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, सतीश सिरसुल्ला, सिध्देश्वर कमटम, प्रशांत पल्ली, कविता गज्जम, अर्चना वडनाल, स्वाती बडगू, दिपीका यलदंडी, उज्वला दासरी.

# महापालिकेत सत्तेच्या केंद्रस्थानी महिला महापौर, उपमहापौर

**५८ वर्षात सात महिला महापौर तर सहा उपमहापौर**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या ६१ वर्षांच्या प्रवासात महिला नेतृत्वाने केवळ प्रतिनिधित्व केले नाही, तर प्रशासन, निर्णयप्रक्रिया आणि सामाजिक संवेदनशीलतेला नवी दिशा दिली. सन १९६४ ते २०२२ या कालावधीत एकूण सात महिला महापौर सोलापूर महापालिकेला लाभल्या. महापौर व उपमहापौरपदावर महिलांना मिळालेल्या संधींमुळे सोलापूरचे राजकारण अधिक समतोल, संवादशील आणि लोकाभिमुख झाले आहे.

सोलापूर शहराच्या पहिल्या महिला महापौर म्हणून शेवंताबाई पवार यांनी इतिहास रचला. त्या काळात महिला राजकारणात पुढे येणे हेच आव्हान असताना त्यांनी आत्मविश्वासाने म हापौरपद सांभाळून नव्या पिढीसाठी मार्ग खुला केला. त्यानंतरच्या काळात महिलांचा सहभाग केवळ प्रतीकात्मक न राहता प्रभावी ठरू लागला. सन १९६४ ते २०२२ या कालावधीत सात महिला महापौर सोलापूर महापालिकेला लाभल्या. शेवंताबाई पवार, नलिनी चंदेले, अरुणा वाकसे, अलका राठोड, प्रा. सुशीला आबुटे, शोभा बनशेट्टी आणि श्रीकांचना यन्नम यांनी वेगवेगळ्या काळात शहराचा कारभार सांभाळत आपला स्वतंत्र ठसा उमटविला. स्वच्छता, महिला-बालकल्याण, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक प्रश्नांवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मार्च २०१२ ते मार्च २०२२ या दहा



वर्षांत सलग चार महिला महापौरांनी महापालिकेची सूत्रे हाती घेतली. हा कालखंड सोलापूरच्या राजकीय इतिहासात महिला नेतृत्वाचा सुवर्णकाळ मानला जातो. सन २०१७ ते २०१९ या काळात महापौर आणि उपमहापौर ही दोन्हीही पदे महिलांकडे होती. त्या वेळी शोभा बनशेट्टी महापौर तर शशिकला बत्तुल उपमहापौर होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थांम ध्ये महिला सक्षमीकरणाचे हे ठळक उदाहरण ठरले.

महापालिकेत उपम हापौरपदीही सहा महिलांनी जबाबदारी सांभाळली. प्रा. नसीमा पठाण, सुषमा घाडगे, फातिमा शेख, महानंदा भोसले, सुमन मुदलियार आणि शशिकला बत्तुल यांनी विविध कालखंडात प्रशासनात समन्वयाची भूमिका बजावली.

**सलग चार महिला महापौर**

सन २०१७ ते २०१९ या काळात महापौर व उपमहापौर दोन्ही पदे महिलांकडे तर २०१२ ते २०२२ या १० वर्षांत सलग चार महिला महापौर झाले आहेत.

महिला प्रश्नांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडवताना त्यांनी संवेदनशील दृष्टिकोन दाखविला. पुरुषप्रधान राजकारणाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिकेतील महिला नेतृत्वाने "संधी मिळाल्यास महिला सक्षम प्रशासन देऊ शकतात" हे वेळोवेळी सिद्ध केले आहे.

| महिला महापौर | कालावधी |
|---|---|
| शेवंताबाई पवार | (१९९७-१९९८) |
| नलिनी चंदेले | (२००२-२००५) |
| अरुणा वाकसे | (२००७-२००९) |
| अलका राठोड | (२०१२-२०१४) |
| प्रा. सुशीला आबुटे | (२०१४-२०१७) |
| शोभा बनशेट्टी | (२०१७-२०१९) |
| श्रीकांचना यन्नम | (२०१९-२०२२) |

| महिला उपमहापौर | कालावधी |
|---|---|
| प्रा. नसीमा पठाण | (१९७६-१९७७) |
| सुषमा घाडगे | (१९९२-१९९३) |
| फातिमा शेख | (१९९४-१९९५) |
| महानंदा भोसले | (१९९८-१९९९) |
| सुमन मुदलियार | (मार्च १९९९-ऑगस्ट १९९९) |
| शशिकला बत्तुल | (२०१७-२०१९) |

आजच्या घडीला सोलापूर महापालिकेचा इतिहास पाहिला तर महिला नेतृत्व हे केवळ आकडेवारीपुरते मर्यादित न राहता, शहराच्या सामाजिक-प्रशासकीय वाटचालीचा अविभाज्य भाग बनले आहे. महापालिकेतील हा अनुभव भविष्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रेरणादायी ठरत असून, महिला नेतृत्व हेच सक्षम शहरकारभाराचे बळ असल्याचा ठाम संदेश सोलापूरने दिला आहे.



भौगोलिक परिस्थिती बदलली तरी तुमची मूळ ओळख बदलत नाही. मराठी बोललीच पाहिजे, अशी सक्ती माझ्यावर करू नका. मी ती भाषा तेव्हाच बोलेन तेव्हा माझी इच्छा असेल. मला भाषा बोलण्यासाठी भाग पाडू नका.
- **सुनील शेट्टी**, अभिनेता


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार, २२ जानेवारी २०२६ ३




मुस्लिम असूनही ए. आर. रहमान यांनी संगीत क्षेत्रात भरपूर नाव कमावले आणि लोकांच्या मनात स्थान निर्माण केले. पण, जर त्यांना आता मुस्लिम असल्यामुळे काम मिळत नाही असे वाटत असेल तर त्यांनी पुन्हा हिंदू व्हावे.
- **अनुप जलोटा**, ज्येष्ठ गायक

# अमेरिकेविरोधात एकवटणे काळाची गरज

## कॅनडाच्या पंतप्रधानांची ट्रम्प यांच्या धोरणावर टीका | सार्वभौमत्व धोक्यात आल्यास ताकदीने प्रत्युत्तर देणार

◆ **दावोस, २१ जानेवारी**

अमेरिकेचे विस्तारवादी धोरण जगाच्या शांततेसाठी धोकादायक आहे आणि या धोरणाला विरोध करणाऱ्या देशांनी एकत्र येण्याची गरज आहे. जगातील अमेरिकेच्या वर्चस्वाचा अंत झाला आहे. आता जुनी व्यवस्था संपुष्टात आली, देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाल्यास ताकदीने प्रतुत्तर देण्यासाठी सक्षम असल्याचा इशारा कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दावोसमधील संबोधनातून दिला.



ट्रम्प यांनी बुधवारी एक नकाशा जारी करून ग्रीनलँड, कॅनडा अमेरिकेचा भूभाग असल्याचा दावा केला होता. स्वित्झर्लंडमधील दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक परिषदेत सहभागी होण्यासाठी आलेले कार्नी यांनी ट्रम्प यांनी केलेल्या दाव्याचा समाचार घेतला. त्यांनी म्हटले की, काही देश व्यापार शुल्काचा वापर शस्त्र म्हणून करत आहेत. यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होत आहे आणि काही देश या परिस्थितीचा फायदा घेत आहेत. समविचारी देशांनी अमेरिकेविरोधात एकवटण्याची वेळ आली आहे. त्यांचे जागतिक स्तरावर असेलेले स्थान आता संपुष्टात आले. कॅनडाने आपली दक्षिण सीमा मजबूत करण्यासाठी १ अब्ज डॉलर्स खर्च केले. येत्या काळात आपली उत्तर सीमा मजबूत करण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च करण्याची योजना आहे. देशाच्या सार्वौभौमत्व धोक्यात आल्यास प्रत्युत्तर देण्यासाठी आम्ही सक्षम आहे. अमेरिकेचा डाव कदापि यशस्वी होवू देणार नाही. जुन्या जागतिक व्यवस्थेमुळे कॅनडाला फायदा झाला. परंतु आता ही व्यवस्था टिकाऊ राहिलेली नाही. ◀(वृत्तसंस्था)

### आंतरराष्ट्रीय कायदे पायदळी तुडवण्याचा काळ : मॅक्रॉन

» ट्रम्प यांच्यावर निशाणा साधताना फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन



म्हणाले, जगाची वाटचाल अशा दिशेने सुरू आहे, जिथे नियमांना जागाचा नाही. आंतरराष्ट्रीय कायदे पायदळी तुडवले जात आहेत. आव्हानांवर मात करणाऱ्या संरचनाच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. व्यापार शुल्क थोपवून अर्थव्यवस्थांना कमकुवत करण्याचा प्रकार सर्रास सुरू आहे. शुल्काचा वापर प्रादेशिक सार्वौभोमत्वावर दबाव आणण्यासाठी केला जात आहे. ■

### आंतरराष्ट्रीय संघटना कमकुवत

» कार्नी म्हणाले, अलीकडच्या वर्षांत वित्त, आरोग्य, ऊर्जा आणि भू-राजकीय संकटांनी हे दाखवून दिले, की गरजेपेक्षा जास्त जागतिक अवलंबित्व किती धोकादायक असू शकते. जागतिक व्यापार संघटना आणि संयुक्त राष्ट्र यांसारख्या बहुपक्षीय संस्था कमकुवत झाल्या आहेत. अशा परिस्थितीत देशांनी आता स्वतःच्या सुरक्षा, ऊर्जा आणि अन्न गरजांसाठी तयार राहावे लागेल. ■

### दावोसला जाताना ट्रम्प यांच्या विमानात बिघाड

» अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विमान दावोसला जात असताना, तांत्रिक बिघाडामुळे आकाशातूनच माघारी परतले. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलिन लिव्हिट यांनी सांगितले की, उड्डाणानंतर काही मिनिटातच विमानात बिघाड असल्याचे लक्षात येताच खबरदारी म्हणून विमान परत आणण्याचा निर्णय घेण्यात आला. ■

### नारायण साईच्या याचिकेवर २६ फेब्रुवारीला सुनावणी

◆ **गांधीनगर, २१ जानेवारी**

बलात्काराच्या आरोपात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या



आसाराम बापूंचा मुलगा नारायण साईने गुजरात उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. यावर २६ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे.

युक्तिवादात वकिलाने म्हटले की, साई १२ वर्षांपासून तुरुंगात आहे आणि त्याचे अपील अजूनही प्रलंबित आहे. त्याला मानवतावादी आधारावर जामीन मंजूर करावा. जन्मठेपेच्या शिक्षेला आव्हान देण्यात आले आणि अंतिम निकाल येईपर्यंत तुरुंगात ठेवणे अन्यायकारक आहे. साईने यापूर्वी जामिनासाठी अर्ज केला होता.

उच्च न्यायालयाने शिक्षा माफी आणि फर्लो किंवा तात्पुरती सुटका मागण्याच्या त्यांच्या याचिका फेटाळल्या होत्या. गुन्ह्याचे गांभीर्य आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम दुर्लक्षित करता येणार नाही, असे न्यायालयाने आदेशात म्हटले होते. ◀(वृत्तसंस्था)



## वायुदलाचे प्रशिक्षणार्थी विमान प्रयागराजमध्ये कोसळले

◆ **प्रयागराज, २१ जानेवारी**

येथील जॉर्ज टाऊन परिसरातील के. पी. महाविद्यालयच्या मैदानाजवळील एका तलावात भारतीय वायुदलाचे विमान बुधवारी कोसळले. सुदैवाने या अपघातात प्राणहानी झाली नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. विमानातील वैमानिक सुरक्षितरीत्या बाहेर पडले जीवित अथवा वित्तहानीची कोणतीही माहिती समोर आलेली नाही, अशी माहिती पोलिस उपायुक्त मनीष शांडिल्य यांनी दिली. विमानाच्या इंजिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते कोसळले. विमान अपघाताची माहिती मिळताच प्रशासनाने घटनास्थळाला वेढा घातला. या प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ◀(वृत्तसंस्था)

# संयुक्त राष्ट्रांची जागा शांतता मंडळ घेणार

## ट्रम्प यांनी सांगितली योजना, जगासाठी धोक्याची घंटा

◆ **वॉशिंग्टन, २१ जानेवारी**

गाझा पट्टीच्या पुनर्बांधणीसाठी प्रस्तावित बोर्ड ऑफ पीस अर्थात् शांतता मंडळ समिती आगामी काळात संयुक्त राष्ट्रांची जागा घेईल. मंडळाने तयार केलेले नियम, कायदे जागतिक शांततेसाठी लागू होणार असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.

शांतता मंडळ समितीच्या सदस्यत्वासाठी एक अब्ज डॉलर्स इतकी रक्कम निश्चित करण्यात आली आणि ट्रम्प हेच मंडळाचे अध्यक्ष अनिश्चित काळासाठी



राहणार असल्याने त्यांची योजना जगासाठी धोक्याची घंटा ठरू शकते. प्रसार माध्यमांना शांती मंडळ समितीची माहिती देताना ट्रम्प म्हणाले, मंडळ प्रत्यक्षात आल्यानंतर संयुक्त राष्ट्रांची आवश्यकता राहणार नाही. संयुक्त राष्ट्रांकडे क्षमता आहेत, परंतु ते जगात शांतता प्रस्थापित करण्याच्या किंवा दोन देशांमधील वाद सोडवण्याच्या स्थितीत कधीही नव्हते.

८० वर्षे जुनी संघटना बदलण्याची वेळ आली आहे आणि नवीन व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देश समोर ठेवून शांतता मंडळ समिती काम करेल. भारत, रशिया आणि चीन यासारख्या देशांना मंडळात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे. मला आशा आहे, की सदस्यत्वाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नवीन व्यवस्था निर्माण करण्याला वेग येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. ◀(वृत्तसंस्था)

### ...तर इराणचे अस्तित्व संपुष्टात येईल

» इराणच्या लष्कर प्रमुखाने दिलेल्या जीवे मारण्याच्या धमकीवर बोलताना ट्रम्प म्हणाले, माझ्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यास सर्वोच्च नेते खामेनेई यांच्यासह इराणचे अस्तित्व पृथ्वीवरून संपुष्टात येईल. इराणवरील कारवाईवरून आम्ही माघार घेतलेली नाही, तेथील परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. वेळ आणि ठिकाण निवडून हल्ला केला जाईल. ■

### ट्रम्प यांच्या शांतता मंडळात सहभागी होणार नेतान्याहू

◆ **जेरुसलेम, २१ जानेवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शांतता मंडळात सहभागी होण्यास सहमती दर्शवली आहे, असे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी बुधवारी सांगितले. मात्र, यापूर्वी त्यांच्या कार्यालयाने मंडळाच्या कार्यकारी समितीवर टीका केली होती. या समितीत प्रादेशिक प्रतिस्पर्धी असलेल्या तुर्कीचा समावेश होता.

ट्रम्प यांचे निमंत्रण आम्ही स्वीकारले आहे, असे नेतान्याहू यांच्या कार्यलयाने निवेदनात म्हटले आहे. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील 'बोर्ड ऑफ पीस'ची मूळ संकल्पना गाझा युद्धविराम योजनेवर देखरेख ठेवणाऱ्या जागतिक नेत्यांच्या एका लहान गटाच्या स्वरूपात करण्यात आली आहे. ट्रम्प प्रशासनाच्या महत्त्वाकांक्षा अधिक व्यापक संकल्पनेत विस्तारल्या आहेत. यात ट्रम्प यांनी डझनभर देशांना निमंत्रणे दिली आहेत आणि एका आभासी संयुक्त राष्ट्र परिषदेप्रमाणे लवकरच जागतिक संघर्षांमध्ये मध्यस्थी करण्याचे संकेत दिले आहेत. गुरुवारी स्वित्झर्लंडमधील दावोस येथे जागतिक आर्थिक मंचाचा बैठकीत ट्रम्प शांतता मंडळाबद्दलच्या घोषणेत सहभागी होतील, तेव्हा अधिक तपशील मिळण्याची अपेक्षा आहे. ◀(वृत्तसंस्था)

# उदयनिधींचे सनातनविरोधी वक्तव्य द्वेषयुक्तच

● **मद्रास उच्च न्यायालयाचा दणका** ● **नरसंहाराचे समर्थन करण्यासारखे**

◆ **चेन्नई, २१ जानेवारी**

तमिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्माचे निर्मूलन करण्याबाबत केलेले वक्तव्य हे एका प्रकारे नरसंहाराचे समर्थन करण्यासारखे आहे. त्यांनी सनातन धर्माबाबत २०२३ मध्ये केलेले वक्तव्य द्वेषयुक्त भाषण असल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपाठाने बुधवारी नोंदवले.

केवळ इतकेच नव्हे तर न्यायालयाने भाजपाच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांच्या विरोधात तमिळनाडू पोलिसांनी नोंदवलेला एफआयआर रद्द केला आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये तामिळनाडूमधील एका कार्यक्रमात उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्माची तुलना डेंग्यू, मलेरिया आणि कोरोनाशी केली होती. काही गोष्टींना केवळ विरोध करून चालत नाही, तर त्यांचे समूळ उच्चाटन करावे लागते. त्याचप्रमाणे सनातन धर्माचेही निर्मूलन केले पाहिजे, असे आक्षेपार्ह वक्तव्य त्यांनी केले होते.

अमित मालवीय यांनी या भाषणाचा व्हिडीओ 'एक्स'वर शेअर करीत, हे वक्तव्य सनातन धर्माचे पालन करणाऱ्या भारतातील ८० टक्के लोकसंख्येच्या नरसंहाराचे आवाहन आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. यावरून मालवीय यांनी दोन गटांत शत्रुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करीत तमिळनाडू पोलिसांनी त्यांच्यावर कलम १५३ अ आणि ५०५ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.

मदुराई खंडपीठाने अत्यंत कठोर शब्दांत ताशेरे ओढताना म्हटले, मागील १०० वर्षांपासून द्रविड कळघम आणि त्यानंतर द्रविड मुन्नेत्र कळघमकडून हिंदू धर्मावर सातत्याने हल्ला केला जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. मंत्री उदयनिधी स्टॅलिन हे देखील याच विचारधारेचे वारसदार आहेत.

द्वेषयुक्त भाषण करणाऱ्यांवर अनेकदा कारवाई होत नाही, तर त्याला प्रत्युत्तर देणाऱ्यांना कायद्याचा रोख सोसावा लागतो, अशी चिंताही न्यायालयाने यावेळी व्यक्त केली. ज्यांनी द्वेषयुक्त भाषणाची सुरुवात केली ते मोकळे सुटतात, तर त्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देणाऱ्यांविरुद्ध कायद्याचा बडागा उगारला जातो, ही वस्तुस्थिती क्लेशदायक आहे. तमिळनाडूमध्ये या द्वेषयुक्त भाषणाबद्दल मंत्र्यांविरुद्ध कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही, तर इतर राज्यांत काही गुन्हे नोंदवण्यात आले आहेत, असे न्यायालयाने म्हटले ◀(वृत्तसंस्था)

### भाषणात नरसंहाराचा स्पष्ट उल्लेख

» सनातन धर्माचे पालन करणाऱ्या विशिष्ट समुदायाचे अस्तित्व असू नये असे म्हटले जात असेल, तर त्यासाठी योग्य शब्द नरसंहार हाच आहे. सनातन धर्माला जर धर्म मानले, तर त्याचे उच्चाटन म्हणणे म्हणजे धर्मसंहार आहे. यामध्ये सांस्कृतिक संहाराचाही समावेश होतो. त्यामुळे 'सनातन ओळिप्पू' (सनातन निर्मूलन) या तमिळ शब्दाचा अर्थ स्पष्टपणे नरसंहार असाच होतो, असे मदुराई खंडपीठाने म्हटले. ■

## कर्नाटकमधील अधिकाऱ्याकडे सापडली १४ कोटींची रोख

◆ **बेंगळुरू, २१ जानेवारी**

कर्नाटकमध्ये लोकायुक्तांच्या कारवाईत गृहनिर्माण आणि अल्पसंख्याक कल्याण विभागाचे सचिव सरदार सरफराज खान यांच्याकडे १४ कोटींची रोकड, जमीन, दागिन्यांसह ५० कोटीं पेक्षा अधिकची मालमत्ता आढळून आली.

कर्नाटक लोकायुक्तांनी बेहिशेबी मालमत्तेच्या प्रकरणात खान यांचे निवासस्थान, फॉर्म हाऊस, त्यांच्या नातेवाईकांसह १३ ठिकाणी छापे टाकले. कारवाईत त्यांच्याकडे उत्पन्नापेक्षा अधिकची मालमत्ता आढळून आली. लोकायुक्त कार्यालयाने जारी केलेल्या प्रसिद्धीसपत्रकात म्हटले की, खान यांच्याकडे चार घरे, ३७ एकर शेती, १४ कोटी रोकड, तीन कोटींचे सोन्याचे दागिने, १.६४ कोटी किंमतीची वाहने, ५.९४ कोटींची मुदत ठेव आणि इतर गुंतवणूक देखील आढळून आली. कारवाईत आढळून आलेली एकूण मालमत्ता ५० कोटींपेक्षा अधिक आहे. ◀(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'धुरंधर २'मध्ये दिसणार विकी कौशल

**मुंबई** : आदित्य धरच्या 'धुरंधर'विषयी चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. आता त्याच्या दुसऱ्या भागात प्रेक्षकांसाठी मोठे आकर्षण असणार आहे. रणवीरसिंहच्या सिनेमात आता अभिनेता विकी कौशलचा प्रवेश होणार आहे. अर्थात, यात विकी पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसेल. मात्र, त्याची भूमिका छोटी असली तरी महत्त्वाची असेल. 'धुरंधर २' मध्ये विकी मेजर विहान शेरगिलची भूमिका साकारणार आहे. यापूर्वीच या चित्रपटात अक्षय खन्ना दिसणार असल्याचे निर्मात्यांनी जाहीर केले आहे. 'धुरंधर' आणि 'उरी : द सर्जिकल स्ट्राईक'चा संबंध असल्याचे यापूर्वीही बोलले जात होते. आता हा संबंध विकीच्या भूमिकेने अधिक स्पष्ट होणार आहे. ■



### 'रणपती शिवराय'चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई** : दिग्पाल लांजेकरांच्या श्री शिवराय अष्टकमधील सहावे पुष्प 'रणपती शिवराय स्वारी आग्रा' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच याचे ट्रेलर प्रदर्शित करण्यात आले. शिवाजी महाराजांची आग्रा भेट ही एक जोखमीची घटना होती. पण, या भेटीतून त्यांच्या कणखर नेतृत्वाची आणि चातुर्याची झलक दिसली. हा सगळा शौर्याचा इतिहास चाहत्यांना आगामी चित्रपटातून पाहायला मिळणार आहे. यात अभिजीत विश्वचंद्र शिवरायांच्या भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट येत्या ३० जानेवारीला प्रदर्शित होणार आहे. यात मृणाल कुलकर्णी, समीर धर्माधिकारी, अजय पूरकर, दिग्पाल लांजेकर, योगेश सोमण, निखिल राऊत, विराजस कुलकर्णी, ऋषी सक्सेना, सचिन देशपांडे आदींच्या भूमिका आहेत. ■






## संभल हिंसाचार

# सूत्रधार शारिकची मालमत्ता जप्त

## दुबईत पसार, रेड कॉर्नर नोटीस जारी

◆ **संभल, २१ जानेवारी**

उत्तर प्रदेशातील संभल येथे नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या हिंसाचाराचा कथित सूत्रधार शारिक साठाची चार राज्यातील मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया पोलिसांना सरू केली. दुबईमध्ये पसार झालेल्या शारिकला मोस्ट वाँटेड घोषित केले आणि त्याला पकडण्यासाठी रेड कॉर्नस नोटीस जारी करण्यात आली.

संभलचे पोलिस अधीक्षक के.के. बिश्नोई यांनी सांगितले की, २४ डिसेंबरच्या हिंसाचाराचा सूत्रधार शारिक हा चार राज्यांमध्ये वॉन्टेड गुन्हेगार आहे. तो दुबईतून त्याची टोळी चालवतो आणि त्याच्याविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस जारी करण्याची तयारी सुरू आहे. पोलिसांनी न्यायालयाने जारी केलेल्या आदेशानुसार त्याची मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली. बनावट पासपोर्ट वापरून तो देशातून पसार झाला होता, त्यानंतर इंटरपोलने त्याच्याविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस जारी केली. तस्करी, बनावट चलन, वाहन चोरी यासारखे ६९ गुन्हे विविध राज्यांमध्ये दाखल आहे. ◀(वृत्तसंस्था)

### पंजाबमध्ये दोन शस्त्रे तस्करांना अटक

**चंदीगड** : पाकिस्तानस्थित तस्करांशी संबंधित एका आंतरराष्ट्रीय बेकायदेशीर शस्त्र तस्करी टोळीचा पर्दाफाश करीत दोन जणांना अटक करण्यात आली, असे पंजाब पोलिसांनी बुधवारी सांगितले. अमृतसर आयुक्तालय पोलिसांनी सहा अत्याधुनिक पिस्तूल (दोन ग्लॉक, चार .३० बोअर) जप्त केली आहेत, अशी माहिती पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी दिली. ■

### आसाममधील दोघांसह चार बंडखोरांना अटक


◆ **इम्फाळ, २१ जानेवारी**

मणिपूरमधील सुरक्षा दलांनी विविध प्रतिबंधित संघटनांशी संबंधित चार बंडखोरांना अटक केली आहे. यात आसाममधील दोघांचा समावेश आहे, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले.

मंगळवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील मंत्रीपुखरी परिसरातून प्रतिबंधित संघटनेच्या एका सक्रिय कार्यकर्त्याला पिस्तूलसह अटक करण्यात आली, तर त्याच दिवशी जिल्ह्यातील सावोम्बुंग वैरी येथून संघटनेच्या एका स्वयंघोषित कॉर्पोरलला अटक करण्यात आली. रविवारी, सुरक्षा दलांनी आसाममधील द्वारका नगर येथील एका भाड्याच्या घरातून (तैबंगनबा) संघटनेच्या दोन कार्यकर्त्यांना पकडले. पुढील तपासासाठी दोघांना मणिपूरमध्ये परत आणण्याची औपचारिकता पूर्ण झाली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# २३३ वर्षे जुने रामायण संग्रहालयाला भेट

### भेटस्वरूपात मिळाला ग्रंथ



◆ **नवी दिल्ली, २१ जानेवारी**

२३३ वर्षे जुनी वाल्मीकि रामायणाची दुर्मिळ संस्कृत भाषेतील हस्तलिखित प्रत अयोध्येतील राम कथा संग्रहालयाला भेटस्वरूपात मिळाली, अशी माहिती सांस्कृतिक मंत्रालयाने दिली.

एका महत्त्वपूर्ण सांस्कृतिक हस्तांतरण सोहळ्यात, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू श्रीनिवास वरखेडी यांनी वाल्मीकि रामायणाची (तत्त्वदीपिका टीकेसह) हस्तलिखित प्रत पंतप्रधान संग्रहालय आणि ग्रंथालयाच्या कार्यकारी



परिषदेचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांना सोपवली, असे मंत्रालयाने सांगितले.

आदि कवी वाल्मीकि यांनी लिहिलेली आणि महेश्वरा तीर्थ यांनी शास्त्रीय टीका केलेली ही हस्तलिखित प्रत संस्कृत भाषेत लिहिलेली आहे, असे मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. हे विक्रम सवंत १८४९ ( इ.स. १७९२) या काळातील एक ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्य आहे आणि ते रामायणाच्या एका दुर्मिळ, जतन केलेल्या ग्रंथरूप परंपरेचे प्रतिनिधित्व करते, असे त्यात म्हटले आहे.

या संग्रहात महाकाव्याच्या पाच प्रमुख कांडांचा समावेश आहे. यात बालकांड, अरण्यकांड, किश्किंधकांड, सुंदरकांड आणि युद्धकांड असून, या माध्यमातून इतिहासाची कथा आणि तात्त्विक खोली प्रतिबिंबित करते, असे निवेदनात म्हटले आहे.

यापूर्वी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन येथे हे हस्तलिखित ठेवण्यात आले होते. ते आता उत्तरप्रदेशातील अयोध्या येथील आंतरराष्ट्रीय राम कथा संग्रहालयाला कायमस्वरूपी भेट देण्यात आली आहे. या माध्यमातून रामायणाचा श्रीमंत वारसा जपणारे संग्रहालय जागतिक केंद्र म्हणून समोर यावे यासाठी पाठिंबा देण्यात आला. त्यामुळे ते मोठ्या प्रमाणात लोकांसमोर येईल आणि त्याचे जतन होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

> **ही भेटवस्तू वाल्मीकि रामायणातील गहन ज्ञान अजरामर करते आणि अयोध्येच्या पवित्र शहरात जगभरातील विद्वान, भक्त आणि पर्यटकांसाठी ते सुलभ करते.**
>
> **श्रीनिवास वरखेडी**
> केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू

> **वाल्मीकि रामायणाची ही दुर्मिळ हस्तलिखित प्रत अयोध्येतील रामकथा संग्रहालयाला दान करणे हा रामभक्तांसाठी आणि अयोध्येतील मंदिर परिसरासाठी एक ऐतिहासिक क्षण आहे.**
>
> **नृपेंद्र मिश्रा**
> ग्रंथालयाच्या कार्यकारी परिषदेचे अध्यक्ष

## जि.प.च्या ६८ जागांसाठी ७५६ ...

**पान १ वरून...**

जिल्ह्यात राष्ट्रवादी, भाजप अन् शिंदे सेनेच्याच तगड्या लढती राहणार आहेत. राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून एकट्याच्या जीवावर सोलापूर जिल्हा परिषदेत सत्ता आणणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता भाजपाचीच मोठी भीती राहणार आहे. पूर्वी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असल्याने आणि केंद्रात अन् राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता असल्याने जिल्हा परिषदेत गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. आताही नव्याने हा प्रयोग दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत करीत आहेत. यंदा मात्र भाजपाने नगरपालिका, महापालिकेच्या धर्तीवर फिल्डिंग लावली तर मात्र राष्ट्रवादीचे किती सदस्य येतील? हे सध्यातरी सांगणे कठीण आहे. यासाठी भाजप विरोधी सर्व पक्ष एकत्र येवून झेडपी निवडणूक लढण्याची शक्यताही नाकारता येत नाही. गेल्या निवडणुकीत सत्ता राखताना सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसची दमछाक झाली. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी- २५, भाजप+आघाड्या-१९, शिवसेना +आघाड्या-१०, शेकाप-३, भीमा परिवार-३, काँग्रेस-७ आणि अपक्ष १ असे बलाबल होते. यामुळे इतर पक्षाच्या टेकूने राष्ट्रवादीने सत्ता मिळविली होती. यंदाही भाजप, राष्ट्रवादी अन् शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांतच तगडी फाईट दिसून येणार आहे. तसेतर युती, आघाडीनंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# नव्या भाजपाध्यक्षांना शुभेच्छा देताना...

"भाजप असा पक्ष आहे, ज्यात पद नाही तर प्रक्रिया महत्त्वाची असते. मी पंतप्रधान असलो तरी, जेव्हा विषय पक्षाचा येतो तेव्हा मी एक सामान्य कार्यकर्ता असतो आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माझे 'बॉस' असतात...", देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे वक्तव्य भारतीय जनता पार्टीच्या शिस्तबद्ध, संयमी आणि त्यागाच्या संस्कृतीची मांडणी करणारे आहे. शिवाय या राजकीय पक्षाच्या 'डीएनए'चा तो मूलाधारही आहे. ज्यांनी अनेक दशके हा देश घराणेशाहीच्या दरबारी संस्कृतीने चालवला आणि आता पक्षाला उभारी देणेही ज्यांच्यासाठी अशक्यप्राय होऊन बसले आहे, अशा काँगेस पक्षाच्या नेतृत्वासाठी मोदींचे हे विधान मोलाची शिकवण ठरावी, असेच आहे. इतरांनाही त्यापासून शिकता येईल. पंतप्रधान म्हणून तीन कार्यकाळ गाजवणारी, एव्हाना जगप्रसिद्ध झालेली व्यक्ती स्वतःला सामान्य कार्यकर्ता समजून आपल्या नव्या पक्षाध्यक्षांपुढे नतमस्तक होते, तेव्हा तो पक्ष सर्वांपेक्षा वेगळा ठरतो आणि सध्याच्या राजकीय संस्कृतीत नवलाईचा विषय पण ठरतो. या संस्कृतीमुळेच भाजपची अन्य कुठल्याही राजकीय पक्षांशी तुलना होऊ शकत नाही.

अगदी सामान्य कार्यकर्ता हा राज्यकर्ता होऊ शकतो आणि सतरंजी उचलणाराही पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष बनू शकतो, यात भाजपचे वेगळेपण दिसते. यालाच 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणतात. काँग्रेससारख्या पक्षात जिथे नेतृत्वासाठी रक्ताचे नातेच अनिवार्य मानले जाते, तिथे भाजपात पद नाही तर प्रक्रिया महत्त्वाची ठरते. भाजपात अंतर्गत लोकशाही केवळ कागदावर नाही, तर प्रत्यक्ष कृतीत दिसते. हा पक्ष 'व्यक्ति'केंद्रित नसून 'विचार'धार्जिणा आहे आणि म्हणूनच रामनाथ कोविंद, द्रौपदी मुर्मू यांचे नाव ध्यानीमनी नसतानाही ते थेट देशाचे प्रथम नागरिक म्हणजे राष्ट्रपती होतात. ओम बिर्ला लोकसभेचे सभापती होतात. हरिवंश नारायण सिंह राज्यसभेचे उपाध्यक्ष होतात. त्या अर्थाने राजकीय पृष्ठभूमी नसलेले मनोहरलाल खट्टर, भजनलाल शर्मा हे मुख्यमंत्री होतात. एस. जयशंकर, अश्विनी वैष्णव यांच्यासारखे प्रशासकीय क्षेत्रातले लोक अचानक देशाच्या मंत्रिपदी पोहोचतात. अत्यंत मार्मिक उदाहरण पाहायचे झाल्यास, रेल्वेस्थानकावर चहा विकणारी व्यक्ती या देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान होते, ते या पक्षाच्या गौरवशाही व तत्त्वनिष्ठ वारशामुळेच. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी ज्या भारतीय जनसंघाची स्थापना केली, त्याचे मूळ 'एक देश, एक विधान, एक निशान' या राष्ट्रप्रेमी विचारात होते. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी दिलेला अंत्योदयाचा विचार आजही या पक्षाचा अढळ मार्गदर्शक स्तंभ आहे. अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी या जोडगोळीने शून्यातून या पक्षाचे विश्व उभे केले. त्यामुळेच १९८४ मध्ये लोकसभेत केवळ २ जागा मिळवणारा हा पक्ष २०१४ मध्ये २८२ आणि २०१९ मध्ये ३०३, तर २०२४ येईपर्यंत २४० जागांसह सलग तिसऱ्यांदा सत्तेत येणारा विक्रमी पक्ष ठरला. १८ कोटींहून अधिक नोंदणीकृत सदस्यांसह भाजपने चीनच्या कम्युनिस्ट पार्टीलाही मागे टाकत अवघ्या जगात सर्वांत मोठा राजकीय पक्ष म्हणून नावलौकिक मिळवला. आज भारतातील २० राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे किंवा त्यांच्या मित्रपक्षांचे सरकार आहे. ईशान्येकडील सातही राज्यांमध्ये केलेली प्रगती हे या पक्षाच्या संघटनकौशल्याचे उत्तम उदाहरण आहे. देशातील १० लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर 'पन्ना प्रमुख' आणि 'बुथ समिती'ची रचना आणखी कुठल्याच पक्षाकडे नाही, हे भाजपचे बलस्थान आहे. हे सगळे अगदी सहज होत नाही, तर त्यासाठी त्याग आणि समर्पणाची मोठी परंपरा लागते. कुशाभाऊ ठाकरे यांच्यासारखे अध्यक्ष, ज्यांनी आयुष्यभर साधी सायकल वापरली आणि पक्षाचा विस्तार केला, त्यांचे आदर्श प्रेरणादायी आहेत. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, डॉ. मुरलीमनोहर जोशी, जना कृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, अमित शाह आणि जे. पी. नड्डा यांच्या परिश्रमातूनच नितीन नवीनसारख्या तरुण नेतृत्वाकडे या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा आली. मोठी नावे बाजूला सारून जेव्हा 'नवीन' युग येते तेव्हा त्यात पिढी बदलाचे संकेत असतात. एकदा अटलबिहारी वाजपेयी यांना विचारण्यात आले होते की, तुमच्यानंतर कोण? तेव्हा त्यांनी हसून सांगितले, हा पक्ष कार्यकर्ते चालवतात, नेतृत्व आपोआप उदयाला येते!

पण याचा अर्थ असाही नाही की, भारतीय जनता पक्षात सारेच 'आलबेल' आहे. खरे तर, ज्यांना या संस्कृतीचा आधार नाही अशी अन्य पक्षांतील माणसं ज्या वेगाने या पक्षात घुसत आहेत, तेवढ्याच वेगाने दोषही शिरत आहेत. मूळ कार्यकर्त्यांची अस्वस्थता, आलेल्यांचा सत्तापद मिळवण्यासाठीचा गोंधळ, उमेदवारीचे नकार पचवण्याची ताकद नसल्याने उफाळून येणारी बंडखोरी ही 'आयाराम' संस्कृतीचीच देण आहे. नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीतून ती चव्हाट्यावर आलेली दिसते. भ्रष्टाचाराचे मूळ घेऊन आलेल्यांमुळे भाजपाचे मूळ 'कॅडर' अस्वस्थ आहे. निवडणूक आता विचारांची राहिली नाही, तर पैशांची झाली आहे असे त्यांना वाटते. ज्यांच्या विरोधात आम्ही लढलो, त्यांच्याच सोबत आता काम करावे लागते, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये दिसू लागली आहे. अनेक ठिकाणी शिस्तीला तडे जात आहेत. जेव्हा बाहेरच्या पक्षातून नेते येतात, तेव्हा ते आपली जुनी कार्यपद्धतीदेखील सोबत आणतात. त्याचा नकारात्मक परिणाम भाजपवर होत आहे हे नाकारता येत नाही. सत्ता टिकवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी केलेली ही तडजोड राजकारण म्हणून मान्य करता येईल; पण त्यामुळे पक्षाच्या नैतिक अधिष्ठानाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते, याचा विचार भाजपच्या कर्त्याधर्त्यांनी केला पाहिजे. एक खरे की राजकारणाच्या रीतीभाती बदलत असतानाही, भाजप इतर पक्षांच्या तुलनेत आजही अधिक संयमी आणि देशहिताचा विचार करणारा पक्ष आहेच. याची काही महत्त्वाची कारणे आहेत. या पक्षात कोणीही कितीही मोठा नेता आला तरी, संघटनेचे त्याच्यावर अदृश्य पण कडक नियंत्रण असते. पक्षाचा कणा आजही तोच निष्ठावंत कार्यकर्ता आहे, जो कोणत्याही पदाच्या अपेक्षेविना 'भारत माता की जय' म्हणत कामाला लागतो. सत्तेत असूनही आपल्या नातलगांना पद न देणारे नेते हे कार्यकर्त्यांपुढे 'रोल मॉडेल' ठरतात. हे लोक सुटी न घेता सतत काम करतात. हा त्याग कार्यकर्त्यांना प्रेरणा देतो. अन्य पक्षांच्या तुलनेत भाजप आजही 'सेल्फ-करेक्शन' करण्याची मोठी ताकद ठेवतो. जेव्हा केव्हा देशहिताचा प्रश्न येतो, तेव्हा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला सारून 'राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी मी' हा विचार या पक्षात अद्याप जपला जातो. ३७० कलम हटवणे असो वा राम मंदिराचे निर्माण, पक्षाने आपल्या मूळ विचारधारेशी कधी मोठी तडजोड केली नाही. पक्षाची अशी अनेक बलस्थाने असताना, बाहेरून येणाऱ्या 'आयाराम' नेत्यांमुळे मूळ विचारांना गालबोट लागणार नाही, याची काळजी नव्या पिढीतील नेतृत्वाला घ्यावी लागेल. सत्तेच्या झगमगाटात कार्यकर्त्यांचा त्याग आणि संयम ढळणार नाही हेही जपावे लागेल. नितीन नवीन यांच्यासारख्या युवा नेतृत्वाकडून हीच अपेक्षा आहे की, त्यांनी पक्षाला केवळ 'इलेक्शन विनिंग मशीन' न करता, त्याला देशकार्याला वाहून घेतलेली 'संस्कारांची शाळा' बनवावे. शेवटी भाजपचे यश हे केवळ आकड्यांत नाही, तर आजवर जपलेल्या राजकीय सुसंस्कृतीत आहे.

नितीन नवीन यांच्यासारख्या तरुण आणि अभ्यासू नेतृत्वावर विश्वास टाकणे, हे भाजपच्या प्रवाहीपणाचे लक्षण आहे. तसेच नवीन नेतृत्वाला संधी देताना जुन्या अनुभवांची शिदोरीही सोबत ठेवणे हीसुद्धा या पक्षाची खासियत आहे. भारतीय राजकारणात अनेक पक्ष आले आणि गेले, पण विचारांशी प्रामाणिक राहून जनसामान्यांच्या हृदयात स्थान मिळवणारा भाजप हा एकमेव पक्ष ठरला आहे, यात वाद नाही. घराणेशाहीच्या दलदलीतून देशाला बाहेर काढून, विकासाच्या राजकारणाकडे नेण्याचे श्रेय याच पक्षाला जाते. 'त्याग, संयम आणि देशहित' हा भाजपचा मूळ आत्मा असून, तो अजून शाबूत आहे. जोपर्यंत भाजपचा प्रत्येक नेता पंतप्रधान मोदींप्रमाणेच मी आधी भाजपचा सामान्य कार्यकर्ता आहे, असे अभिमानाने म्हणत राहील तोपर्यंत या पक्षाची संस्कृती आणि श्रेष्ठत्व अबाधित राहील. त्यासाठी सतत प्रयत्न व्हावेत आणि निवडणुकीतील लौकिक यशासह नैतिक अधिष्ठानाचा विस्तार सतत होत राहो, अशीच कोट्यवधी भाजप कार्यकर्त्यांची भावना आहे. तिला दुजोरा देताना भाजपच्या नव्या अध्यक्षांना शुभेच्छा!

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# 'राईट टू डिस्कनेक्ट' साधणार समतोल

भारतात गेल्या दोन दशकांमध्ये माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विस्तार झाला. लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध झाला, जागतिक दर्जाचे वेतन, कामाचे उत्तम वातावरण आणि करीअरची उत्कृष्ट संधी मिळाली. परंतु या चमकत्या जगामागे एक वास्तव लपले आहे. कार्यालयीन काम आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल साधणे हे आज प्रत्येक भारतीय आयटी कर्मचाऱ्यापुढील अत्यंत महत्त्वाचे आव्हान बनले आहे. जगभरातील क्लायंट्सना सेवा देण्याची गरज, वेळेत प्रोजेक्ट डिलिव्हरीची अपेक्षा, टाईम झोनचा ताण, सतत बदलणारी तंत्रज्ञानाची मागणी आणि कठोर डेडलाईन्स यामुळे या क्षेत्रातील कामाचे स्वरूप पूर्वीपेक्षा खूपच तणावपूर्ण झाले आहे. अनेक कर्मचाऱ्यांचा दिवस ९ तासांऐवजी ११ ते १२ तासांपर्यंत वाढतो. 'वर्क फ्रॉम होम' हा उपक्रम सुरू झाल्यावर प्रवासाच्या तासांची बचत झाली असली तरी काम संपण्याची सीमा अस्पष्ट झाली आणि 'काम नेमके कधी संपते?' हा प्रश्न निर्माण झाला. भारतामध्ये आयटी उद्योगाची रचना विशिष्ट समस्या घेऊन येते. बहुतेक ग्राहक अमेरिकन/युरोपियन असल्याने रात्री बेरात्री कॉल्स, मोठ्या शहरांमधील वाहतुकीचा प्रचंड बोजा, ऑफिसला जाण्या-येण्यामध्ये अनेक तास जाणे, कामगिरी मोजमापाची स्पर्धात्मक पद्धत, कुटुंबीयांची अपेक्षा, अधिक पैसे मिळवण्यासाठी चांगले पद, जास्त तास काम करून 'सेटल' होण्याचा सामाजिक दबाव, तंत्रज्ञानाच्या वेगवान बदलामध्ये सतत शिकण्याची गरज, कोर्सेस/सर्टिफिकेशन्स यासाठी द्यावा लागणारा अतिरिक्त वेळ या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे कामाचा ताण आणि वैयक्तिक आयुष्यातील असंतोष.

या पृष्ठभूमीवर काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल का आवश्यक आहे, हे समजून घेण्याची गरज आहे. मानसिक आरोग्याची जपणूक, सततची धावपळ, ऑन-कॉल सपोर्ट, मीटिंग्जचा मारा यामुळे बर्नआऊट, चिंता, चिडचिड, झोपेच्या समस्या निर्माण होतात. शारीरिक स्वास्थ्य, तासन्तास स्क्रीनसमोर बसणे, व्यायामाची कमतरता यामुळे पाठदुखी, लठ्ठपणा, मधुमेह, बिघडता रक्तदाब आदी व्याधी वाढण्याचे प्रमाण वाढते. कौटुंबिक जीवन, लग्न, मुले, पालक, समाजकार्य या गोष्टींसाठी वेळ उरत नाही. घरातील नाती संघर्षमय होऊ लागतात. म्हणूनच काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल साधल्यास काम अधिक एकाग्रतेने आणि कमी ताणात होऊ शकते. 'बर्नआऊट'च्या समस्येमुळे अनेक जण नोकरी बदलतात; पण योग्य दैनंदिन जीवनात समतोल ठेवल्यास दीर्घकालीन करीअर घडते. कार्यकालीन काम आणि वैयक्तिक आयुष्यातील समतोल म्हणजे कामाच्या जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक गरजा, कुटुंब, आरोग्य तसेच सामाजिक जीवन यामध्ये संतुलन राखणे. कामाचे तास वाढतात आणि विश्रांतीला वेळ मिळत नाही, तेव्हा हा समतोल बिघडतो. विशेषतः इंटरनेट, फोन वर्किंग आणि 'वर्क फ्रॉम होम'सारख्या प्रथा पूर्वी फक्त आयटी उद्योगात होत्या. त्या आता इतर उद्योगांमध्येही प्रचलित आहेत. हा विषय सध्याच्या कॉर्पोरेट जगतात खूप महत्त्वाचा आहे, विशेषतः केरळमध्ये समोर आलेल्या 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयकाच्या पृष्ठभूमीवर त्याची विशेष चर्चा झाली.

मुळात कुणी किती काम करायचे, त्याचे मूल्यमापन (पगार) हे जिकिरीचे विषय आहेत. स्मार्टफोन, ई-मेल आणि मेसेजिंग ॲप्समुळे कर्मचाऱ्यांनी कामाच्या वेळेनंतरही उपलब्ध राहणे अपेक्षित असते. यामुळे कामकाजाच्या वेळेच्या सीमा अस्पष्ट होतात. अनेक कंपन्यांमध्ये, खास करून खाजगी क्षेत्रात, जास्त तास काम करणे हे समर्पणाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर जास्त वेळ काम करण्याचा अघोषित दबाव असतो. ऑक्टोबर २०२३ मध्ये इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती यांनी एका पॉडकास्टमध्ये केलेल्या विधानामुळे मोठा वाद निर्माण झाला. त्यांनी भारतीय तरुणांना आठवड्यातून ७० तास काम करण्याचा सल्ला दिला. त्यांनी म्हटले की, भारताला चीनसारख्या देशांशी स्पर्धा करून मोठी प्रगती करायची असेल, तर जर्मन आणि जपानी लोकांनी दुसऱ्या महायुद्धानंतर जसे केले, त्याचप्रमाणे उत्पादकता वाढवण्यासाठी भारतीय तरुणांनी खूप कष्ट केले पाहिजेत. त्यांनी स्वतः इन्फोसिसच्या सुरुवातीच्या काळात दर आठवड्याला ७० तासांपेक्षा जास्त काम केल्याचे सांगितले. मूर्ती यांच्या विधानानंतर काही महिन्यांनी 'लार्सन ॲण्ड टुब्रो' या कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यन यांच्या एका अंतर्गत बैठकीतील वक्तव्यामुळे आणखी मोठा वाद निर्माण झाला. सुब्रमण्यन यांनी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून ९० तास काम करण्याची सूचना दिली. त्यांनी म्हटले. 'मला तुम्हाला रविवारी काम करायला लावता येत नाही, याचे दुःख आहे. तुम्हाला रविवारी काम करायला लावल्यास मला जास्त आनंद होईल, कारण मी स्वतः रविवारी काम करतो.'

सुब्रमण्यन यांनी नंतर स्पष्ट केले की, त्यांची टिप्पणी अनौपचारिक बैठकीत करण्यात आली होती आणि ते कंपनीचे धोरण नव्हते. एकंदर काय, तर कार्यकालीन काम, ताणतणाव, सुट्टी, कुटुंबाबरोबर घालवलेले क्षण (ज्यामुळे तणाव कमी होतो, मानसिक आरोग्य सुधारते) हे सर्व कळीचे मुद्दे आहेत. बहुराष्ट्रीय उद्योगात ग्राहक परदेशी असतो तिथे वेळेच्या फरकामुळे अनेकदा रात्री बेरात्रीही काम करावे लागते. ही कार्यसंस्कृती आणि कार्यालयाला जायला लागणारा वेळ (त्यात ट्रॅफिक जॅम) या बाबींमुळे जास्त पगार असणाऱ्या आयटीमधील नोकऱ्या अनेकांना नकोशा वाटत आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्ये केरळने 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल सादर केले. कामाच्या ठिकाणी आरोग्यपूर्ण सीमा जपण्यासाठी ते एक लहान पण महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे विधेयक कर्मचाऱ्यांना कार्यालयाच्या वेळेनंतर कामाशी संबंधित संवादापासून 'स्विच ऑफ' करण्याचा कायदेशीर अधिकार देते. केरळ विधानसभेत औपचारिकपणे सादर कर्तण्यात आलेले हे बिल विधिमंडळाच्या विचारासाठी सादर करण्यात आले. सध्या, हे विधेयक विधानसभेत तपासणीखाली असून ते समिती पुनरावलोकन, सुधारणा आणि मतदानाच्या अधीन आहे. ते कायद्यात रूपांतरित झाल्यास कामगार विभागाने अधिसूचित केलेल्या विशिष्ट नियमांनुसार लागू होऊ शकते. तसे झाल्यास केरळ हे 'राईट टू डिस्कनेक्ट' लागू करणारे भारतातील पहिले राज्य ठरेल. सध्या आयटी उद्योग प्रामुख्याने बंगलोर, चेन्नई, हैदराबाद, पुणे, गुरगाव अशा शहरांमध्ये केंद्रित आहे. त्यामुळे इतर राज्यांवरही या घटनेचा प्रभाव पडू शकतो. अर्थात या कायद्याची अंमलबजावणी कशी करणार हा देखील एक मोठा प्रश्न आहे. त्यातच सध्या आयटी क्षेत्रात खूप अनिश्चितता आहे. नोकरी टिकवणे अनेकांना जास्त महत्त्वाचे वाटत आहे. भारतीय आयटी उद्योगाने तरुणाईला उत्तम कारकीर्दीची संधी दिली असली तरी कामाचा ताण, डेडलाईन्सचा दबाव, तंत्रज्ञानाची शर्यत आणि घरकामाचा गोंधळ यामुळे गमावलेली मनःशांती ही आजची सर्वांत मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे आयुष्यात समतोल साधण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन, व्यायाम, मानसिक शांतता तंत्र, छंद जोपासणे आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर आवश्यक आहे. कंपन्यांनीही लवचीक वेळापत्रक, हायब्रिड मॉडेल, वास्तववादी डेडलाईन्स आणि मानसिक आरोग्य कार्यक्रम देणे गरजेचे आहे. असा समतोल साधणे केवळ कंपनीची जबाबदारी नाही; तर कर्मचारी, कुटुंब, व्यवस्थापन आणि समाज यांच्या सामूहिक प्रयत्नांवर ते अवलंबून आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# जिल्हा परिषद शाळांचे सामाजिक अंकेक्षण

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागांतर्गत राबविल्या जात असलेल्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचे सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट) ८ जानेवारीपासून सुरू झाले आहे. पहिल्या टप्प्यात करण्यात येत असलेल्या सामाजिक अंकेक्षणात अमरावती, बुलढाणा, वर्धा, पुणे, अहिल्यानगर इत्यादी जिल्ह्यांतील शाळांचा समावेश आहे. जागतिक बँक आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या पारदर्शक कामकाजासाठी 'सोशल ऑडिट' (सामाजिक अंकेक्षण) अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळेला मिळणारा निधी, खर्च, राबवल्या जाणाऱ्या योजना आणि शैक्षणिक गुणवत्ता यांची माहिती समाजासमोर म्हणजे पालक आणि ग्रामस्थांपुढे ठेवून त्याचे मूल्यमापन करणे म्हणजे सोशल ऑडिट. शालेय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणणे,

शालेय पोषण आहार, मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेश वाटपाची खातरजमा करणे, शाळेच्या भौतिक सुविधा म्हणजे स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, इमारत यांची पाहणी करणे, निधीचा विनियोग नियमानुसार झाला आहे की नाही हे तपासणे. हा मुख्य उद्देश या अंकेक्षणामागे आहे.



आपण नेहमी शालेय पोषण आहारात घोळ, पोषण आहारातील तांदूळ बाजारात विकला, शालेय पोषण आहारात अळ्या आढळल्या, इत्यादी प्रकारच्या बातम्या वाचतो, ऐकतो. या अंकेक्षणात शालेय पोषण आहारातील त्रुटी शोधून त्या दुरुस्त करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, शाळेतील भौतिक सुविधा म्हणजे पायाभूत सुविधांची कमतरता, स्वच्छता, विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृह, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, आरोग्यदायी वातावरण आहे की नाही याची तपासणी केली जाणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या दिवसेंदिवस खालावत आहे. तेव्हा, पालक व विद्यार्थ्यांना पुन्हा जि. प. शाळेकडे वळविण्यासाठी अशाप्रकारचे अंकेक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे. राज्यातील ६५ हजार शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या लाभांचे या उपक्रमात अंकेक्षण होणार आहे. महाराष्ट्र शिक्षण परिषदेने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व सामाजिक पारदर्शकता सोसायटीसोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार २०२५-२०२६ मध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील १३ हजार शाळांचे सोशल ऑडिट होणार आहे. शाळास्तरावरील अंकेक्षण झाल्यावर दोन दिवसांत गट स्तरावर जनसुनावणी होणार आहे. त्याची तारीख, वेळ, स्थळ याबाबतची माहिती संबंधित अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक, पालक व शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना कळविण्यात येणार आहे. या अंकेक्षण प्रक्रियेचे राज्य समन्वयक म्हणून राहुल जोगदंड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अशाप्रकारे जिल्हा परिषद शाळांचे सामाजिक अंकेक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण, ग्रामीण भागातील शाळांमध्ये अनेकदा गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येते. काल परवाच इगतपुरी तालुक्यातील करंजवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एक घृणास्पद प्रकार उघडकीस आला. तिसऱ्या वर्गात शिकणाऱ्या बालिकेवर त्याच शाळेतील एका शिक्षकाने तब्बल आठ महिने अत्याचार केला. अर्थात आता या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली. त्या नराधमाला पोलिसांनी अटक केली. तर, दुसरी घटना सिन्नरमध्ये घडली. एका इंग्रजी शाळेतील दुसऱ्या वर्गातील विद्यार्थिनीचा एका शिक्षकाने विनयभंग केला. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना रोखण्यासाठी व विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी सोशल ऑडिट महत्त्वाचे ठरते. तसेच, शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या सुदृढ असला पाहिजे. कारण सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करते. त्यासाठी शासनाने शालेय पोषण आहार सुरू केला. पण, त्यातही गैरप्रकार होतात. हे निश्चितच भूषणावह नाही. या सर्व बाबींवर नियंत्रण मिळविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने सोशल ऑडिट सुरू केले आहे. या अंकेक्षणाचा अहवाल शासनाला प्राप्त झाल्यावर त्यात दर्शविण्यात आलेल्या त्रुटी, उपाय योजनांची शासनाने दखल घेऊन जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या तरच, या सामाजिक अंकेक्षणाचे फलित मिळेल, एवढे नक्की!

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# नितीन नवीन यांच्या नेतृत्वाचा कस

भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांनी मंगळवारी सूत्रे स्वीकारली. भाजपचेच नाही तर देशातील सर्व राष्ट्रीय पक्षातील सर्वांत तरुण अध्यक्ष म्हणून त्यांच्या नावाची नोंद झाली आहे. भाजप जेवढा तरुण तेवढेच त्याचे राष्ट्रीय अध्यक्षही तरुण आहेत, योगायोग म्हणजे दोघेही एकाच वयाचे म्हणजे ४५ वर्षांचे आहेत. भाजप हा पार्टी विथ डिफरन्स म्हणून ओळखला जातो, म्हणजे भाजप हा देशातील अन्य राष्ट्रीय पक्षांपेक्षा आचार, विचार आणि कृतीने वेगळा पक्ष आहे. आपल्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड करताना भाजपने हे दाखवून दिले.

भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे, तर काँग्रेस हा नेत्यांचा. त्यामुळे काँग्रेसमध्ये आजपर्यंत एकाही कार्यकर्त्यांची पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली नाही, तर कोणत्या तरी मोठ्या त्यातही गांधी घराण्यातील नेत्याच्या गळ्यातच अध्यक्षपदाची माळ टाकण्यात येते. गांधी घराण्यातील नेता अध्यक्ष होत नसेल तर त्या घराण्याच्या चरणी आपली निष्ठा वाहणाऱ्या नेत्याला अध्यक्ष केले जाते. पण भाजपमध्ये नितीन नवीन यांच्यासारख्या तळागाळातील, तसेच पक्षाच्या समर्पित आणि प्रामाणिक नेत्याची पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. एवढेच नाही तर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन हेच संघटनात्मक बाबतीत माझे 'बॉस' असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे हे माझे बॉस असल्याचे विधान कधी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या तोंडून कोणाला ऐकू आले नाही. काँग्रेसमध्ये खडगे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी पक्षात त्यांचे स्थान सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा यांच्यानंतर चौथ्या क्रमांकावर आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. त्या पृष्ठभूमीवर नितीन नवीन हेच माझे बॉस हे मोदी यांचे विधान उठून दिसणारे आहे. राष्ट्रीय राजकारणात नसणारे पण पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झालेले नवीन हे नितीन गडकरी यांच्यानंतर दुसरे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यांच्या तुलनेत गडकरी हे तेव्हा राष्ट्रीय राजकारणात नसले तरी चर्चित व्यक्तिमत्त्व होते. देशातील लोक त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून महाराष्ट्रात केलेल्या कामासाठी ओळखत होते. योगायोग म्हणजे अध्यक्ष होण्याआधी गडकरी यांच्याप्रमाणे नितीन नवीनही बिहारमध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री होते. नितीन गडकरी शिवसेनेचे मनोहर जोशी यांच्या मंत्रिमंडळात तर नबीन हे जदयुचे नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. म्हणजे दोन्ही नेते मित्रपक्षाच्या नेतृत्वातील युतीच्या मंत्रिमंडळात होते.



१९८० मध्ये भाजपची स्थापना झाल्यापासून नितीन नवीन भाजपाचे अध्यक्ष म्हणून पंधरावे तर व्यक्ती म्हणून बारावे अध्यक्ष आहेत. जगतप्रकाश नड्डा यांच्याकडून नवीन यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली. जानेवारी २०२० ला नड्डा यांची भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. सलग सहा वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवणारे नड्डा हे अटलबिहारी वाजपेयी आणि अमित शाह यांच्यानंतरचे तिसरे नेते आहेत. १९८० मध्ये भाजपाची स्थापना झाल्यानंतर अटलबिहारी भाजपाचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष झाले. १९८० ते १९८६ असे सलग सहा वर्षे वाजपेयी यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. विशेष म्हणजे वाजपेयी यांनी नंतर सहा वर्षे देशाचे पंतप्रधानपदही यशस्वीपणे सांभाळले. देशाचे पंतप्रधान झालेले वाजपेयी हे भाजपाचे आतापर्यंतचे तरी एकमेव अध्यक्ष आहेत. नरेंद्र मोदी सलग अकरा वर्षांपासून देशाचे पंतप्रधान आहेत, पण ते भाजपाचे अध्यक्ष कधी नव्हते. लालकृष्ण अडवाणी देशाचे उपपंतप्रधान झाले, पण पंतप्रधानपदाने त्यांना नेहमीच हुलकावणी दिली. भाजपाचे सर्वाधिक काळ अध्यक्षपद भूषवण्याचा बहुमान लालकृष्ण अडवाणी यांच्या नावावर आहे. अडवाणी यांनी तीन कार्यकाळ मिळून अकरा वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. तर सर्वांत कमी काळ भाजपाचे अध्यक्षपद सांभाळण्याचा विक्रम बंगारू लक्ष्मण आणि जना कृष्णमूर्ती यांच्याकडे आहे.

१९८६ ते १९९१ अशा पहिल्या कार्यकाळात अडवाणी पाच वर्षे भाजपाचे अध्यक्ष होते. दुसऱ्या कार्यकाळात १९९३ ते १९९८ असे आणखी पाच वर्षे अध्यक्ष होते. अडवाणी यांचा भाजप अध्यक्ष म्हणून तिसरा कार्यकाळ २००४ ते २००५ असा एक वर्षाचा होता. डॉ. मुरलीमनोहर जोशी १९९१ ते १९९३ असे दोन वर्ष भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. १९९८ ते २००० अशी दोन वर्षे कुशाभाऊ ठाकरे भाजपाचे अध्यक्ष होते. बंगारू लक्ष्मण आणि जना कृष्णमूर्ती सर्वांत कमी कार्यकाळ म्हणजे प्रत्येकी एक वर्ष भाजपाचे अध्यक्ष होते. बंगारू लक्ष्मण यांनी २००० ते २००१ तर जना कृष्णमूर्ती यांनी २००१ ते २००२ या काळात भाजपाचे अध्यक्षपद सांभाळले. २००२ ते २००४ या काळात व्यंकय्या नायडू भाजपाचे अध्यक्ष होते. व्यंकय्या नायडू यांनी नंतर देशाचे उपराष्ट्रपतिपदही भूषवले. उपराष्ट्रपतिपदाची जबाबदारी सांभाळणारे नायडूही भाजपाचे एकमेव अध्यक्ष आहेत. २००५ ते २००९ असे चार वर्ष राजनाथसिंह भाजपाचे अध्यक्ष होते. २००९ ते २०१३ असे चार वर्ष नितीन गडकरी यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. २०१३ ते २०१४ असे नंतर एक वर्ष पुन्हा राजनाथसिंह भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. २०१४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने राजनाथसिंह यांच्या नेतृत्वात लढवली आणि देशाच्या इतिहासात प्रथमच स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळवले. २०१४ ते २०२० असे सलग सहा वर्ष अमित शाह यांनी भाजपाचे अध्यक्षपद सांभाळले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी अमित शाहच भाजपाचे राष्ट्रीय होते. या निवडणुकीत भाजपाने स्वबळावर दुसऱ्यांदा बहुमत मिळवले. अमित शाह यांच्यानंतर जगतप्रकाश नड्डा यांच्याकडे भाजपाचे अध्यक्षपद आले. २०२४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने नड्डा यांच्या अध्यक्षपदाच्या काळात लढवली, पण या निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळवता आले नाही. भाजपाचा विजयरथ २४० वर अडकला.

२०२९ ची लोकसभा निवडणूक भाजपा नितीन नवीन यांच्या नेतृत्वात लढवणार हे निश्चित आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळवून देण्याचे आव्हान नवीन यांच्यासमोर राहणार आहे. हे शिवधनुष्य ते यशस्वीपणे पेलतील यात शंका नाही. पण त्याला अजून तीन वर्ष आहेत, त्याआधी या वर्षात तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांत विधानसभा निवडणूक होणार आहे. या दोन राज्यांत आतापर्यंत भाजपाला कधीच सत्ता मिळाली नाही. त्यामुळे या राज्यात भाजपाला सत्तेवर आणण्याचे आव्हान नवीन यांच्यासमोर आहे, यातच त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी या दोन राज्यांतील निवडणूक नवीन यांना भाजपाला कोणत्याही स्थितीत जिंकून द्यावी लागणार आहे.

९८८१७१७८१७

## विचारांना चालना देणारा कुटुंब प्रबोधन विशेषांक

विद्याभारती विदर्भ द्वारा नुकताच प्रकाशित झालेला संस्कार साधनाचा कुटुंब प्रबोधन हा विशेषांक कुटुंब संस्थेचे महत्त्व नव्याने आणि अधिक व्यापक स्वरूपात मांडणारा आहे असे जाणवले. शिक्षण व संस्काराच्या माध्यमातून समाज घडणीचे कार्य करणाऱ्या विद्या भारतीने या विशेषांकातून आजच्या काळाची नाडी अचूक ओळखली आहे. बदलत्या सामाजिक वास्तवात दुर्लक्षित होत चाललेल्या कुटुंब मूल्यांवर या अंकातील सर्वच लेख प्रकाश टाकतात आणि विचार प्रवृत्त करतात. यातील लेख केवळ वैचारिक मांडणीपुरते मर्यादित न राहता कुटुंब संस्थेचे सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक महत्त्व समजावून सांगतात. कुटुंब हे संस्काराचे प्रथम केंद्र असून समाज सुदृढतेचा पाया आहे ही भावना संपूर्ण अंकातून प्रभावीपणे व्यक्त होते. आधुनिक जीवनातील आव्हाने, नातेसंबंधातील बदल आणि त्यावर उपाययोजनांची दिशा या सर्व बाबींचे समतोल व सकारात्मक चिंतन यातील लेखांतून घडते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंच परिवर्तन संकल्पनेतील एक महत्त्वाचा घटक म्हणून कुटुंब प्रबोधन या विषयावर वैचारिक व व्यवहार्य दर्शन घडविणारा हा विशेषांक कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्या सुदृढतेसाठी विचार करणाऱ्यांनी वाचावा. कुटुंबातील सर्व सदस्यांसह वाचावा आणि त्यातील विचार जीवनात उतरवावेत असे वाटते.

**वसंत ढवळे**/नागपूर

●● ●●

## विविध ठिकाणची वसंत पंचमी

वसंत पंचमी म्हणजे माघ महिन्यात शुक्ल पंचमीला साजरा होणारा सण! या दिवशी वसंत ऋतूचे आगमन होते. ज्ञान व कलेची देवी सरस्वतीची पूजा केली जाते. याला श्रीपंचमी असेही म्हणतात. हा दिवस देवी सरस्वतीचा जन्मदिवस मानला जातो. अशी मान्यता आहे की सृष्टी रचयिता ब्रह्माने जेव्हा जीव आणि मनुष्यांची रचना केली, तेव्हा ब्रह्माने आपल्या संसाराकडे बघितले. त्यांना सगळीकडे निर्जन असल्याचे जाणवलं. वातावरण अगदी शांत होतं ज्यात कुठलीही वाणी नव्हती. हे बघून ब्रह्मा उदास आणि असंतुष्ट झाले. ब्रह्मांनी प्रभू विष्णूच्या आज्ञेने आपल्या कमंडलूतून पाणी घेऊन पृथ्वीवर शिंपडले. धरतीवर पडलेल्या त्या पाण्यामुळे

## वाचक पत्रे

पृथ्वीवर कंपन झाले आणि एक अद्भुत शक्तीच्या रूपात चतुर्भुजी अर्थात चार भुजा असलेली एक सुंदर स्त्री प्रकट झाली. त्या देवीच्या एका हातात वीणा, दुसऱ्या हात वरमुद्रेत म्हणजे वर देणारा आणि इतर दोन हातांत पुस्तक आणि माळ होती. ब्रह्माने त्या स्त्रीला वीणा वाजवण्याचा आग्रह केला. वीणेच्या सुरांमुळे पृथ्वीवरील सर्व जीव-जंतूंना वाणी प्राप्त झाली. त्या क्षणानंतर या देवीला सरस्वती असे म्हटले गेले. त्या देवीने वाणीसह विद्या आणि बुद्धी दिली. म्हणून वसंत पंचमी देवी सरस्वतीच्या जन्मोत्सवच्या रूपात साजरी केली जाते. या देवीला वागीश्वरी, भगवती, शारदा, वीणावादनी आणि वाग्देवी यासह अनेक नावे आहेत. संगीताची उत्पत्ती केल्यामुळे तिला संगीताची देवी म्हणून देखील पूजलं जातं. या दिवशी सरस्वती देवीला नैवेद्य दाखवण्यासाठी भारतात विविध प्रांतात बुंदीचे लाडू, नारळाची बर्फी, केशरी राजभोग, विविध प्रकारची भजी असे पदार्थ केले जातात.

पेशव्यांच्या काळात हा उत्सव महाराष्ट्रात उत्साहाने साजरा होत असे. या दिवशी लोक आपल्या नातेवाईकांना फुलांचा किंवा हिरव्या देठाच्या धान्याच्या कणसांचा गुच्छ भेट म्हणून देत असत. बाजीराव पेशवे हा उत्सव आपल्या सरदारांसोबत साजरा करायचे. केशरी रंगाची उधळण केली जात असे. ब्राह्मण, शास्त्री आणि अन्य सन्माननीय व्यक्तीला भोजन व कलावंतिणीचे नृत्य असे स्वरूप असे. मथुरा, वृंदावन, राजस्थान या भागात वसंत पंचमीच्या दिवशी गणपती, इंद्र , शिव आणि सूर्य यांची प्रार्थना केली जाते. बंगाल प्रांतात या दिवशी भक्तिगीते म्हणत प्रभातफेरी काढली जाते. हिवाळा संपून वसंत ऋतूचे आगमन होते. झाडांना, वृक्षांना, वेलींना नवी पालवी फुटते. त्यामुळे आनंदाचे वातावरण असते. लोक पिवळ्या किंवा गुलाबी रंगाचे वस्त्र परिधान करतात कारण हे रंग वसंत ऋतूचे आणि पिवळ्या मोहरीच्या फुलांचे प्रतीक आहेत. वसंत पंचमी ही कृषी संस्कृतीशी संबंधितही आहे. या दिवशी नवान्न इष्टी असा एक छोटासा यज्ञ करतात. शेतात तयार झालेल्या नवीन पिकांच्या ओंब्या, कणसं देवाला अर्पण करतात. वसंत म्हणजे आशा आणि सिद्धीचा सुंदर मिलाप आहे. आपणही या वसंत ऋतूचे स्वागत उत्साहात करूया.

**वंदना प्रमोद देशपांडे**/९४२२४४४९७७

## रामलला प्राणप्रतिष्ठा त्रिवर्षपूर्ती

रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा तिसरा वर्धापनदिन २२ जानेवारी रोजी साजरा केला जाणार आहे. त्यात अजून एक शुभ शकुन म्हणजे श्री गणेश जयंती याच दिवशी आली आहे. त्यामुळे यावेळी एक अपूर्व योग साधला गेला आहे. अयोध्येतील राम मंदिर ही केवळ ऐतिहासिक कामगिरी नाही तर भारतीय संस्कृती आणि श्रद्धेचा देखील हा उत्सव आहे. गेल्या तीन वर्षात राम मंदिराने दर्शनार्थींच्या संख्येचे तसेच दिलेल्या दानाचे अनेक विक्रम मोडले आहेत. १ जानेवारीला दर्शन घेणाऱ्या भाविकांनी तर गेल्या काही वर्षांतील अनेक विक्रम मोडलेत. या सगळ्यामागे प्रभू श्रीरामांवर असलेल्या श्रद्धेचा, एकात्मतेचा प्रभाव आहे. रामलला प्राणप्रतिष्ठा दिवस हा दिवाळीप्रमाणे भव्य आध्यात्मिक पर्व असल्याप्रमाणे मानला जातो. या दिवसात सूर्य उत्तरायण कक्षेत असतो. माघ महिना हा शुभ आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जातो. सूर्याची ही स्थिती आत्मविश्वास, तेज आणि धर्माला मजबूत करते. म्हणून हा दिवसाचे खास आध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व आहे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### घुंगरू कला केंद्रावर पोलिसांची कारवाई

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
सोलापूर ते बार्शी रोडवरील मौजे खेडपाटी येथील घुंगरू कला केंद्रावर पोलीसांनी छापा मारत ६ लाख ५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोउपनि महेश घोडके, महिला व पुरूष पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मौजे खेड पाटी येथील घुंगरू कला केंद्रावर २१ जानेवारी रोजी छापा टाकला तेंव्हा त्यांना घुंगरू कला केंद्रामधील दोन महिला ह्या बिभत्सपणे अश्लील हावभाव करून तेथे ठेवलेल्या साऊंड बॉक्सच्या संगीताच्या तालावर नाचत असल्याचे दिसुन आले. घुंगरू केंद्राचे मॅनेजर अक्षय नागनाथ माने यांनी त्यांचे मालक अरूण रोडगे हे असल्याचे सांगितले. या कला केंद्रातुन साऊंड बॉक्स व ६ लाख रूपये किंमतीची मारूती कंपनीची स्वीप्ट मॉडेलची चारचाकी कार असा मुद्देमाल हस्तगत केला. याबाबत मपोउपनि डोंगरीताट यांनी घुंगरू येथील कला केंद्रामधील २ महिला, ३ प्रेक्षक, मॅनेजर केंद्राचे मालक असे ७ आरोपी विरूध्द दिलेल्या फिर्यादी वरून सोलापूर तालुका, पोलीस ठाणेस गुन्हा दाखल झाला असून गुन्हयाचा तपास सुरू आहे. ही कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि महेश घोडके, मपोउपनि सीमा डोंगरीतोट, पोहवा जगताप, पोना अभिजित साळुंखे, पोकों अकबर शेख, महिला पोलीस अंमलदार पाटील यांनी बजावली.

# कस्तुरबा मंडई, बारा इमाम चौक परिसरात अतिक्रमण विरोधात मोठी कारवाई

## १२ खोके जागेवरच केले निष्काशित तर ४ चार चाकी गाड्या केल्या जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक पथकाने आज सलग दुसऱ्या दिवशी बाळीवेस, कस्तुरबा मंडई, बारा इमाम चौक परिसरात मोठ्या प्रमाणात कारवाई केली. येथील कस्तुरबा मंडई समोर, स्टेट बँक ऑफ इंडिया, जैन गुरुकुल हायस्कूल समोरील रोडवरील अतिक्रमित १२ खोके जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशित करण्यात आले तर चार चाकी हात गाड्या जप्त करण्यात आल्या.



महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून पथकाने ही कारवाई केली. सलग दुसऱ्या दिवशी बाळीवेस परिसरातील कस्तुरबा मार्केट, लिंगशेट्टी मंगल कार्यालय परिसरात महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली. कस्तुरबा मंडई, स्टेट बँक ऑफ इंडिया या परिसरात केलेल्या कारवाईत १२ खोके जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशित करण्यात आले. चार चार चाकी हातगाड्या जप्त केल्या आहेत. त्याचबरोबर रस्त्याच्या कडेला टाकण्यात आलेले १० छत पत्रे काढण्यात आले. बारा इमाम चौक परिसरातही कारवाई करण्यात आली. या ठिकाणी एक खोका निष्काशित करण्यात आला. तसेच इतर साहित्य जप्त केले.

दरम्यान, कस्तुरबा मंडई समोरील रस्त्याच्या कडेला आम्ही व्यवसाय करतो. सोलापूर महानगरपालिकेची पावती करतो. दोन वर्ष झालं आम्ही पैसे भरतो. आम्हाला आधी अतिक्रमण काढा असं काही सांगितलं नाही. येऊन सरळ जेसीबी लावलेत. आज आमचे सगळं नुकसान झाले. सगळे पत्रे पाडले. आमचे सगळ सामान पत्र्याखाली सापडले. पन्नास ते साठ वर्ष झाले आम्ही गुळ, नारळ, हार, उदबत्ती, फळ विकून घरचा गाडा हाकतो. आता आमचा सगळा माल खराब झाला. याचं नुकसान कोण भरून देणार असा सवाल येथील वयोवृद्ध व्यापाऱ्यांनी उपस्थित केला.

### अतिक्रमण विरोधी कारवाई सुरूच राहणार : बनसोडे

शहरात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि सार्वजनिक रस्ते मोकळे करण्यासाठी अशा कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.

### विरोधाला न जुमानता केली कारवाई

कस्तुरबा मंडई समोरील कारवाई वेळी काहीजणांनी विरोध केला मात्र अतिक्रमण करणाऱ्यांना अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी अडथळा केल्यास कारवाईचा इशारा दिला. त्यानंतर विरोध शांत झाला. पोलीस बंदोबस्तात अखेर ही कारवाई पूर्ण करण्यात आली.

# श्री मार्कंडेय महामुनींच्या जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनीच्या जन्मोत्सवानिमित्त झालेल्या रक्तदान शिबिरात २ हजार ४५५ जणांनी रक्तदान केले. श्री मार्कंडेय जन्मोत्सव हा संस्थेच्या सर्व शाखेने कुचन प्रशालेत चारशे कर्मचाऱ्यांनी हा जन्मोत्सव उत्साही वातावरणात एकत्रित साजरा केला. मंगळवारी सकाळी सात वाजता श्री मार्कंडेय महामुनीच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम यांच्या हस्ते करण्यात आले याचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सूर्यप्रकाश कोठे, नगरसेवक मेघनाथ येमूल, प्रथमेश कोठे, डॉ. अजय पोन्नम, विनायक कोंड्याल, दीपिका येलदंडी ,कविता गज्जम, विजय चिप्पा ,व्यंकटेश कोंडी, शेखर इगे,सिद्धेश्वर कमटम ,सतीश सिरशिल्ला ,प्रशांत पल्ली, उज्वला दासरी ,स्वाती बडगु, सुनीता कामाठी , युवराज सरवदे ,डॉ. माणिक गुर्रम ,रमेश विडप, नागेश वल्याळ, दयानंद कोंडाबत्तीनी ,अमृतदत्त चिन्नी, अशोक इंदापूरे, हरिदास पोटाबत्ती, अजय अन्नलदास ,संतोष सोमा, श्रीनिवास गड्डम ,पत्रकार श्रीनिवास दासरी, वेणुगोपाल गाडी, मिलिंद कुलकर्णी ,दीपक सोमा, श्रीनिवास गाजूल , पेंटप्पा गड्डम विश्वस्त सर्वश्री पांडुरंग दिड्डी ,श्रीधर चिट्याल, नागनाथ गंजी, विजयकुमार गुल्लापल्ली, व्यंकटेश आकेन, मधुकर कट्टा ,प्रभाकर आरकाल, गणेश गुज्जा, श्रीनिवास जोग, संगीता इंदापूरे, नागनाथ , हरीष कोंडा, श्रीनिवास गड्डम, नरेश श्रीरामदास, रामदास इप्पाकायल, अंबादास गज्जम, अरविंद कुचन, श्रीनिवास इप्पाकायल, निलेश सरगम, यशवंत इंदापूरे आदी उपस्थित होते.

सिव्हील हॉस्पीटल, डॉ. हेडगेवार, इरपण्णा बोल्ली, दमाणी, अश्विनी, सिद्धेश्वर, मेडिकेअर, मल्लिकार्जुन, अक्षय, सोलापूर रक्तपेढी, बसवेश्वर रक्तपेढी आदी रक्तपिढ्यांनी रक्त संकलन केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य अनिल निंबाळकर, प्राचार्य युवराज मेटे, गीता सादूल, श्रीनिवास चिप्पा, मुख्याध्यापक शारदा गोरट्याल, अजिता पिल्लाई, कल्पना दासरी, पुलकेशी संगा, व्यंकटेश पोटाबत्ती, मंजुळा कुडक्याल, नागेश खुने, उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, प्रणिता सामल, मलिकार्जुन जोकारे, परमेश्वर बाबळसुरे आदींनी सहकार्य केले.

# काळे बंधू भाजपमध्ये तर भाजपचे माजी जि.प. सदस्य राष्ट्रवादीत

## पंढरपुरात मोठ्या राजकीय घडामोडी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जानेवारी -**
जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (ता.२१) पंढरपूर तालुक्यात मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. राष्ट्रवादीचे नेते कल्याणराव काळे, त्यांचे बंधु समाधान काळे, गणेश पाटील अखेर भाजपमध्ये सहभागी झाले. समाधान काळे यांच्या पत्नी मोनिका काळे यांना भाजपने वाखरीत तर गणेश पाटील यांच्या मातोश्री प्रफ्फुलता पाटील यांना भोसे जिल्हा परिषद गटातून उमेदवारी दिली आहे तर दुसरीकडे करकंब येथील भाजपचे माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब देशमुख यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे.

दरम्यान आमदार अभिजीत पाटील यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सर्व जागांवर तर भागीरथ भालके यांनीही तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून स्वतंत्र उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. मनसेने टाकळी आणि रोपळे पंचायत समिती गणातून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर भाळवणी पंचायत समिती गणातून उध्दव ठाकरे शिवसेनेचे जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

दरम्यान आमदार अभिजीत पाटील व त्यांच्या समर्थकांनी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसीलकार्य अशी पायी रॅली काढून शक्ती प्रदर्शन केले. रॅलीमध्ये पाटील समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## २८ फेब्रुवारी रोजी महाविधी सेवा शिबीर

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
मुंबई उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सुचनेनुसार आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यात दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी महा विधी सेवा शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरास सोलापूर न्यायिक जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती एन. जे. जमादार (मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ कोल्हापूर) तसेच न्यायमुर्ती फिरदोश पुनीवाला (मुंबई उच्च न्यायालय) उपस्थित राहणार आहेत. यामध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांविषयी समाजात जागरुकता निर्माण करणे, कल्याणकारी कायद्यांबाबत जनजागृती करणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांशी जोडणे व त्यांची कायदेशीर गरज समजून घेणे, योग्य कायदेशीर सल्ला देऊन समस्या सोडविणे आदींचा समावेश आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**वैद्यकीय कार्य**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर येथील रेल्वे रुग्णालयासाठी मुख्य वैद्यकीय अधीक्षक, सोलापूर, विभागीय रेल्वे रुग्णालय, सोलापूर येथे स्थानिक खरेदीसाठी खालील वस्तूंच्या पुरवठ्यासाठी ई-निविदा मागवत आहेत. वाटपाच्या तारखेपासून 24 महिन्यांच्या कालावधीसाठी. 1. कामाचे नाव आणि स्थान: डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे रुग्णालय, सोलापूर, मध्य रेल्वे येथे सेवा सुरू झाल्यापासून 02 वर्षांच्या कालावधीसाठी स्थानिक खरेदीसाठी दैनंदिन आधारावर 24x7, परवानाधारक विक्रेते/कंपन्या/रसायनशास्त्रज्ञांच्या पॅनेलमेंटसाठी दर करार. 02. निविदा सूचना क्रमांक: DRH-SUR-LP-CONS2026, दिनांक: 20/01/26, 03. निविदेची अंदाजे किंमत: रु. 10,13,066/- फक्त (रु. दहा लाख तेरा हजार सहासष्ट) 24 महिन्यांसाठी. 04. निविदा फॉर्मची किंमत: शून्य 05. बयाणा रक्कम (रु. निविदा मूल्याच्या 2%):- बयाणा रक्कम म्हणून रुपये 20260/- (रु. वीस हजार दोनशे साठ) (परत करण्यायोग्य) ऑनलाइन वेबसाइटद्वारे भरता येईल 06. निविदा फॉर्म सादर करण्याची आणि निविदा उघडण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 16/02/26 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 16/02/26 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. 07. निविदा कागदपत्र उपलब्ध: निविदा कागदपत्र cr.indianrailways.gov.in वेबसाइटद्वारे सूचित केले जाईल. 08. काम सुरू करण्याची वेळ: स्वीकृती पत्र जारी केल्यापासून 30 दिवसांच्या आत किंवा CMS/सोलापूरच्या सूचनांनुसार. 09. निविदा खर्च आणि ईएमडी, आवश्यक कागदपत्रे (जर असतील तर) जमा करण्यासाठी आणि निविदा कागदपत्रांवर स्पष्टीकरण मागण्यासाठी अधिकार आणि ठिकाण: फक्त www.ireps.gov.in या वेब पोर्टलच्या ई-पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन. 10. पात्रता निकष: निविदा देणाऱ्या संस्थेकडे IREPS मान्यताप्राप्त डिजिटल टोकन असणे आवश्यक आहे.
**मुख्य वैद्यकीय अधीक्षक**
**सोलापूर**
02
रेल्वे मार्गांचे अनधिकृत क्रॉसिंग करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**वैद्यकीय कार्य**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, सोलापूर येथील विभागीय रेल्वे रुग्णालयासाठी स्थानिक खरेदीसाठी खालील वस्तूंच्या पुरवठ्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. रेल्वे रुग्णालय, सोलापूरसाठी नवीन मुख्य वैद्यकीय अधीक्षक नियुक्त केल्याच्या तारखेपासून 24 महिन्यांच्या कालावधीसाठी. 01. कामाचे नाव आणि स्थान: डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे रुग्णालय, सोलापूर, मध्य रेल्वेसाठी दैनंदिन औषधांच्या पुरवठ्यासाठी परवानाधारक विक्रेते/कंपन्या/रसायनशास्त्रज्ञांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी दर करार, स्थानिक खरेदीसाठी 24x7, सेवेत रुजू झाल्याच्या तारखेपासून 02 वर्षांच्या कालावधीसाठी. 02. निविदा सूचना क्रमांक:- DRH-SUR-LP-MED2026, तारीख: 20.01.26., 03. निविदेची अंदाजे किंमत: रु. 24 महिन्यांसाठी 70,91,471.1/- फक्त (रुपये सत्तर लाख एक्याण्णव हजार चारशे एकहत्तर फक्त) 04. निविदा फॉर्मची किंमत: शून्य, 05. बयाणा रक्कम ठेव (निविदा मूल्याच्या 2%):- 1,41,830/- रुपये बयाणा रक्कम ठेव (रुपये एक लाख एकेचाळीस हजार आठशे तीस फक्त) (परत करण्यायोग्य) ऑनलाइन वेबसाइट www.ireps.gov.in द्वारे ई-पेमेंट गेटवेद्वारे भरता येईल. 06. निविदा कागदपत्रे सादर करण्याची आणि निविदा उघडण्याची अंतिम तारीख आणि वेळ: दिनांक: 16/02/26 दुपारी 3:00 वाजेपर्यंत निविदा उघडण्याची अंतिम तारीख आणि वेळ: दिनांक: 16/02/26 दुपारी 3:00 वाजेपर्यंत, 07. निविदा कागदपत्रे उपलब्ध:- निविदा कागदपत्रे cr.indianrailways.gov.in या वेबसाइटद्वारे सूचित केली जातील. 08. काम सुरू करण्याची वेळ: स्वीकृती पत्र जारी केल्यापासून 30 दिवसांच्या आत किंवा CMS/सोलापूरच्या सूचनांनुसार, 09. निविदा किंमत आणि EMD, आवश्यक कागदपत्रे (असल्यास) जमा करण्यासाठी आणि निविदा कागदपत्रांवर स्पष्टीकरण मागण्यासाठी प्राधिकरण आणि ठिकाण: www.ireps.gov.in या वेब पोर्टलच्या ई-पेमेंट गेटवेद्वारे फक्त ऑनलाइन. 10. पात्रता निकष:- निविदा देणाऱ्या संस्थेकडे IREPS मान्यताप्राप्त डिजिटल टोकन असावे.
**मुख्य वैद्यकीय अधीक्षक**
**सोलापूर**
03
रेल्वे मार्गांचे अनधिकृत क्रॉसिंग करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**वैद्यकीय कार्य**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर, रेल्वे रुग्णालय, सोलापूरचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक, विभागीय रेल्वे रुग्णालय, सोलापूरसाठी स्थानिक खरेदीसाठी खालील वस्तूंच्या पुरवठ्यासाठी ई-निविदा मागवत आहेत. 01. कामाचे नाव आणि स्थान: डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे रुग्णालय, सोलापूर, मध्य रेल्वेसाठी सेवा सुरू झाल्यापासून 02 वर्षांच्या कालावधीसाठी स्थानिक खरेदीसाठी दैनंदिन आधारावर (24x7) सर्जिकल वस्तूंच्या पुरवठ्यासाठी परवानाधारक विक्रेते/फर्म/केमिस्ट यांच्या यादीत समावेशासाठी दर करार. 02. निविदा सूचना क्रमांक: DRH-SUR-LP-SURG2026, दिनांक: 20/01/2026., 03. निविदेची अंदाजे किंमत: रु. 20,26,134/- (रुपये वीस लाख सव्वीस हजार एकशे चौतीस फक्त) 24 महिन्यांसाठी. 04. निविदा फॉर्मची किंमत: शून्य 05. बयाणा रक्कम (निविदा मूल्याच्या 2%): रु. 40,520/- (रुपये चाळीस हजार पाचशे वीस फक्त) (परत करण्यायोग्य) बयाणा रक्कम www.ireps.gov.in या वेबसाइटवरील ई-पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन भरता येते. 06. निविदा फॉर्म सादर करण्याची आणि निविदा उघडण्याची अंतिम तारीख आणि वेळ: दिनांक: 16/02/26 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. 07. निविदा कागदपत्र उपलब्ध: निविदा कागदपत्र cr.indianrailways.gov.in या वेबसाइटद्वारे सूचित केले जाईल. 08. काम सुरू करण्याची वेळ: स्वीकृती पत्र जारी केल्यापासून 30 दिवसांच्या आत किंवा सीएमएस/सोलापूर यांच्या सूचनांनुसार. 09. निविदा खर्च आणि ईएमडी, आवश्यक कागदपत्रे (असल्यास) जमा करण्यासाठी आणि निविदा कागदपत्रांवर स्पष्टीकरण मागण्यासाठी अधिकार आणि ठिकाण. www.ireps.gov.in या वेब पोर्टलच्या ई-पेमेंट गेटवेद्वारेच ऑनलाइन. 10. पात्रता निकष: निविदा देणाऱ्या संस्थेकडे IREPS मान्यताप्राप्त डिजिटल टोकन असावे.
**मुख्य वैद्यकीय अधीक्षक**
**सोलापूर**
04
रेल्वे मार्गांचे अनधिकृत क्रॉसिंग करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

## संत रोहिदास मध्यवर्ती जयंती अध्यक्षपदी हरिभाऊ वाघमारे





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
संत रोहिदास मध्यवर्ती जयंती उत्सव समिती सोलापूर या नोंदणीकृत उत्सव समितीची बैठक विजापूर रोड येथील संत रोहिदास संघटनेच्या कार्यालयामध्ये पार पडली. यावेळी ॲड. संतोष अंगुले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

बैठकीत संत रोहिदास मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी हरिभाऊ वाघमारे, कार्याध्यक्ष पदी रविकांत राझणीकर यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी उत्सव अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी रमेश खाडे, स्वामीराव माशाळे, सोपान थोरात, परशुराम शिंदे, अशोक आगावणे, बाळासाहेब सुरवसे, संतोष कांबळे, मनोज व्हनमारे, सोमनाथ चाबुस्कवार, लखन सालुटगे, अमोल साळे, सतिश व्हनकडे, बबलु राऊत, नागेश नरुटे, राजकुमार व्हनकोरे, सुर्यकांत वाघमारे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक मध्यवर्तीचे संस्थापक अध्यक्ष्ज्ञ विठ्ठल भाऊ यांनी केले. तर आभार चैतन्य घोडके यांनी मानले.

**जाहीर प्रसिध्दीकरण**
रे.मु.नं. ९८३/२०१५
पु.ने.ता. १३/०२/२०२६ नि. ११९
**बार्शी येथील मे. सि.ज. ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात**
**भागवत हजारे** - **वादी**
विरुध्द
**प्र.वादी नं. १ (ब)** - **प्र.वादी**
**राजुबाई बलभीम गोचरे**
सदरचा दावा वादीने दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होऊन त्याचा पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.
सदरकामातील प्र.वादी नं. १ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यात आले. त्या वारसांपैकी प्र.वादी नं. १(ब) हिचा निश्चित ठावठिकाणा नसल्याने तिला समन्सची बजावणी झाली नाही. प्र.वादी नं. १(ब) ला दाव्याची माहिती असून ती जाणूनबुजून समन्सची बजावणी करुन घेत नाही.
प्र.वादी नं. १(ब) चा दावा मिळकतीशी संबंध असल्यामुळे तिचे म्हणणे रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. दाव्याची चौकशी करताना प्र.वादी नं. १(ब)चे म्हणणेही विचारात घेणे गरजेचे आहे.
सबब, हे प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसांचे आत प्र.वादी नं. १(ब) यांनी स्वतः मे. कोर्टात हजर राहून म्हणणे दाखल करावे. मुदतीत म्हणणे दाखल न झाल्यास प्र.वादी नं. १(ब) यांना काहीही म्हणणे द्यायचे नाही, अस गृहीत धरून पुढील कारवाई करण्यात येईल. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. दि. ०८/०१/२०२६
**सही/-** **कनिष्ठ लिपीक**
**कोर्टाचा शिक्का**
**हुकूमावरुन** **सही/-** **सहाय्यक अधिक्षक** **मा. दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

**जाहीर समन्स**
सि.अ.नं. २०/२०१८
नि. ३६
**सोलापूर येथील श्री एस.व्ही. केंद्रे तदर्थ जिल्हा न्यायाधिश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधिश यांचे न्यायालयात**
**लक्ष्मण अमिनप्पा कट्टीमनी मयत वारस देविदास लक्ष्मण कट्टीमनी, वगैरे-५** — **अर्जदार**
विरुध्द
**धर्मराज शिवलिंग मैलारी, वगैरे - ८**
**४) सौ. शिला कृष्णा गोन्याल**
**५) सौ. शारदा मिलिंद पोतरे**
**६) श्री. सुभाष सुरजप्पा कोरे**
**७) अंबुबाई राजाराम येवलेकर** — **रिस्पॉडंट**
ज्याअर्थी तुम्ही सा.वाला नं. ४ ते ७ हे अपिल नोटीस बजावणीकामी अपिलात दिलेल्या पत्यावर नोटीस बजावणीकामी अपिलात दिलेल्या पत्यावर आढळून न आल्याने सदर अपिल नोटीस न बजावता परत व नवीन पत्ता माहित नाही करिता सदर अपिल कामी या दाव्याची नोटीस देखील जाहीरनामाद्वारे आहे. सदर मिळकत ही ज्या कोर्टाचे स्थळसिमेत असून सदर अपिलकामी नेमलेली तारीख १०/०२/२०२६ असून वेळ सकाळी ११ वाजता व आपण स्वतः अगर प्रतिनिधी / वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. यात कसुर केल्यास सदर प्रकरण आपले अपरोक्त एकतर्फी कायदेशीर तरतुद गुणअवगुण व निर्णयाकरिता कोर्ट तुमचेविरुध्द एकतर्फी आदेश करेल.
ही जाहीर नोटीस ता. २१/०१/२०२६
**सही/-** **क.लिपिक** **जि. व सत्र न्यायालय, सोलापूर**
**कोर्टाचा शिक्का**
**सही/-** **अधिक्षक** **जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**
दिवाणी किरकोळ अर्ज नं. १२७/२०२५
पु.ने.ता. २३/०२/२०२६ नि.नं. ५
**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात**
१) **समीर बंदेनवाज पठाण,** वय - ४६ वर्षे, धंदा - शेती, रा. धोत्रे, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **अमीर बंदेनवाज पठाण,** वय - ४४ वर्षे, धंदा- शेती, रा. धोत्रे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**
**अर्ज भारतीय वारसा कायदा क. ३७२ प्रमाणे-**
ज्याअर्थी, मयत बंदेनवाज दगडू पठाण नावे पोस्ट ऑफिस बार्शी शहर यांचेकडे १० वर्षीय राष्ट्रीय बचतपत्र त्याचा अनुक्रमांक 10NS/05NA970592 ते 10NS/05NS970631 यामध्ये जमा असलेली प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/- (दहा हजार रु.) अशी एकूण र.रु. ४,००,०००/- (चार लाख रु.) व त्यावरील पोस्टाचे नियमानुसार मिळणारे व्याजासह संपूर्ण रक्कम वगैरे मिळणेकामी यातील अर्जदार नं. १ व २ हे मयत बंदेनवाज दगडू पठाण यांचे कायदेशीर वारस असलेबाबत अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी सदरचा अर्ज केला आहे.
त्याअर्थी, २३ सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत बंदेनवाज दगडू पठाण यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २३/०२/२०२८ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.
कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे. ता. १३/०१/२०२६
**सही/-** **कनिष्ठ लिपीक**
**कोर्टाचा शिक्का**
**सही/-** **सहाय्यक अधिक्षक** **मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी, ता. बार्शी**

**जाहीर प्रसिध्दीकरण**
दिवाणी किरकोळ अर्ज नं. १११/२०२५
पु.ने.ता. २३/०२/२०२६ नि.नं. ६
**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात**
१) **कु. दिपाली शिवाजी खोत** वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. वेताळवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
२) **चि. सार्थक शिवाजी खोत,** वय १६ वर्षे, धंदा - शिक्षण रा. वेताळवाडी, ता. बार्शी. जि. सोलापूर
३) **सुनिता शिवाजी खोत** वय ४० वर्षे, धंदा - शेती, रा. वेताळवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
अर्जदार नं. १ व २ चे अ.पा.क. आई अर्जदार नं. ३ — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन तर्फे मे. जिल्हाधिकारी सोलापूर** - **सामनेवाला**
ज्याअर्थी, यातील अर्जदार हे मौजे वेताळवाडी, ता. माढा. जि. सोलापूर येथील रहिवाशी असुन अर्जदार नं. १ व २ यांचे नावे असणारी मौजे वेताळवाडी, ता. माढा. जि. सोलापूर येथील जमिन गट नंबर ७२ पैकी ०० हे ४० आर ही मिळकत अज्ञानाचे नावे असल्यामुळे सदरची मिळकत अर्जदार नं. १ व २ यांचे अज्ञान पालनकर्ती आई म्हणून सुनिता शिवाजी खोत यांचेमार्फत वर नमुद मिळकत विक्री करणेकामी या मे. कोर्टात गार्डीयन ॲन्ड वॉर्ड ॲक्ट १८९० चे कलम ८ अन्वये मिळकत विक्री करणेकामी परवानगीसाठी अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमुद मागणी संबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस वा कुणाचे हक्कांत काही दस्त असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेली ता. २३/०२/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार विधीज्ञांमार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी पुराव्यानिशी सादर करावयात, मुदतीत कोणाचेही तक्रार, हरकती वा म्हणणे न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश होतील.
येणेप्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण दाखल असे तारीख १६/०१/२०२६
**सही/-** **लिपिक** **जिल्हा न्यायालय, बार्शी**
**कोर्टाचा शिक्का**
**सही/-** **सहा. अधिक्षक** **जिल्हा न्यायालय, बार्शी**

**दुधनी नगरपरिषद, दुधनी**
**फेर-निविदा (तिसरी) सूचना**
**जा.क्र.४५** **दिनांक २०/०१/२०२६**
नगरपरिषदेकडील आरोग्य विभागाच्या अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षाकरिता दुधनी नगरपरिषद हद्दीतील एनिमल वेल्फेअर बोर्डाच्या नियमावलीप्रमाणे मोकाट कुत्र्यांची निर्बिजीकरण, नसबंदी व लसीकरण करणे कामाकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| विभागाचे नाव | कामाचा तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फार्म किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| आरोग्य विभाग | भटकी कुत्री पकडून त्यांचे निर्बिजकरण, नसबंदी व लसीकरण करणे | ३,००,०००/- | ३,०००/- | निविदे प्रमाणे | ३००/- |

निविदा अर्ज दिनांक :- २०/०१/२०२६ ते दिनांक :- २७/०१/२०२६ अखेर सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत दुपारी ०४.०० वाजेपर्यंत निविदा शक्यतो दि : २८/०१/२०२६, वार बुधवार दिवशी सकाळी ११:०० वाजता उपस्थित निविदा धारकासमोर किंवा प्रतिनिधीसमोर उघडणेत येतील. तसेच कोणत्याही कारणामुळे त्याच दिवशी निविदा उघडणे शक्य न झालेस त्याबाबतची निविदा उघडण्याचे पुढील तारीख व वेळ नगरपरिषदेच्या सूचना फलकावर लावण्यात येईल. याबाबत कोणत्याही व कोणासही स्वतंत्र सूचना देण्यात येणार नाही.
निविदेतील अटी व शर्तीचे इत्यादीची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत व कार्यालयामध्ये पहावयास मिळेल. सादर करण्यात आलेल्या निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
**अटीः- दरपत्रक हे प्रती एक कुत्रा याप्रमाणे असावे.**
**सही/-**
**(श्री. लक्ष्मीकांत कहार)**
**मुख्याधिकारी**
**दुधनी नगरपरिषद, दुधनी**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### प्रज्ञानंद-गुकेश सामना अनिर्णीत

**विक आन झी :** विश्वविजेता डी. गुकेशने नेदरलॅण्डमधील विक आन झी येथे टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेच्या चौथ्या फेरीत आपलाच देशबांधव आर. प्रज्ञानंद याच्याशी बरोबरी साधली, तर अव्वल मानांकित अर्जुन एरिगासीला अनिश गिरीने बरोबरीत रोखले. मागील स्पर्धेत विजेतेपदासाठी प्लेऑफमध्ये एकमेकांविरुद्ध खेळलेल्या गुकेश आणि प्रज्ञानंदला या वेळी अद्याप एकही विजय मिळवता आलेला नाही. गुकेशने सलग चार सामने अनिर्णीत खेळले आहेत, तर गतविजेत्या प्रज्ञानंदने दोन पराभवांनी सुरुवात केल्यानंतर शेवटच्या दोन फेऱ्यांमध्ये बरोबरी साधली आहे. अर्जुन एरिगासी दुसऱ्या स्थानावर घसरला. अमेरिकेच्या हॅन्स नीमन व उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हने अनुक्रमे अरविंद चिदंबरम आणि झेक प्रजासत्ताकच्या थाई दाई व्हॅन गुयेन यांच्याविरुद्धचे आपले सामने जिंकून संयुक्तपणे अर्ध्या गुणाच्या फरकाने आघाडी घेतली आहे. ■

### आफ्रिका खंडात क्रिकेटच्या विकासाला पाठिंबा : जय शाह

**विंडहोक :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांनी विंडहोकमध्ये आफ्रिका क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली आणि संपूर्ण आफ्रिकेत क्रिकेटचा विस्तार करण्याच्या आयसीसीच्या वचनबद्धतेवर भर दिला. क्रिकेट नामिबियाच्या नव्याने विकसित झालेल्या एनसीजी मैदानावर १९ वर्षांखालील विश्वचषक सामन्यादरम्यान भविष्यातील खेळाडू मैदानात खेळताना पाहून त्यांनी आनंदही व्यक्त केला. विंडहोकमध्ये आफ्रिका क्रिकेट संघटनेच्या क्रिकेट पदाधिकाऱ्यांसोबत एक फलदायी दिवस गेला. संपूर्ण आफ्रिका खंडात या खेळाचा विकास व त्याला पाठिंबा देण्याचा प्रयत्न करत आहे. नवीन एनसीजी मैदानावर १९ वर्षांखालील सामन्यात खेळाचे भविष्यातील खेळाडू पाहण्याचा आनंदही घेतला, असे जय शाह यांनी एक्सवर शेअर केले. सध्या सुरू असलेल्या १९ वर्षांखालील विश्वचषकासाठी नामिबिया आणि झिम्बाब्वे संयुक्तपणे यजमानपद भूषवत आहेत. नामिबियामध्ये विंडहोकमधील नवीन नामिबिया क्रिकेट मैदान व एचपी ओव्हल या दोन मैदानांवर सामने खेळवले जात आहेत, तर झिम्बाब्वेमध्ये हरारे येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लब, हरारे स्पोर्ट्स क्लब आणि ताकाशिंगा स्पोर्ट्स क्लब ही या स्पर्धेसाठीची मैदाने आहेत. गत वर्षी नामिबियाने विंडहोकमध्ये आयसीसी महिला टी-२० विश्वचषक आफ्रिका पात्रता स्पर्धेचे आयोजन केले होते.

### लिझेल लीला १० टक्के दंड

**बडोदा :** दिल्ली कॅपिटल्सची यष्टिरक्षक-फलंदाज लिझेल लीवर बुधवारी मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान आयसीसी आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल तिच्या सामना शुल्काच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला आणि एक डिमेरिट पॉईंटही देण्यात आला. लीने आचारसंहितेच्या कलम २.२ अंतर्गत लेव्हल १ च्या गुन्ह्याची कबुली दिली, जो सामन्यादरम्यान क्रिकेट उपकरणांचा गैरवापर करण्याशी संबंधित आहे. लेव्हल १ च्या उल्लंघनासाठी, मॅच रेफरीचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतो, असे डब्ल्यूपीएलच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. दूरचित्रवाणीवरील रिप्लेमध्ये दिसले की, यष्टिरक्षक राहिला फिरदौसने बेल्स उडवल्या तेव्हा लीची बॅट काही क्षणांसाठी क्रीझवरून वर उचलली गेली होती. त्यामुळे ती या हंगामातील तिच्या तिसऱ्या अर्धशतकापासून चार धावा कमी असताना बाद झाली.

### मानद डॉक्टरेटने रोहित शर्माचा होणार सन्मान

**पुणे :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्माला शनिवारी अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठाच्या (एडीवायपीयू) दीक्षांत समारंभात क्रिकेटमधील अतुलनीय योगदान आणि अनुकरणीय नेतृत्व यासाठी मानद डॉक्टरेट (डी. लिट.) प्रदान करण्यात येणार आहे.

### परमेश्वर व्हसुरे यांना आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार

**अक्कलकोट दि. २१ जानेवारी-**

तालुक्यातील गौडगाव (बुद्रुक) येथील श्री जगद्गुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील क्रीडा शिक्षक परमेश्वर व्हसुरे यांना शिक्षक भारती संघटनेच्या वतीने जिल्हा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार देण्यात आला.



संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, माजी शिक्षक आमदार कपिल पाटील, संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजीत काटमोरे यांच्या हस्ते व्हसुरे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. श्री गुरु सिद्धमलेश्वर कल्याण केंद्र गौडगाव संस्थेचे प्रतिनिधी योगीराज हिरेमठ, अक्कलकोट तालुका साने गुरूजी कथामालेचे उपाध्यक्ष वाहीद पटेल, बसय्या हिरेमठ, सचिव सचिन गडसिंग, विद्या सचिव, रमेश येणगुरे यांनी व्हसुरे यांचे अभिनंदन केले.


# गुजरात जायंट्सविरुद्ध यूपी वॉरियर्सचा वरचष्मा

**महिला प्रीमियर लीग**

◆ **बडोदा, २१ जानेवारी**

महिला प्रीमियर लीग सामन्यात यूपी वॉरियर्सचा फॉर्ममध्ये नसलेल्या गुजरात जायंट्सविरुद्ध वरचष्मा असेल, तर उर्वरित दोन प्लेऑफ स्थानांसाठीची स्पर्धा अधिक कठीण झाली आहे. हा सामना गुरुवारी होणार आहे.

माजी विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने सर्व पाच सामने जिंकून पात्रता मिळवली आहे, तर दिल्ली कॅपिटल्सने मंगळवारी मुंबई इंडियन्सचा सात गड्यांनी पराभव करून सर्वांसाठी दरवाजे उघडे ठेवले आहेत. मुंबई, यूपी, दिल्ली आणि गुजरातचे प्रत्येकी चार गुण आहेत, परंतु नेट रन रेटच्या आधारे वॉरियर्स गुजरातपेक्षा वरचढ आहेत. सलग तीन पराभवांनंतर गुजरात तळाशी आहे, परंतु त्यांनी पहिल्या टप्प्यात यूपी वॉरियर्सचा पराभव केला.



ॲशले गार्डनर



मेग लॅनिंग

हंगामाच्या पहिल्या सामन्यात, गुजरातने २०७ धावा केल्या आणि वॉरियर्सना आठ बाद १९७ धावांवर रोखले. मुंबई इंडियन्सविरुद्ध पाच बाद १९२ धावा करूनही गुजरातचा पराभव झाला. आरसीबीविरुद्ध, संघ १८३ धावांच्या लक्ष्याला उत्तर देताना केवळ १५० धावाच करू शकला आणि मागील सामन्यात, त्याच संघाविरुद्ध, १७९ धावांच्या लक्ष्याला उत्तर देताना केवळ आठ गडी गमावून ११७ धावाच करू शकला.

वरिष्ठ फलंदाजांच्या खराब फॉर्ममुळे त्यांच्या अडचणीत भर पडली आहे. ऑस्ट्रेलियन यष्टिरक्षक-फलंदाज बेथ मूनीने पाच डावात केवळ ९५ धावाच केल्या आहेत. सोफी डेव्हाईनने गेल्या तीन सामन्यात आठ, आठ आणि शून्य धावा केल्या आहेत. अनुष्का शर्माला अद्याप तिची लय सापडलेली नाही. कर्णधार ॲशले गार्डनरवर मोठी जबाबदारी आहे, जिने दोन अर्धशतके झळकावली आहेत.

दुसरीकडे, खराब सुरुवातीनंतर, उत्तर प्रदेशने त्यांच्या गोलंदाजांच्या मदतीने जोरदार पुनरागमन केले आहे. गुजरात, आरसीबी आणि दिल्लीविरुद्ध पहिले तीन सामने गमावल्यानंतर, त्यांनी ५ बाद १६१ धावांवर गारद होऊनही मुंबई इंडियन्सचा पराभव केला. हा त्यांचा त्याच संघावर सलग दुसरा विजय आहे.

उत्तर प्रदेशातील गोलंदाज क्रांती गौर, शिखा पांडे आणि डिआंड्रा डॉटिन यांनी चमकदार कामगिरी केली. फिरकीपटू सोफी एक्लेस्टोन, दीप्ती शर्मा आणि आशा शोबाना यांनी त्यांना चांगली साथ दिली. फलंदाज म्हणून दीप्तीचा खराब फॉर्म चिंतेचा विषय आहे. मात्र, मेग लॅनिंग आणि फोबी लिचफिल्ड बॅटने फॉर्मात आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# अल्काराझ, सबालेन्काची आगेकूच

**ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस**

◆ **मेलबर्न, २१ जानेवारी**


स्पेनच्या कार्लोस अल्काराझने ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये सुरुवातीच्या काही अडचणींवर मात करत बुधवारी जर्मन खेळाडू यानिक हॅनफमनचा ७-६(४), ६-३, ६-२ असा पराभव केला आणि तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. मेलबर्न पार्कमध्ये तो आपल्या कारकीर्दीतील ग्रँड स्लॅम पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहे.

ॲडम वॉल्टनविरुद्ध पहिल्या फेरीत सहज विजय मिळवल्यानंतर, २२ वर्षीय अल्काराझला हॅनफमनविरुद्ध अधिक कडवी झुंज दिली, परंतु त्याने या आव्हानाला तोंड देत पुढील फेरीत आपले स्थान निश्चित केले. आता सहा वेळा ग्रँड स्लॅम विजेता असलेल्या अल्काराझला पुढील फेरीत मायकेल झेंग किंवा कोरेंटिन माऊटेट यांच्यापैकी एकाशी लढत द्यावी लागणार आहे.

बेलारूसची प्रथम विश्वमानांकित आर्यना सबालेन्का महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात चीनच्या बाई झुओक्सुआनचा ६-३, ६-१ असा पराभव केल्यानंतर विजय साजरा केला. २०२३ आणि २०२४ मध्ये मेलबर्न पार्कची विजेती असलेल्या सबालेन्काने पहिल्या सेटमधील सुरुवातीच्या कठीण परिस्थितीतून सावरत वर्चस्व गाजविले.



कार्लोस अल्काराझ



आर्यना सबालेन्का

**कोकोची ओल्गावर मात**

तृतीय विश्वमानांकित कोको गॉफने दमदार कामगिरी करत, २०२६ ऑस्ट्रेलियन ओपनच्या महिला एकेरीच्या तिसऱ्या फेरीत सहज प्रवेश केला. कोकोने ग्रॅण्ड स्लॅमच्या पहिल्या फेरीत आपल्या कारकीर्दीतील २५० वा विजय मिळवल्यानंतर अवघ्या दोन दिवसांनी, आपला २५१ वा डब्ल्यूटीए विजय नोंदवला. दोन वेळच्या ग्रॅण्ड स्लॅम विजेत्या कोको गॉफने ओल्गा डॅनिलोविचचा सरळ सेटमध्ये पराभव केला आणि १ तास १७ मिनिटांत ६-२, ६-२ अशा गुणांनी विजय मिळवला. ◂(वृत्तसंस्था)

### मेदवेदेव, रुबलेव्ह तिसऱ्या फेरीत

रशियाचा स्टार टेनिसपटू डॅनिल मेदवेदेवला ऑस्ट्रेलियन ओपनच्या तिसऱ्या फेरीत स्थान मिळवण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागले. त्याने बुधवारी जॉन केन एरिना येथे फ्रान्सच्या क्विंटिन हॅलिसवर ६-७ (९), ६-३, ६-४, ६-२ असा विजय मिळवला.



या निकालामुळे मेदवेदेवची २०२६ हंगामाची दमदार सुरुवात कायम राहिली आहे. त्याने आपली अपराजित मालिका सात सामन्यांपर्यंत वाढवली आहे. आता ११ विश्वमानांकन असलेल्या मेदवेदेवने विजय मिळवून हंगामाची सुरुवात केली असली तरी, त्याला ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धांमध्ये सहज विजय मिळवणे अधिक कठीण झाले आहे. दरम्यान, आंद्रे रुबलेव्हनेही पहिल्या सामन्यात पोर्तुगालच्या जेमी फारियाचा ६-४, ६-३, ४-६, ७-५ असा पराभव करून तिसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. ■

# सिंधू, श्रीकांत उप-उपांत्यपूर्व फेरीत

**इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन**

◆ **जकार्ता, २१ जानेवारी**

माजी विश्वविजेत्या पी.व्ही. सिंधूला पहिल्या फेरीत एका कठीण सामन्याला सामोरे जावे लागले, परंतु अखेरीस तिने बुधवारी येथे इंडोनेशिया मास्टर्सच्या पहिल्या फेरीत जपानच्या मानमी सुइझूवर सरळ गेममध्ये विजय मिळवला.

पहिल्या गेममध्ये सिंधूची सुरुवात अनपेक्षितपणे खराब झाली, मध्यंतराच्या वेळी ती २-११ अशी पिछाडीवर होती. तिला चार गेम पॉईंट्स वाचवावे लागले, परंतु सलग सहा गुण मिळवून तिने २२-२० असा गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये, तिने सुरुवातीपासूनच आघाडी घेतली होती, परंतु सुइझूवर आरामदायक आघाडी मिळवता आली नाही, अखेरीस तिने २१-१८ असा गेम जिंकला.



आता सिंधू दुसऱ्या फेरीत डेन्मार्कच्या लाईन कजेर्सफेल्ट किंवा चीनच्या हान कियान शी यांच्याशी सामना करेल. दरम्यान, गेल्या वर्षी मलेशिया मास्टर्स आणि सय्यद मोदी इंटरनॅशनलच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या किदाम्बी श्रीकांतने पहिल्या फेरीत जपानच्या कोकी वातानाबेविरुद्ध रोमांचक सामना खेळला आणि २१-१५, २१-२३, २४-२२ अशा विजयासह आपल्या जपानी प्रतिस्पर्ध्यावर मात केली. श्रीकांतने पहिल्या गेममध्ये आक्रमक फटकेबाजी करत दमदार सुरुवात केली व त्यामुळे त्याला विजय मिळवण्यात मदत झाली. श्रीकांतचा पुढील सामना दुसऱ्या फेरीत चौथ्या मानांकित चाऊ टिएन चेनशी होईल.


अनमोल खरब आणि आकर्षी कश्यप यांनी पात्रता फेरीत विजय मिळवून महिला एकेरीच्या मुख्य ड्रॉमध्ये आपले स्थान निश्चित केले. तथापि, आकर्षी महिला एकेरीच्या मुख्य ड्रॉच्या पहिल्याच सामन्यात पराभूत होऊन स्पर्धेतून बाहेर पडली आणि किरण जॉर्जलाही पुरुष एकेरीच्या पहिल्याच सामन्यात सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला. ध्रुव कपिला-तनिषा क्रास्टो आणि रोहन कपूर-ऋत्विका शिवानी गड्डे या मिश्र दुहेरीच्या दोन्ही जोड्यांना पहिल्याच फेरीत फ्रान्सच्या जोड्यांकडून पराभव पत्करावा लागला. ◂(वृत्तसंस्था)

# भांब्री-गोरान्सनची प्रभावी सुरुवात

◆ **मेलबर्न, २१ जानेवारी**

भारताचा अव्वल दुहेरी खेळाडू युकी भांब्री आणि त्याचा स्वीडिश साथीदार आंद्रे गोरान्सन यांनी बुधवारी येथे झालेल्या ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत सहज सरळ सेटमध्ये विजय मिळवला.

भांब्री आणि गोरान्सन या दहाव्या मानांकित जोडीने कोर्ट क्रमांक १३ वर ५७ मिनिटांच्या सामन्यात वाईल्डकार्ड ऑस्ट्रेलियन जेम्स डकवर्थ आणि क्रूझ हेविट यांचा ६-३, ६-४ असा पराभव केला. भारतीय-स्वीडिश जोडीने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट कामगिरी केली. टक्केवारीच्या बाबतीत, भांब्री आणि गोरान्सन यांनी त्यांच्या पहिल्या सर्व्ह पॉईंट्सपैकी ९७ टक्के जिंकले.



त्यांची दुसरी सर्व्ह कामगिरी तितकीच प्रभावी होती, त्यांनी त्यांचे ९१ टक्के गुण जिंकले.

भांब्री आणि गोरान्सन यांनी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांची सर्व्हिस दोनदा ब्रेक केली आणि संपूर्ण सामन्यात त्यांना एकही ब्रेक पॉईंटचा सामना करावा लागला नाही, ज्यामुळे त्यांना संपूर्ण सामन्यात नियंत्रण राखता आले.

मंगळवारी पुरुष दुहेरीत पेड्रो मार्टिनेझ आणि जौमे मुनार यांच्याकडून सरळ सेटमध्ये पराभव पत्करावा लागल्याने निकी पूनाचा आणि त्याचा थाई जोडीदार प्रचुआया इसारो यांना बाहेर पडावे लागले. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापुरात उद्यापासून महाराष्ट्र वि. त्रिपुरा क्रिकेट सामना




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

बीसीसीआयच्या २३ वर्षाखालील मुलांच्या कर्नल सी के नायुडू चषकातील दुसऱ्या सत्रातील चौथ्या फेरीच्या सामन्यांना २३ जानेवारी पासून सुरुवात होत असून या अंतर्गत सोलापुरात इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर महाराष्ट्र संघाचा सामना उत्तर पूर्व भारतातील त्रिपुरा संघाशी होणार असल्याचे जिल्हा क्रिकेट संघटनेचे वतीने कळविण्यात आले.

स्पर्धेच्या पहिल्या सत्रात ५ नोव्हेंबर पर्यंत पार पडलेल्या पहिल्या ३ फेरीच्या सामन्यात एलीट क गटात महाराष्ट्र संघ सध्या १ विजया सह २८ गुणांसह संयुक्त दुसऱ्या स्थानावर असून त्रिपुरा संघ २० गुण प्राप्त करून ६व्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र संघ आधीच सोलापुरात दाखल झाला असून त्रिपुरा संघ काल २० तारखेला दुपारी सोलापुरात आला असून काल २१ रोजी सकाळ दुपार असे २ सत्रात सराव केला आहे तर २२ रोजी सकाळच्या सत्रात दोन्ही संघ सराव करणार असून त्यानंतर सामनाधिकारी महत्वाची बैठक घेतील आणि २३ तारखेला सकाळी ९.३० वाजता सामन्याला सुरुवात होणार आहे.

हा सामना ४ दिवसीय असून या सामन्यासाठी अधिकारी म्हणून मनीष माजीथिया, मैदानी पंच म्हणून के. मनोहरन व अश्वनी मन्धानी, गुणलेखक म्हणून पुण्याचे कपिल खरे व हैदराबादचे मिर सामी अली, व्हिडिओ अनालिस्ट म्हणून गुरूप्रसाद कुडव, सहाय्यक कार्तिक हे असणार असून त्यांचे सोबत स्थानिक व्यवस्थापक म्हणून चिराग शहा, विशाल कुलकर्णी, निखिल मादास हे असणार आहेत. सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने सामन्याची संपूर्ण जय्यत तयारी करण्यात आली असून विविध समिती स्थापन करण्यात आल्या व त्यातील सदस्य योग्य ते कार्य करत आहेत.

**दोन्ही संघ असे**

**महाराष्ट्र :** सचिन धस (कप्तान), अजय बोरुडे, साहिल औताडे, दिग्विजय पाटील, स्वराज चव्हाण, अभिषेक निषद, शुभम मेड, किरण चोरमले, हर्ष मोगावीरा, अब्दुस सलाम, अनिरुद्ध साबळे, साहिल पारेख, निखिल लोणावत, वैभव दारकुंडे, प्रथमेश गावडे, अभिषेक पवार.



सचिन धस

**त्रिपुरा :** संदीप सरकार (कप्तान), नाबारुन चक्रबोर्ती, अरींदम बर्मन, आनंध भौमिक, सप्तजित दास, प्रियांश मित्रा, दुर्लब रॉय, दीपजोय देब, प्रीतम दास, तनमोय दास, साहिल सुलतान, तनय मंडल, राजदीप दत्ता, सौरव कार, दीपेन बिस्वास, पामीर देबनाथ, देबराज डे, अमित अली, स्वरब सहानी, अर्काजीत रॉय, पौरुष मिश्रा



संदीप सरकार



# न्यू सातारा कोर्टी व कर्मयोगी शेळवे विजेते

**तंत्रनिकेतनच्या कबड्डी व खो-खो स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ अंतर्गत इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये झालेल्या कबड्डी स्पर्धेत न्यू सातारा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट पॉलिटेक्निक कोर्टी (पंढरपूर) व खो-खो स्पर्धेत कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निक शेळवे (पंढरपूर) यांनी विजेतेपद पटकाविले.

खो-खो स्पर्धेसाठी १४ तर कबड्डीसाठी १८ संघांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या हस्ते झाले. विजयी संघांना संस्थेचे विश्वस्त डॉ.यशोदीप गायकवाड यांच्या हस्ते चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कबड्डीसाठी पंचप्रमुख म्हणून सुनील भोरे तर पंच म्हणून धनराज जाधव, बजरंग गायकवाड, मिथुन वडजे, अक्षय वाघमोडे, योगेश माने, नितीन गुंजे, वेदांत गायकवाड, राहुल इंगोले, अभिषेक शिवशरण तसेच खो-खोसाठी पंचप्रमुख म्हणून धोंडीराम पाटील तर पंच म्हणून प्रल्हाद जाधव, शाहनवाज मुजावर, शंकर मेटकरी, सुजित मेटकरी, प्रथमेश जाधव यांनी काम पाहिले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या पदादिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ.रणजित देशमुख, क्रीडा समन्वयक महेंद्र दौंड आदींनी परिश्रम घेतले.

# खेळातून आत्मसन्मान, प्रेरणा प्रोत्साहन मिळते

● बार्शीच्या नगराध्यक्ष तेजस्विनीताई कथले यांचे गौरवोद्गार ● राज्य महिला खो-खो स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. २१ जानेवारी-**

खेळातून आत्मसन्मान, प्रेरणा प्रोत्साहन मिळते. यश व अपयशाचा विचार न करता खेळाचा सन्मान होतो असे गौरवोद्गार बार्शीच्या नगराध्यक्ष तेजस्विनीताई कथले यांनी काढले.

राज्य महिला खो-खो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ पी.एम. उषा, महाराष्ट्र खो खो असोसिएशन आणि सोलापूर ॲम्युचर खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त आयोजित केली आहे. या स्पर्धेत धाराशिव, सांगली, पुणे ,ठाणे, सोलापूर व रत्नागिरी अशा सहा जिल्ह्यातील एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत. तीन दिवसांच्या विभागीय निमंत्रित महिला खो खो स्पर्धेचे शानदार उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव पी. टी. पाटील होते. यावेळी भूमी अभिलेख बार्शीच्या उपअधीक्षक रेश्मा तांबारे नाईकवाडी, महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, देबडवार, कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे, माजी प्राचार्य डॉ. सी एस मोरे, डॉ. दिलीप मोहिते डॉ. एस एम लांडगे स्पर्धा सचिव प्रा. डॉ. स्मिता सुरवसे, सहसचिव प्रा. डॉ. सुभाष मारकड आदी उपस्थित होते.



सौ. रेश्मा तांबारे-नाईकवाडी यांनी दैनंदिन जीवनात वर्तमान स्थितीत ताण-तणाव वाढला आहे अशी भावना व्यक्त केली. त्याचबरोबर त्यातून मुक्त होण्यासाठी मैदानी खेळाला अत्यंत महत्त्व आहे अशी भूमिका मांडली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी टी पाटील यांनी संस्थेने राज्यस्तरीय विविध मैदानी सामन्यांचे आयोजन केल्याचे सांगितले. त्याचबरोबर संस्थेद्वारे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा आढावा घेतला. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांना खेळाविषयी अत्यंत आवड असल्याचेही व्यक्त केले. तसेच भविष्यात अनेक विविध स्पर्धांचे आयोजन करण्याची भूमिका विशद केली.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय स्पर्धा सचिव प्रा. डॉ. एस एस सुरवसे यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. परमेश्वर पाटील व प्रा. डॉ लाजवंती राठोड यांनी केले. बी.एड. विभाग प्रमुख प्रा. डॉ. रविराज फुरडे यांनी आभार मानले.

# सोलापूरच्या साईश्वर, श्रद्धा गुंटुक बंधू-भगिनींचे ३०२ कि.मी. सायकलिंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

पुणे ग्रँड टूर ग्लोबल या सायकल स्पर्धेचे औचित्य साधून सोलापूरचे खेळाडू साईश्वर व श्रद्धा या बंधू भगिनीने प्रत्येकी १५१ कि.मी अंतर सायकलिंग केले आहे. साईश्वरने १५१ किमी अंतर सायकलिंग ६ तास ३८ मिनिटे ५ सेकंदात पूर्ण केले तर तेव्हढेच अंतर श्रद्धाने ६ तास ५३ मिनिटे १२ सेकंदात पूर्ण केले आहे. स्पर्धा पहाटे ३ वाजून ६ मि. ला सुरूवात करण्यात आले.

ही स्पर्धा जुळे सोलापूर भंडारी ग्राउंड ते विजयपूर १०८ किमी व पुन्हा विजयपुर ते भंडारी ग्राऊंड १०८ किमी तसेच भंडारी ग्राऊंड ते झळकी ४३ किमी व पुन्हा झळकी ते एस आर पी एफ कॅम्प सोरेगाव ४१ किमी असे एकूण ३०२ किमी अंतर यशस्वीपणे पार पाडले आहे.यांची नोंद लवकरच एशिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये होईल. याचे प्रमाणपत्र लवकरच देण्यात येईल. हे दोघे गेल्या ६ ते ७ वर्षापासून रनिंग मध्ये सराव करत आहेत. भारताचे प्रतिनिधित्व करून देशासाठी पदक मिळविण्याचा ध्यास त्यांनी घेतला आहे. या दोघांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह तसेच स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्रा. चिदानंद माळी व क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# करोळे येथे चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा खून

**आत्महत्येचा बनाव केलेल्या पतीसह सासू, सासऱ्यास अटक**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २१ जानेवारी-**

पहाटे ५.३० वाजता विष्णू हरिदास शिंगाडे राहणार करोळे (ता. पंढरपूर) त्याची आई मंगलाबाई शिंगाडे हे दोघे विष्णू याची पत्नीने मायाक्का ऊर्फ मया विष्णू शिंगाडे हिने घराजवळील झाडाला गळफास घेतलेल्या आवस्थेत मिळून आल्याचे सांगून तिला उपजिल्हा रुग्णालय अकलूज (ता.माळशिरस) येथे उपचारासाठी घेऊन गेले होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वैद्यकीय तपासणी करून ती उपचारापुर्वीच मयत झाल्याचे सांगितले.

याबाबत माहीती मिळताच पोलिस पथकाने सदर ठिकाणी महिलेच्या मृतदेहाची पाहणी केल्यावर तिच्या गळयावर गळफास घेतल्याचे व्रण दिसत होते तसेच चेहर-यावरती मारहाणीच्या जखमा दिसून आल्याने पती विष्णू शिंगाडे व सासू मंगलबाई शिंगाडे यांच्याकडे केलेल्या तपासात त्या दोघांच्या बोलण्यात तफावत जाणवली. संशय बळावल्याने त्या दोघांकडे सखोल तपास करता तसेच सदर मयत महिलेचे वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून पोस्टमार्टम केले असता तिचा मृत्यू हा गळा दाबून झाल्याचे माहिती प्राप्त झाली. सदर महिलेचा गळा दाबून कशाचे तरी साह्याने गळा आवळून गळफास घेतल्याचा बनाव पती,सासू,सासरे यांनी करून केल्याचे तपासात निष्पन्न झाले. मयत महिलेस सासरच्या लोकांकडून तिच्या बाळंतपणाचा खर्च माहेरील लोकांनी दिला नाही म्हणून तसेच तिच्या चारित्रयावर संशय घेऊन तिचा शारीरिक,मानसिक छळ सुरू होता. मयत महिलेला तिचे माहेरी जाऊन देत नव्हते. तसेच माहेरातील व्यक्तीशी बोलूही दिले जात नव्हते अशी फिर्याद मयत महिलेचा भाऊ बिरूदेव ज्ञानदेव सलगर (रा.करोळे, ता.पंढरपूर) यांनी दिल्याने त्याचे फिर्यादीवरून करकंब पोलीस स्टेशनमध्ये महिलचा नवरा विष्णु हरीदास शिंगाडे, सासरा हरीदास शिंगाडे, सासू मंगलाबाई हरीदास शिंगाडे (सर्व रा.करोळे ता.पंढरपुर) यांचेवर गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोसई निलेश गायकवाड हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांचे मार्गदर्शनाखाली करकंब पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी सपोनि योगेश लंगुटे, पोसई निलेश गायकवाड, पोहेकॉ अरूण राजकर, पोहेकॉ लक्ष्मण भांगे, पोहेकॉ असिफ आतार, पोहेकॉ तानाजी धिमधिमे, पोहेकॉ शिकतोडे, पोना हनमंत सावंत, पोकॉ श्याम गायकवाड, पोकॉ स्वप्निल बागल, पोकॉ माळी, पोकॉ धनाजी सुर्वे, पोकॉ काळे यांनी पार पाडली.




# शिवविचाराद्वारे राष्ट्रभक्तीची चेतना जागवा : ह.भ.प. भारती आडसुळ

**कीर्तनातून युवकांना उपदेश; एनएसएस शिबिरात कीर्तन**

**बार्शी, दि.२१ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फतच्या कासारवाडी येथील विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी हभप. भारतीताई आडसुळ यांनी शिवविचाराद्वारे राष्ट्रभक्ती जागवण्याचे भावस्पर्शी आवाहन केले.

या कीर्तनातून ग्रामस्थ व स्वयंसेवकांना नवी ऊर्जा, नवी दिशा आणि समाजकार्याची नवी प्रेरणा मिळाली. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील आशयपूर्ण दाखले देत त्यांनी समाजप्रबोधनाचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे उपस्थितांपुढे मांडले. छत्रपती शिवाजी महाराजांचा संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, आजच्या युवकांनी जर समाजाचे भान ठेवून, निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि राष्ट्रभावनेने काम केले, तर पुन्हा एकदा शिवाजी महाराजांसारखा नेतृत्वगुण संपन्न महामानव जन्माला येईल आणि त्यांचे मावळे होण्याची संधी आपल्यालाही मिळेल. त्यांनी व्यसनमुक्ती, संस्कार, सामाजिक बांधिलकी, कर्तव्यभावना, राष्ट्रप्रेम आणि सेवाभाव यावर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. माळी, सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच जितेंद्र गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



# माळप्पा पुजारी यांचा आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मान

**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

तालुक्यातील गुरववाडीचे सरपंच विकासरत्न माळप्पा पुजारी यांचा आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सोलापूर येथील विश्व परिवर्तन फाउंडेशन व लेटेस्ट न्यूजच्यावतीने हा सन्मान करण्यात आला. सरपंच पुजारी यांनी गुरववाडीच्या विकासासाठी विविध शासकीय योजनांचा पाठपुरावा करून कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे. गुरववाडीतील पाणी प्रश्न सोडवणे, गावातील रस्ते सिमेंट काँक्रिटीकरण करणे, जि.प. शाळेला सुविधा पुरविणे आदींसह विविध विकास कामांद्वारे त्यांनी गुरववाडीचा विकास केला आहे. याप्रसंगी मुख्य राज्य संघटक मुजम्मिल शेख, राष्ट्रीय संचालक उपसंपादक इकबाल शेख, राष्ट्रीय महिला अध्यक्ष नसीमा शेतसंदी, संस्थापक अध्यक्ष तथा संपादक अश्फाक शेख, जनता संघर्ष न्यूज चे संपादक सिद्धार्थ भडकुंबे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.



# मुख्याध्यापक संघाच्या तालुका उपाध्यक्षपदी अमोल गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ जानेवारी -**

सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या सांगोला तालुका अध्यक्षपदी रामचंद्र जानकर तर उपाध्यक्षपदी सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचे प्राचार्य अमोल गायकवाड यांची निवड करण्यात आली. आनंद विद्यालय, कमलापूर (ता.सांगोला) येथे निवडणूक कार्यक्रम निवडणूक निर्णय अधिकारी प्राचार्य उत्तमराव लवटे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी नियंत्रक समितीचे अध्यक्ष प्रा.सुभाषराव माने, सचिव रंगसिद्ध दसाडे, सिद्राम खट्टे, रेवणसिद्ध रोडगीकर, समन्वयक तानाजीराव माने उपस्थित होते.

या निवडीबद्दल सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ड. विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्राचार्य अमोल गायकवाड यांचे अभिनंदन केले.






# सह्याद्रीच्या विद्यार्थ्यांची कोल्हापूरच्या एस.जी.फायटो फार्मा कंपनीस भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२१ जानेवारी -**

सह्याद्री फार्मसी कॉलेज, मेथवडे (ता.सांगोला) येथील डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या फार्मसी क्षेत्र भेटी अंतर्गत प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी एस.जी.फायटो फार्मा पीव्हीटी एलटीडी, कोल्हापूर या कंपनीस भेट दिली.

कंपनीच्या व्यवस्थापकांनी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून कंपनीची तसेच फामसिस्टचे फार्मा कंपनीतील महत्व, कार्य, व्याप्ती याबद्दल माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ग्रुप करून कंपनीतील सर्व विभागास भेटी दिल्या. औषधे बनवणारी यंत्रसामुग्रि, त्याचे गुणनियंत्रण व लॅब, लेबलिंग, पॅकिंग, स्टोरेज तसेच टॅबलेट, कॅप्सूल, पावडर, द्रव औषधे, अर्ध-द्रव औषधे बनवणाऱ्या सर्व विभागास भेटी देऊन माहिती संग्रहित केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची व शंकेचे निवारण कंपनीतील कर्मचाऱ्यांनी केले. त्याबद्दल त्यांचे सर्वांनी आभार मानले. या शैक्षणिक सहलीस प्रा.एस.एस.काळे, प्रकाश पाटील, प्रा.एस.ए.माने, प्रा.ए.व्ही.सपाटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# जमिनीच्या हिश्यासाठी पत्नीची हत्या, आरोपी पतीस जन्मठेपेची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ जानेवारी-**

२०२१ मध्ये बार्शी तालुक्यात जमिनीच्या हिश्यासाठी पत्नीची हत्या केलेल्या आरोपी किरण तुकाराम घरबुडवे यास जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

याबाबतची हकीकत अशी की, वैराग येथे दि. २३ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ११-३० वाजता दरम्यान सदरचा गुन्हा घडला. आरोपी किरण तुकाराम घरबुडवे (वय ४३, रा. भातंबरे ता. बार्शी) हा धामणगाव येथून त्यांचे गावी भातंबरे (ता. बार्शी) येथे जात असताना मौजे मुंगशी आर ते उपळे दुमाला जाणारे रोडचे दरम्यान पत्नी व दोन मुले यांचेसह त्यांचे मोटारसायकलवरुन जात असताना रोडवर मयत आरोपीची पत्नी सोनाली हिस तिचे वडिलांचे शेतजमीनीपैकी तिचे हिश्याची असलेली जमीन घेणेबाबत मयत सोनालीस वारंवार सांगत होता. परंतु मयत सोनाली ही वडिलांचे जमिनीमध्ये हिस्सा घेत नव्हती, याचा राग मनात धरुन आरोपी किरण घरबुडवे याने पत्नी सोनाली हिस चिडून जाऊन लोखंडी कोयत्याने डोक्यात व मानेवर वार करुन जीवे ठार मारले. म्हणून फिर्यादी अतुल दिलीप हेडंबे यांनी आरोपी किरण तुकाराम घरबुडवे (रा. भातंबरे) याचे विरुद्ध वैराग पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवला. त्यानंतर तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक विनय रामचंद्र बहिर यांनी आरोपीस ताब्यात घेऊन सबळ पुरावा गोळा करुन आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर सदर खटल्याच्या सुनावणीमध्ये सहाय्यक सरकारी अभियोगता दिनेश देशमुख यांनी काम पाहिले. सदर खटल्यामध्ये सुनावणी दरम्यान फिर्यादी, आरोपीची मुलगी इतर साक्षीदार यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

सदर प्रकरणी सरकार पक्षाच्यावतीने एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. तसेच तपासा दरम्यान गोळा केलेले पुरावे हे सरकारी वकील यांनी न्यायालयासमोर मांडले. सरकारी पक्षाचा पुरावा याचा विचार करता जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती व्ही.एस. मलकलपट्टी रेड्डी यांनी आरोपी किरण तुकाराम घरबुडवे यास जन्मठेपेची शिक्षा व दहा हजार रुपये दंड जर दंड नाही भरला तर सहा महिन्याची साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील दिनेश देशमुख यांनी काम पाहिले. सदर केसमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शीचे अशोक सायकर व वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. सदर गुन्ह्याचा तपास अधिकारी पोलीस निरीक्षक विनय रामचंद्र बहिर यांनी केला होता. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोहेकॉ कुणाल पाटील यांनी काम पाहिले.



# जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेत अभिनव अळगी प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा जेऊर या शाळेतील विद्यार्थी अभिनव आळगी कथाकथन स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम आले आहे.जिल्हा परिषद, सोलापूर व ओपन लिंक्स फाउंडेशन (विनोबा अँप, पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळां जेऊर मधील इयत्ता १ ली ते ८ वी विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्य विकासासाठी' नन्हें सितारे' हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत स्पोकन इंग्लिश, स्टोरी टेलिंग, स्पेलिंग बी, पोएट्री रीक्शन या स्पर्धांमध्ये शालेय स्तरावर सराव करून विनोबा अँपवर व्हिडीओ अपलोड करण्यात आले होते. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा एस आर पी एफ कॅम्प क्रमांक दहा येथे जिल्हा स्पर्धेत इयत्ता दुसरीतील विद्यार्थी अभिनव आळगी याचा प्रथम क्रमांक आला. त्याचे शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा विस्तार अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबळे, शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, करजगी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी, जेऊरचे केंद्रप्रमुख कृष्णात मोरे, शिक्षक समितीचे तालुकाध्यक्ष शंकर अजगोंडे, मराठीचे मुख्याध्यापक आमसिद्ध उमराणी, कन्नडचे मुख्याध्यापक राजकुमार पाटील, जेऊचे पोलीस पाटील रहमान आतार यांनीही कौतुक केले. अभिनवला स्नेहल क्षीरसागर, संध्याराणी माने उर्मिला शिवगोंडे, सुमित्रा जमादार, संगमेश्वर कोणदे, महादेव सोनार, नागप्पा आळगी यांचा मार्गदर्शन लाभले.






# मर्दानी कला ह्या इव्हेंटमध्ये पलक वाघेची राज्यस्तरीय निवड

**तभा वृत्तसेवा**
**पांगरी, दि.२१ जानेवारी-**

पांगरी येथील स्व. शोभाताई सोपल इंग्लिश मेडीयम मधील कुमारी पलक वाघेची क्रीडा व युवकसेवा संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा - क्रीडा अधिकारी अहिल्या नगर यांच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या अष्टे डू मर्दानी आखाडा विभाग स्तर क्रीडा स्पर्धेमध्ये मर्दानी कला ह्या इव्हेंट मध्ये अंडर १४ वयोगटात निवड झाली.

कुमारी पलक वाघेची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाल्या बद्दल सर्व स्टाफच्या वतीने संस्थापक अध्यक्ष विनायक गरड यांनी अभिवादन केले आहे. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# राष्ट्रीय ऑलिंपियाड स्पर्धेत एसपी स्कूलचे सुयश

**२१ सुवर्ण, २४ रौप्य, १७ कांस्य पदकांची कमाई**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२१ जानेवारी-**

राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या गणित, विज्ञान व इंग्रजी विषयांच्या ऑलिंपियाड स्पर्धेत एसपी स्कूल नांदोरे तालुका पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी २१ सुवर्ण, २४ रौप्य व १७ कांस्य अशी एकूण ६२ पदके मिळवत उत्तुंग यश संपादन केले. या स्पर्धेमध्ये प्रशालेतील एकूण ३१८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी २२१ विद्यार्थ्यांची द्वितीय पातळीसाठी निवड झाली.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे मार्गदर्शक डॉ.नंदकुमार होनराव, संस्थापक अध्यक्ष डॉ.संतोष वलगे, सचिन अश्वराज वाघ, सहसचिव बाळासाहेब चव्हाण, खजिनदार विक्रम भिंगारे, प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण, उपमुख्याध्यापक कुणाल निंबाळकर, माध्यमिक विभाग प्रमुख साईनाथ कुंभार यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना एसपी स्कूलच्या विविध विषयांचे शिक्षक, शिक्षिका यांचे मार्गदर्शन लाभले. एडूहील (BEME) एक नोंदणीकृत संस्था असून जी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात काम करते. या संस्थेद्वारे शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर (गणित, विज्ञान, इंग्रजी, सायबर इ.) विद्यार्थ्यांची प्रतिभा ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे,विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांची शारीरिक, मानसिक तयारी व्हावी, विद्यार्थ्यांची तर्कशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि डिजिटलकौशल्यविकसितव्हावीतयासाठी पहिली ते बारावीतील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा आयोजित करण्यात येतात.



**सुवर्णपदक :** नक्ष गादिया, स्वरा कदम, शिवाई पाटील, प्रेमकुमार विभुते, पृथ्वीराज वाघ, श्रद्धा चव्हाण, आनंदी गुळदगड, तनिषा उलभगत, स्मृती वलगे, प्रगती कदम, ज्ञानेश्वर खारे, प्रिया पवार, तृष्णा शिरसाट, अभिजीत देशपांडे, वेदिका उलभगत, उत्कर्ष झुरुळे, आसावरी गायकवाड, अक्षरा व्यवहारे, सार्थक सरवदे, वेदांत वलगे.

**रौप्य पदक :** प्रेम बंडलकर, आदित्य कानगुडे, सारा गायकवाड, वल्लभ गायकवाड, पार्थ केचे, वरदराज नाईकनवरे, अभिनव तळेकर, श्रद्धा चव्हाण, श्रेया जिरेकर, आविष्कार पाटील, आर्या बाबर, प्रणव चव्हाण, समर्थ डरंगे, प्रीती जाधव, संस्कार पाटील, श्रेयश पाटील, तन्वी बाबर, सृष्टी बनसोडे, आरोही उलभगत, अक्षरा व्यवहारे, सिद्धांत भिंगारे.

**कांस्य पदक :** अधिरा भांगे, प्रिया साळुंखे, स्वरांजली काटवटे, संभवी लांडे, शौर्य सातुरे, अनिरुद्ध गायकवाड, स्वराली गुळदगड, संग्राम पाटील, सिद्धी कुलकर्णी, आर्यन वाघ.

## महत्वाचे...



### बार्शीत म्हशीला झाली जुळी रेडकं

**बार्शी, दि.२१ जानेवारी-**

येथील सुभाषनगर भागात राहणारे संतोष हरिभाऊ नायकू यांच्या म्हशीला चक्क जुळी रेडकू झाली आहेत. यामध्ये एक रेडा आहे व एक रेडी असल्याची माहिती नायकू यांनी दिली आहे. नायकू यांच्या पिढ्यानपिढ्या दुग्ध व्यवसाय असून आजही त्यांच्या गोठ्यात लहान मोठी ३५ जनावरे आहेत. मात्र अशा प्रकारे म्हशीला जुळी एकाच वेळी दोन रेडकू झाल्याची पहिलीच घटना आहे. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सदर म्हैस ही घरची असून तिचे हे सातवे वेत आहे. आतापर्यंत प्रत्येक वेताला एकावेळी तीन-चार लिटर दूध दिलेले आहे, अशी ही पंढरपुरी गौळवू म्हैस मात्र चर्चेत आली आहे.



### तळेकर विद्यालयातील शोभा लोंढे यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव

**जेऊर, दि.२१ जानेवारी-**

जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था बाळे, सोलापूर यांच्या वतीने देण्यात येणारा सन २०२५- २६ चा आदर्श शिक्षक पुरस्कार राजाभाऊ तळेकर विद्यालयातील शिक्षिका शोभा महादेव लोंढे यांना प्रदान करण्यात आला. सदरचा पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. १८ जानेवारी रोजी पंढरपूर येथील सिंहगड संस्थेच्या प्रांगणामध्ये पार पडला. सदर कार्यक्रमास मा. शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत आणि पतसंस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. शोभा लोंढे यांनी मागील ३५ वर्ष विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे कार्य केले आहे. त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेनेतर्फे मोफत देवदर्शन यात्रा

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त सोलापुरातील प्रभाग क्रमांक तीनमध्ये शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) यांच्यावतीने मोफत देव-दर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त प्रभागातील वृद्ध महिलांना शीलम कोट देवी, यडपाल देवी, रायचूर येथील मल्लय्या शरण बसवेश्वर, धत्तरगी भागम्मा आदी धार्मिक ठिकाणी यात्रा होणार आहे. विभाग प्रमुख दीपक दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या यात्रेचे नियोजन केले आहे. यात्रेचे संयोजन शिवा ढोकळे यांनी केले. यात्रा यशस्वी करण्यासाठी गणेश बडवणे, अमोल पवार, नीलकंठ हत्ती (मुंबई) तसेच शिवसैनिक परिश्रम घेत आहेत.



### सांगोला महाविद्यालयामध्ये पारंपरिक दिन साजरा

**सांगोला, दि. २१ जानेवारी-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयामध्ये पारंपरिक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा.डॉ.रामचंद्र पवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष लोंढे यांनी विद्यार्थ्यांना तिळगूळ वाटप केले. पारंपरिक दिनाचे औचित्य साधून प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी हे पारंपरिक वेशभूषा परीधान करून आल्यामुळे महाविद्यालयामध्ये उत्साहाचे वातावरण होते. याप्रसंगी घेण्यात आलेल्या पारंपरिक वेशभूषा सादरीकरण स्पर्धेमध्ये आर्यन माने-प्रथम, स्वाती हजारे- द्वितीय, अर्पिता गुत्तेदार- तृतीय, सदानंद गेजगे- उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला. परीक्षक म्हणून प्रा.डॉ.व्ही. एस.गाडेकर, प्रा.व्ही.एम.ढेकळे, प्रा.आर.एच.शेवाळे यांनी कामकाज पहिले. सूत्रसंचालन प्रा.संतोष कांबळे, प्रा.प्रसाद लोखंडे यांनी केले. आभार प्रा.डॉ.विद्या जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.श्यामराव नवले, प्रा.डॉ.आर.आर.ताटे, प्रा.डॉ.नवनाथ शिंदे, प्रा.डॉ.मालोजी जगताप, प्रा.डॉ.सदाशिव देवकर, प्रा.विशाल कुलकर्णी, प्रा.महेश बडवे, प्रा.अपूर्वा गोपाळकर, प्रा.रोशनी शेवाळे, प्रा.तेजश्री मिसाळ, प्रा.एस.डी.माने, प्र.अधीक्षक विलास माने, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### अंजना आर्वे



**पिलीव, दि. २१ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील अंजना सुनिल आर्वे (वय ५३) यांचे आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन दीर असा परिवार आहे.

### विठ्ठल जमादार



**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूर डि.सी.सी. बँकेचे निवृत्त बॅक इन्स्पेक्टर विठ्ठल दौलता जमादार यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल समाजातील सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मंगळवेढ्यात जिल्हा परिषद गटासाठी ६२ तर पंचायत समिती गणासाठी १२० उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ जानेवारी-**

मंगळवेढा तालुक्यात जिल्हा परिषद गटातून ६२ आणि पंचायत समिती गणांमधून १२० अशा मिळून एकूण १८२ उमेदवारी अर्ज आज अखेर दाखल झाले. आता पुढील टप्प्यात छाननी, जोडपत्रे तपासणी, अपात्र अर्ज फेटाळणी आणि शेवटची उमेदवारी यादी जाहीर होणार आहे. त्यानंतर अधिकृत उमेदवारांच्या प्रचाराला खऱ्या अर्थाने वेग येणार असून ग्रामीण भागात घराघरांत, शिवारात आणि वाड्यावस्त्यांवर विकासाच्या प्रश्नांवर चर्चा रंगणार आहे. पाणी, रस्ते, सिंचन, शिक्षण, युवकांना रोजगार आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कोणती राजकीय बाजू जनतेला विश्वास देऊ शकते, याची खरी कसोटी येणाऱ्या निवडणुकीत लागणार आहे. उमेदवारी अर्जांचा आजचा मोठा आकडा पाहता मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका अत्यंत चुरशीच्या, बहुकोनी आणि रंगतदार होणार हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे.

दि.२१ जानेवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. आजअखेर एकूण दाखल अर्ज -

**जिल्हा परिषद गट :** संत दामाजीनगर - २०, हुलजंती - ०६, लक्ष्मी दहिवडी - १७, भोसे - १९ एकूण - ६२.

**पंचायत समिती गण :** संत दामाजीनगर - ०७, बोराळे - १२, हुलजंती - १५, मरवडे - १०, संत चोखामेळानगर - १०, लक्ष्मी दहिवडी - २६, भोसे - २१, रड्डे - १९ एकूण - १२०. जि प व पं स एकूण - १८२.

सकाळपासूनच विविध गटातील संभाव्य उमेदवार, त्यांचे कार्यकर्ते व समर्थक यांचा तहसील कार्यालयासह अर्ज केंद्रांवर मोठी गर्दी दिसून आली. वातावरणात उत्सुकता, हुरूप, घोषणा आणि काही ठिकाणी गाठीभेटींची लगबग सुरू होती. प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त, सीसीटीव्ही निरीक्षण व स्वतंत्र मदत केंद्राच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडली. संत दामाजीनगर या महत्वाच्या गटात आज अखेर तब्बल २० अर्ज दाखल झाले. या गटात चुरशीची लढत होणार असल्याचे चित्र आहे. या गटात रामचंद्र सलगर, अमोल ईश्वर गडदे, अमसिद्ध केदार, गणेश बेदरे, महावीर ठेंगील, सिद्धेश्वर डोके, हरिदास बेदरे, सूर्यकांत ठेंगील, बंडू ढाणे, सिद्धेश्वर आवताडे आदींच्या अ ज ा ं म ु ळे राजकीय चर्चेला उधाण आले आ ा हे .



बंडखोर आणि अपक्षांची संख्या लक्षणीय आहे. हुलजंती गटात एकूण ६ उमेदवारी अर्ज दाखल झाले. संगीता दुधाळ, करिश्मा दुधाळ, मीनाक्षी सूर्यवंशी, जयश्री माने, उन्नती पवार यांच्यासह आणखी एका उमेदवाराने अर्ज जमा केल्याने या गटातही चांगली स्पर्धा रंगण्याची शक्यता आहे. लक्ष्मी दहिवडी जिल्हा परिषद गटात एकूण १७ अर्ज दाखल झाले. शिला शिवशरण, कविता खडतरे, दामिनी शेवडे, करुणा शिवशरण, मंगल शिवशरण, उज्वला मस्के, कांचना शिंदे, कोमल ढोबळे यांच्यासह इतर उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने या गटातही बहुकोनी लढत होणार आहे. भोसे जिल्हा परिषद गटात १९ उमेदवारी अर्ज जमा झाले. प्रदीप खांडेकर, बापू मेटकरी, संजय कोळेकर, दाजी ेलतडे, रामचंद्र जाधव, संतोष बिराजदार, राम दास मिसकर, महेश टिके, धर्माण्णा हताळी, ज्ञानेश्वर कराडे, श्रीशैल ताळी, सिद्धेश्वर रणे, सिद्धेश्वर आवताडे, शंकर भगरे आदींच्या अर्जांमुळे या गटात विविध पंथ, सम ाजघटक आणि राजकीय गटांचे प्रतिनिधित्व उमेदवारीतून दिसून आले. या चारही गटांच्या मि ळून जिल्हा परिषद स्तरावर मंगळवेढा तालुक्यात एकूण ६२ अर्ज दाखल झाले. दरम्यान पंचायत समिती गणनिहाय पाहता आज अखेर एकूण १२० उमेदवारी अर्ज जमा झाले आहेत. संत दामाजी नगर पंचायत समिती गणात सविता कोकरे, सुचिता पुजारी, राणी ठेंगील, स्वप्नाली गडदे, जयश्री शिंदे, जिजाबाई घोडके, वैष्णवी कोकरे अशा ७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. बोराळे गणात १२ अर्ज दाखल झाले असून राणी गावकरे, स्मिता म्हमाणे, जयश्री कवचाळे, सारिका धसाडे, शोभा म्हमाणे, रुपाली कोरे, अंबिका कवचाळे, तनुजा गावकरे आदींचा समावेश आहे.

हुलजंती पंचायत समिती गणातही नागनाथ मासाळ, अनिलकुमार दुधाळ, दत्तात्रय धायगोंडे, विनोदकुमार बिराजदार, बिराप्पा माळी, सिद्धेश्वर कोटगोंडे, दशरथ गाडवे, महेश माने, महादेव पेटरजे यांच्यासह एकूण १५ अर्ज भरले गेले आहेत. मरवडे पंचायत समिती गणात मोहिनी गणपाटील, मीनाक्षी सूर्यवंशी, तेजश्री शेणवे, उन्नती पवार, प्रियांका पवार, उषा पाटील, सायली जाधव, सुदामती चौधरी आदींच्या एकूण १० उमेदवारी अर्जांची नोंद झाली आहे. संत चोखाम ेळानगर गणात अंजली मोरे, दीपाली ताड, रोहिणी लेंडवे, संगीता लेंडवे, उषा बिले, रेशमा गुंगे, प्रणाली आवताडे, सविता गायकवाड यांच्यासह एकूण १० अर्ज दाखल झाले. लक्ष्मी दहिवडी पंचायत समिती गणात तर सर्वाधिक प्रतिसाद होता. तब्बल २६ उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याची नोंद आहे. महादेवी राजकुमार मेतकुटे, महादेव शंकर ढोणे, दीपक मच्छिन्द्र आसबे, हणमंत कृष्णा क्षिरसागर, सुरेश बापू भाकरे, विनायक माधवराव यादव, रोहिणी विनायक यादव, काशीलिंग हनुमंत रणदिवे, विक्रम तुकाराम यादव, काकासाहेब मोहनराव मोरे, सुजाता संजय पवार, दादासो नंदू गायकवाड, लव्हाजी दिलीप लेंडवे, सिद्धेश्वर बबनराव आवताडे, प्रणाली सिद्धेश्वर आवताडे, विलास पाटील आदींच्या उमेदवारीमुळे हा गण प्रचंड चुरशीचा ठरणार आहे. विविध पक्षांचे तिकिट, स्थानिक पातळीवरील गट-उपगट आणि ग्रामपंचायत स्तरावरील नाराजी या सर्वांचे प्रतिबिंब या गणातील मोठ्या संख्येने भरलेल्या अर्जांतून स्पष्टपणे दिसून येते.

भोसे पंचायत समिती गणात दामाजी बाबा सलगर, प्रवीण ज्ञानोबा मेटकरी, महादेव ज्ञानोबा गायकवाड, अनिल राजाराम गरंडे, मच्छिन्द्र यशवंत खताळ, नाथाजी सुखदेव काशीद, दिगंबर हणमंत गरंडे, नानासो राजाराम चोपडे आदींसह एकूण २१ अर्ज दाखल झाले आहेत.

रड्डे गणात सुरेश ईश्वर कांबळे, साधू मायाप्पा गेजगे, धनाजी मुरलीधर खडतरे, तानाजी मुरलीधर खडतरे, दत्तात्रय बाबासाहेब कांबळे, भीमराव दगडू कांबळे, मारुती अयलाप्पा वाघमारे, शरद बापूराव परकाळे, सौरभ पंडितराव कांबळे, आकाश नामदेव डांगे, सचिन नारायण कांबळे, बिराप्पा रामन्ना इंगळे, अंकुश कुंडलिक कांबळे, सत्यवान हरिबा कांबळे, मंदाकिनी संगप्पा कांबळे अशा १९ उमेदवारांनी नावे नोंदवली आहेत. या दोन्ही गणांत विविध समाजघटकांतील उमेदवारांनी मोठ्या संख्येने अर्ज दाखल केल्याने मतदानाच्या वेळी मतांचे विभाजन कसे होईल याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

## बार्शीत जिल्हा परिषदेसाठी ६० तर पंचायत समितीसाठी ११० अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणासाठी आज बुधवारी शेवटच्या दिवशी जिल्हा परिषदेच्या ६ गटांसाठी ६० उम ेदवारांचे अर्ज तर पंचायत समिती १२ गणासाठी ११० उमेदवारांचे अर्ज दाखल झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले यांनी सांगितले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख, बार्शी न. प. चे मुख्याधिकारी तैमुर मुलाणी उपस्थित होते.

अर्ज दाखल करण्यासाठी आज शेवटचा दिवस असल्याने तहसील कार्यालय परिसरात तालुक्यातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येत गर्दी झाली होती. त्यामुळे बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

**जिल्हा परिषद गटासाठी :** उपळाई (ठों)- ८, पांगरी- १०, उपळे दुमाला- १०, पानगाव- १०, मालवंडी- ११ व शेळगांव आर- ११ असे ६० अर्ज दाखल झाले.

**पंचायत समिती गणासाठी :** उपळाई (ठों)- ७ आगळगाव- ६, पांगरी- ११, कारी- ७, उपळे दुमाला- ९, गौडगाव- ८, बावीस आ- ९, पानगाव- १३, मालवंडी- ११, सासुरे- ११, मानेगाव- ९, शेळगाव (आर)- ९ असे ११० अर्ज दाखल करण्यात आले. मंगळवारपर्यंत जिल्हा परिषदेसाठी १६९ तर पंचायत समिती गणासाठी २९१ असे एकूण आजपर्यंत ४६० अर्जांची विक्री झाली होती. पण आज बुधवारी अर्ज भरण्याचा शेवटच्या दिवशी वरील प्रमाणे अर्ज दाखल झाले असून आज गुरुवारी अर्जाची होणार आहे. ख-या लढतीचे चित्र २७ जानेवारी रोजी सम जणार आहे.

## माळशिरसमध्ये जि.प.साठी ९४ तर पंचायत समितीसाठी १५४ अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस,दि.२१ जानेवारी-**

माळशिरस स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांची आज अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषदेच्या नऊ जागांसाठी ९४ तर पंचायत समितीच्या १८ जागांसाठी १५४ अर्ज दाखल झाले .खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, यांच्यासह माजी आम दार राम सातपुते सह तालुक्यातील विविध पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत शक्ती प्रदर्शनात अर्ज दाखल करण्यात आले, शेवटच्या दिवशी जास्त अर्ज दाखल झाल्याने तहसील आवारात मोठी गर्दी झाली होती. उमेदवारांची अर्ज दाखल करण्यासाठी धावपळ दिसत होती .

प्रमुख नेतेमंडळीत माजी सभापती वैष्णवी देवी मोहिते पाटील ,अर्जुनसिंह





मोहिते पाटील, माजी सभापती राजलक्ष्मी माने पाटील, माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते ,सह माजी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्यांसह नवीन चेहऱ्यांनी आज शक्ती प्रदर्शनात अर्ज दाखल केले .

**पती-पत्नींचा झेडपी अन् पंचायतीसाठी अर्ज**

माजी सभापती वैष्णवी देवी मोहिते पाटील यांनी पंचायत समिती साठी यशवंतनगर गणातून तर जिल्हा परिषदेसाठी फोंडशिरस गटातून अर्ज दाखल केला तर अर्जुनसिंह मोहिते पाटील पंचायत समितीसाठी गुरसाळे गणातून व जिल्हा परिषदेसाठी फोंडशिरस गटातून अर्ज दाखल केला आहे. आज अखेर एकूण जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी गट व गण निहाय आहे दाखल झालेले अर्ज :

**जिल्हा परिषद गट** : दहीगाव ९ , मांडवे १४ , फोंडशिरस ११, संग्रामनगर १४, माळीनगर ११, बोरगाव ९ , वेळापूर ८,निमगाव ९ , पिलीव ९ , एकुण ९४

**पंचायत समिती गण** : गुरसाळे १३ , दहिगाव ६ ,मांडवे ६ , कन्हेर ७, भांबुर्डी ४, फोडशिरस ६, संग्रामनगर ४,मेडद १५ , माळीनगर ८, लवंग ९ , बोरगाव ५ , जांभुड १० , वेळापूर १५ ,यशवंतनगर ८ , निमगाव १० , गोरडवाडी १३ , पिलीव १०, तांदुळवाडी ५ , एकुण १५४

## माढा तालुक्यात ७११ अर्जांची विक्री, २४६ जणांचे अर्ज दाखल

### शेवटच्या दिवशी एकूण २११ अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि. २१ जानेवारी-**

माढा तालुक्यातील ७ जिल्हा परिषद - व १४ पंचायत समिती गणासाठी ७११ अर्जांची विक्री झाली असून बुधवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी २११ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. दोन दिवसात जिल्हा परिषदेच्या ७ व पंचायत समितीच्या १४ जागेसाठी एकूण २४६ अर्ज दाखल झाले आहेत.

ज्या उमेदवाराला एबी फॉर्म मिळाले त्यांनी शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला तसेच म ानेगाव जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेले दादासाहेब साठे व सुहास पाटील जामगावकर यांच्या एबी फॉर्म देण्यासाठी नाट्यमय घडामोडी घडवून फॉर्म भरण्याच्या अंतिम क्षणी सुहास



पाटील जामगावकर यांना एबी फॉर्म देण्यात आला.

**गटनिहाय उमेदवार संख्या**

भोसरे - १८,मानेगाव -१५,उपळाई (बु)-०८,कुर्डू -०७,टेंभूर्णी-०७, बेंबळे-११, मोडनिंब- ०८

**गण निहाय उमेदवार संख्या -**

रोपळे (क)-०७, भोसरे-१६, मानेगाव-१२, दारफळ-०८, उपळाई (बु)-०८, भुताष्टे-१८, कुर्डू-१५, अकोले (खु)-१०, रांझणी-१७, टेंभुर्णी-१४, पिंपळनेर-१९, बेंबळे-१०, लऊळ-०७, मोडनिंब-०६.

## मोहोळमध्ये १०१ जणांचे अर्ज

**मोहोळ,दि.२१ जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषदेसाठी ६ जागेसाठी ९० आणि पंचायत समितीच्या १२ जागेसाठी १०१ जणांनी अर्ज दाखल केले .अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. शेवटच्या दिवशी बऱ्याच पक्षांच्या पक्षप्रमुखांना काही उमेदवारांनी दुसऱ्या पक्षाचा एबी फॉर्म खिशातच आहे असे सांगून मूळ पक्षाची उमेदवारी मिळविल्याची चर्चा आहे. शेवटच्या दिवशी जिल्हा परिषदेचे अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील नरखेड मधून, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे यांनी पोखरापूरमधून, भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष सुनील चव्हाण आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मानाजी माने, आणि प्रभाकर भैय्या देशमुख (उबाठा) यांनी पेनूर मध्ये, कामती (बु) मधून विमल तानाजी खताळ, आदी मान्यवरांचा समावेश आहे. तर पंचायत समितीसाठी कामती बुद्रुक गणातून भाजपाच्या दिपाली कोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून, तर भाजपाकडून कोमल अवताडे, सय्यद वरवडे मधून विजय कोकाटे (अजित राष्ट्रवादी), राहुल मोरे (भाजप,) रिपाईचे मार्तंड उर्फ तात्या काळे यांनी अपक्ष, तर पोखरापूर मधून भाजपाचे संजीव खिलारे, टाकळी सिकंदर मधून शिवसेनेच्या स्वाती दीपक गवळी, घोडेश्वर मधून संजय विभुते (राष्ट्रवादी) अस्लम चौधरी (भाजप) आदींचे अर्ज दाखल केले.

## सांगोला तालुक्यात जि.प.साठी १४१ तर पं.स.साठी १९७ अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा,
सांगोला,दि.२१ जानेवारी -

बुधवार दि.२१ जानेवारी अखेर सांगोला तालुक्यातील ७ जिल्हा परिषद गटातून १४१ तर १४ पंचायत समिती गणातून १९७ असे एकूण ३३८ उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली.

दाखल झालेल्या अर्जापैकी जिल्हा परिषद गटासाठी महूद बु- १६, एखतपुर- १३, जवळा- २८, कडलास- २६, चोपडी- २८, कोळा- १६, घेरडी- १४ दाखल असे एकूण १४१ तसेच पंचायत समिती गणासाठी महुद बु- १०, चिकमहुद- १७, वाकी शिवणे- १०, एखतपुर- ११, वाढेगाव- १०,जवळा- १५, कडलास- २३, अजनाळे- १३, राजुरी- १३, चोपडी- २१, कोळा- ७, हातीद- १२, सोनंद- ११, घेरडी- २४ असे एकूण १९७ नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याची माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली. यावेळी तहसील कार्यालय, सांगोला येथे पोलीस निरीक्षक विनोद घुगे व एपीआय पवन मोरे यांनी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला होता अशी माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

# कुणाच्याही दबावाला बळी पडणार नाही : आमदार अभिजीत पाटील

### ताकदीने निवडणूक लढवणार असल्याचे सूतोवाच

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ जानेवारी -**

कुणाच्याही दबावाला आजपर्यंत आपण बळी बळी पडलो नाही आणि यापुढे देखील पडणार नाही असे सांगत मोठ्या ताकदीने पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक लढविणार असल्याची भिष्म प्रतिज्ञा विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी केली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीतील आपल्या उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी आमदार अभिजीत पाटील येथील निवडणूक कार्यालयात आलेले होते. त्यावेळी पत्रकारांशी वार्तालाप करताना ते बोलत होते.



पालकमंत्र्यांकडून आपणावर कुठलाही दबाव आणण्यात आला नाही. या संदर्भात पत्रकारांना कुणीतरी चुकीची माहिती दिली आहे. पत्रकारांना ही माहिती कुणी दिली, कुठुन मिळाली त्याची आपणाला माहिती द्यावी असे देखील आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

नगरपालिका निवडणूकीच्या वेळी आमदार अभिजीत पाटील यांनी ऐन निवडणूकीच्या प्रचारातून अंग काढून घेतले होते.त्यावेळी देखील त्यांच्यावर दबाव आणण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. या संदर्भात अभिजीत पाटील यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे आम्ही त्यावेळी युती करीत होतो. त्यांची आमची आघाडी झालेली होती. त्यामुळे जर एकत्र लढण्याचे ठरल्या नंतर मग काही वाटाघाटी, चर्चा झाल्या नाहीत. त्यामुळे आम्ही विचार केला की याचा फायदा दूसऱ्यां मंडळींना होवू नये. पण त्या निवडणूकीत अगोदर पासून माझ्या सोबत आलेल्या उमेदवारांना त्यावेळी निवडणूकीतून थांबविणे देखील शक्य नव्हते. त्यामुळे माझ्या काही उमेदवारांसाठी त्या निवडणूकीत सहभाग घेऊन मला लढावे लागले. कारण मी जर त्या ठिकाणी यांच्याशी पुर्ण आघाडी केली असती तर पालिका निवडणूकीत काय निकाल (रिझल्ट) लागला असता हे आपणाला माहितीच आहे असेही आमदार पाटील यांनी सांगितले. पूर्वी राष्ट्रवादीच्या घड्याळाला आपला विरोध होता आता मात्र पुन्हा आपण घड्याळाला सोबत घेऊन लढता आहे या प्रश्नाला उत्तर देताना अभिजीत पाटील म्हणाले,विधानसभेच्या वेळी परिस्थिती वेगळी होती. कारण त्यावेळी प्रत्येक जण वेगवेगळे लढलेले होते. मात्र त्यावेळी जे घड्याळा सोबत होते ते आता कुठे चालले आहेत हे आपण पहातच आहात असा देखील टोला कल्याणराव आणि समाधान काळे बंधुचे नाव न घेता आमदार पाटील यांनी यावेळी लगाविला.

**भगिरथ भालके यांच्याशी चर्चा सुरु**

विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांच्या बरोबर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक विठ्ठल परिवाराच्या माध्यमातून एकत्र लढविण्यासाठी चर्चा सुरु असल्याची माहिती विठ्ठल कारखान्याचे विद्यमान अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी दिली.

**काळे बंधुंचे नाव न घेता केली टिका**

दोन्ही राष्ट्रवादीची सुत्रे आमदार अभिजीत पाटील यांच्याकडे आलेली आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) पक्षाचे तालुक्यातील नेते कल्याणराव काळे हे सध्या नाराज आहेत. त्यांचे बंधू समाधान काळे यांनी पत्नी मोनिका काळे यांचा वाखरी जिल्हा परिषद गटातून उमेदवारी अर्ज भरलेला आहे. सध्या कल्याणराव काळें हे भाजपाच्या वाटेवर आहेत त्यामुळे आमदार अभिजीत पाटील यांनी त्यांचा नाव न घेता समाचार घेतला. काळे बंधुंना उद्देशुन आमदार पाटील म्हणाले की, काही दिवसापूर्वी आपण जो नारा देत होतो विठ्ठल परिवार ऐक आला पाहिजे कारण त्यावेळी काही जणांचा त्या मध्ये स्वत:चा स्वार्थ होता. मात्र आता काय सगळं सोडून नको त्या ठिकाणी नको ते जात असतील ऐवढेच नाहीतर ज्याच्यां विरोधात आयुष्यभर लढलो त्यांच्याच वळचणीला आता जाऊन बसत असतील तर या मंडळींचा विचार कसला. ऐवढेच नाही तर मग ज्या लोकांनी शरदचंद्र पवार यांचा पूरोगामी विचार त्या ठिकाणी जपला होता त्याची काय आता पायमल्ली केली जाती आहे का ? याचा देखील विचार केला पाहिजे. दुसरीकडे मलाच जिल्हा परिषद सदस्यपद पाहिजे,आपल्याच घरात काहीतरी मिळाले पाहिजे याच्यासाठीच ही मंडळी सगळ्या अँडजेस्टमेंट करीत आसतात असा देखील टोमणा आमदार अभिजीत पाटील यांनी काळे बंधुंचे नाव न घेता लगाविला.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## धाराशिवात २८ जानेवारीला पेन्शन अदालत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
जिल्ह्यातील निवृत्तीवेतन धारकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने महालेखाकार कार्यालय, नागपूर व कोषागार कार्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कोषागार कार्यालय, धाराशिव येथील बैठक हॉलमध्ये पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी तसेच निवृत्तीवेतनाशी संबंधित कामकाज करणारे अधिकारी व कर्मचारी आणि सर्व निवृत्तीवेतनधारकांनी आपल्या प्रलंबित अथवा इतर समस्यांचे निराकरण करून घेण्यासाठी आवश्यक अभिलेख व कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्याच्या दृष्टीने या पेन्शन अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती अर्चना नरवडे यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### एकलव्यच्या विश्वजीत जाधवची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तुळजापूर, दि.२१ जानेवारी -**
धाराशिव जिल्हा थलेटिक्स असोसिएशन व जागर फाउंडेशन धाराशिव यांच्या सयुंक्त विद्यमाने जिल्हास्तर सब-ज्युनिअर थलेटिक्स अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा तुळजाभवानी क्रीडा संकुल धाराशिव येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये एकलव्य विद्या संकुलातील विश्वजीत जाधव याने ३०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून अहिल्यानगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विजयी खेळाडूंसह क्रीडा प्रशिक्षक ज्ञानेश्वर भुतेकर, बालाजी क्षीरसागर यांचे संस्थेचे अध्यक्ष उद्धव काळे, कार्यवाह, विवेक अयाचीत, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, नरेश पोटे, अशोक संकलेचा, अभय कुलकर्णी, डॉ. प्रणिता गडेकर, ॲड. जनक पाटील, ॲड. प्रदीपसिंग राजपूत, मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे, संस्थेचे संचालक मंडळ व सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

#### प्रा.डॉ. हाशमबेग मिर्झा यांची निवड

**नळदुर्ग, दि.२१ जानेवारी -**
महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये विद्यापीठे व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने बोलींचा जागर



हा राज्यस्तरीय कार्यक्रम शासनातर्फे आयोजित केला जात आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील विविध बोली भाषांचे संवर्धन व संरक्षण करणे आहे. यात नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विभागाचे प्रा. डॉ. हाशमबेग मिर्झा यांना दक्निनी बोली भाषेचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून निवडण्यात आले आहे. डॉ. मिर्झा महाविद्यालयात मागील २७ वर्षांपासून कार्यरत असून, त्यांनी दक्निनी बोलीवर यूजीसी दिल्लीचे चार संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. निवडीबद्दलसंस्थेचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण, उल्हास बोरगावकर, बाबुराव चव्हाण, रामचंद्र आलुरे यांसह महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी व प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, कार्यालय अधिक्षक धनंजय पाटील, डॉ. अशोक कदम यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# लोहारा तालुक्यात को-ऑप क्रेडिट सोसायटीत कोट्यवधींचा घोटाळा

### मॅनेजर व पत्नीविरुद्ध १.७९ कोटींच्या अपहारप्रकरणी गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
लोहारा तालुक्यातील माकणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखेत तब्बल १ कोटी ७९ लाख ६७ हजार १७० रुपयांचा आर्थिक अपहार झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी शाखा व्यवस्थापक व त्यांच्या पत्नीविरुद्ध लोहारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यांप्रकरणी आरोपींची नावे महादेव हावगिरप्पा मुर्गे व ज्योती महादेव मुर्गे (दोघे रा. माकणी, ता. लोहारा, जि. धाराशिव) अशी आहेत. फिर्यादी ज्योतेश रामराज कावळे (वय ३५, व्यवसाय खाजगी नोकरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., आनंदनगर, धाराशिव; रा. कावळेवाडी, ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार हा प्रकार दि.१ फेब्रुवारी २०२० रोजी रात्री ११ वाजल्यापासून ते २२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत घडला आहे.

तक्रारीनुसार, आरोपी महादेव मुर्गे हे माकणी येथील शाखेचे मॅनेजर असताना त्यांनी ठेवीदारांकडून ठेवी स्वीकारल्या.

मात्र ठेवींची मुदत संपल्यानंतरही ठेवीदारांना त्यांची रक्कम परत न करता, बनावट मुदत ठेव (एफ. डी.) पावत्या छापून ठेवीदारांची व संस्थेच्या खातेदारांच्या बचत खात्यातील रक्कम परस्पर उचलली. ही रक्कम त्यांनी स्वतःच्या नावावरील खात्यावर तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा माकणी येथील स्वतःच्या व पत्नी ज्योती मुर्गे यांच्या खात्यावर वर्ग केली, असा आरोप आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, माकणी

आरोपी पती-पत्नींनी आपसात संगनमत करून संस्थेचा व ठेवीदारांचा विश्वासघात करत फसवणूक केली, असे फिर्यादीत नमूद आहे. या अपहाराची एकूण रक्कम १,७९,६७,१७० रुपये इतकी आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दि. २० जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून लोहारा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३१६ (५), ३३८, ३३६ (३), ३४० (२) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास लोहारा पोलीस करीत असून, अन्य संबंधितांची भूमिका तपासली जात आहे.

### बसवराज पाटील यांनी दिलेला शब्द पाळला..

## जि.प. व पं.स. निवडणुकीत सर्वसामान्य कार्यकर्त्यांनाच संधी : शरण पाटील



**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२१ जानेवारी -**
विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा लातूर भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष, माजी मंत्री बसवराज पाटील यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आपल्या परिवारातील कोणत्याही सदस्याला संधी न देता सर्वसामान्य कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्याचा दिलेला शब्द पाळला, अशी चर्चा उमरगा-लोहारा तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे.

उमरगा शहरातील आदर्श महाविद्यालयात दि.२१ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत भाजपाचे युवा नेते शरण पाटील यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, काही दिवसांपूर्वी माजी मंत्री बसवराज पाटील यांनी उमरगा-लोहारा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत पाटील परिवारातील कोणालाही उमेदवारी न देता सर्वसामान्य कार्यकर्त्यांनाच संधी देण्याचे आश्वासन दिले होते, आणि ते त्यांनी प्रत्यक्षात पाळले आहे.

उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनानुसार सर्वसामान्य व निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देण्याचा निर्णय घेतला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेत पुढे बोलताना शरण पाटील म्हणाले की, भाजपने अल्पसंख्यांक, ओबीसी, अनुसूचित जाती तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील कार्यकर्त्यांना उमेदवारी देऊन पक्षातील अंतर्गत लोकशाही अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे.

हा निर्णय म्हणजे तळागाळातील कार्यकर्त्यांच्या कष्टांना दिलेली पावती असून, 'कार्यकर्ता हाच पक्षाचा केंद्रबिंदू' हा भाजपाचा विचार प्रत्यक्षात उतरवण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

## नळदुर्गमध्ये दोन वाहनांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
नळदुर्ग पोलीस ठाणे यांनी गत २० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १२:०० ते १२:३० दरम्यान दोन युवकांकडून सार्वजनिक रस्त्यावर वाहने धोकादायकरीत्या उभी ठेवण्यात आल्याची माहिती मिळाल्यावर कारवाई केली.

आरोपी संभाजी नंदु कांबळे (वय १८, रा. चांभारगल्ली, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) व अजय पप्पु कांबळे (वय २१, रा. बौध्दनगर, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी अनुक्रमे टो रिक्षा क्र. एमएच १३ ए.डी. ०५४८ व टो रिक्षा क्र. एमएच १३ एन ६२१८ नळदुर्ग बसस्थानकाजवळ रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभी केली होती.

पोलीसांनी सरकारतर्फे मिळालेल्या प्रथम खबरेवरून दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम २८५ अंतर्गत स्वतंत्र दोन गुन्हे नोंदवले आहेत.

## तुळजाभवानी मंदिर परिसरात भाविकेची पर्स चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या एका भाविकेच्या पर्समधील रोख रक्कम चोरीस गेल्याची घटना घडली असून, तुळजापूर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत तीन महिला आरोपींना ताब्यात घेऊन गुन्ह्याची कबुली मिळवली आहे.

**तिघे ताब्यात; गुन्ह्याची कबुली**

यांप्रकरणी फिर्यादी कल्पना सतीश गांगुर्डे (वय ३३, रा. मोरे वस्ती, चिखली, पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्या दि. २० जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी आल्या असताना त्यांच्या पर्समधील १२,००० रुपये रोख रक्कम अज्ञात व्यक्तींनी चोरी केली.

या प्रकरणात संशयित आरोपी सरोजा प्रेम पवार (वय २५, रा. चिंचोली, ता. तुळजापूर, जि. धाराशिव), करीना अमोल पवार (वय २२, रा. जुना बस डेपो, धाराशिव) व वैशाली प्रकाश शिंदे (वय ४०, रा. महोळ चौक, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध फिर्यादीने दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीच्या आधारे तुळजापूर पोलिसांनी वरील तिन्ही महिला आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. पुढील तपास तुळजापूर पोलीस करीत आहेत.

## मधुकरराव चव्हाण यांची तिसरी पिढी राजकारणात

### नातू रणवीर चव्हाण यांचा अणदूर पंचायत समितीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.२१ जानेवारी -**
माजी मंत्री तथा तुळजापूर तालुक्याचे भाग्यविधाते आणि सहकार महर्षी मधुकरराव चव्हाण यांच्या कुटुंबाची तिसरी पिढी राजकारणात सक्रिय झाली असून, त्यांचे नातू रणवीर चव्हाण यांनी अणदूर पंचायत समिती गणातून भारतीय जनता पक्षाच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. रणवीर चव्हाण यांच्या या राजकारणातील प्रवेशाचे सर्वत्र स्वागत केले जात आहे.

तुळजापूर तालुक्यात विकासाचे प्रणेते म्हणून ओळखले जाणारे मधुकरराव चव्हाण यांनी गावोगावी साठवण तलाव उभारून तसेच गरीब शेतकऱ्यांच्या जीवनात नवी पहाट निर्माण करून विकासाचा ठसा उमटवला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत रणवीर चव्हाण यांनी थेट निवडणुकीद्वारे राजकारणात प्रवेश केला आहे.



रणवीर चव्हाण यांचे वडील सुनील चव्हाण हे भारतीय जनता पक्षाचे सक्रिय नेते असून, त्यांच्या काका बाबुराव चव्हाण यांनी यापूर्वी अणदूर जिल्हा परिषद गटाचे नेतृत्व केले आहे.

तसेच, सुनील चव्हाण यांनी आमदार राणा पाटील यांच्या नेतृत्वाखाली नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकांत आपली संघटन क्षमता दाखवत नळदुर्ग व तुळजापूर या दोन्ही नगरपरिषदांवर भाजपाचा झेंडा फडकवण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

दि.५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील ९ जिल्हा परिषद व १८ पंचायत समिती गणांसाठी उमेदवारी अर्ज दाखल होत आहेत. या दरम्यान सुनील चव्हाण यांनी जळकोट व मंगरूळ गटातील दिग्गज काँग्रेस नेत्यांना भाजपमध्ये सहभागी करून घेतल्याने तालुक्यात भाजपची ताकद अधिक मजबूत झाली आहे.

जनरल पुरुष आरक्षित असलेल्या अणदूर पंचायत समिती गणातून रणवीर चव्हाण यांना थेट उमेदवारी देत ही निवडणूक प्रतिष्ठेची बनवण्यात आली आहे. संपूर्ण तालुका भाजपमय करण्याचा निर्धार नेतृत्वाने व्यक्त केला असून, चव्हाण कुटुंबाच्या तिसऱ्या पिढीच्या राजकीय प्रवेशाला अणदूरमधील जनता कसा प्रतिसाद देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बोर्डा शिवारात सोयाबीनच्या गंजीला आग; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
कळंब तालुक्यातील बोर्डा शिवारात अज्ञात व्यक्तीने शेतातील सोयाबीनच्या गंजीला आग लावून जाळून टाकल्याची घटना घडली असून, यात शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

यांप्रकरणी फिर्यादी विजय श्रीरंग जगताप (वय ५३, रा. बोर्डा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या बोर्डा शिवारातील शेत गट क्रमांक २६० मध्ये काढून साठवून ठेवलेली सोयाबीनची गंजी दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ११.४५ वाजता सुमारास अज्ञात व्यक्तीने आग लावून पेटवली.

या आगीत संपूर्ण गंजी जळून खाक झाल्याने फिर्यादीचे सुमारे ५५,००० रुपये किमतीचे नुकसान झाले आहे. या घटनेप्रकरणी फिर्यादी विजय जगताप यांनी दि.२० जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## पारगाव येथील पृथ्वीराज लॉजवरील देहव्यापार रॅकेटवर पोलिसांचा छापा

### दोन पीडित महिलांची सुटका; सहा आरोपींविरुद्ध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
वाशी तालुक्यातील पारगाव येथे सुरू असलेल्या देहव्यापाराच्या रॅकेटवर वाशी पोलिसांनी छापा टाकून दोन पीडित महिलांची सुटका केली असून या प्रकरणी सहा आरोपींविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक व देहव्यापार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई दि. १९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ९.५० वाजता करण्यात आली.



या प्रकरणातील आरोपींची नावे श्रीपती उत्तमराव घुले, महादेव विष्णु काळे (दोघे रा. पारगाव, ता. वाशी), विशाल महादेव जुळे (वय ३०, रा. भंडारवाडी, ता. जि. बीड), भरत नवनाथ सुरवसे (वय ३०, रा. वाकवड, ता. भुम, जि. धाराशिव), संदीप आबासाहेब गायकवाड (वय २४, रा. गिरवली, ता. भुम, जि. धाराशिव) आणि अक्षय महादेव सालगुडे (वय २५, रा. नेकनुर, ता. जि. बीड) अशी आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वरील आरोपींनी संगनमत करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पारगाव येथील पृथ्वीराज लॉज येथे दोन महिलांना वाणिज्यिक प्रयोजनासाठी आश्रय दिला होता. त्यांना ग्राहकांच्या मागणीनुसार लैंगिक समागमनासाठी प्रवृत्त करून जबरदस्तीने देहव्यवसाय करण्यास भाग पाडण्यात येत होते, तसेच आरोपी त्यांच्यावर उपजीविका करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या घटनेची माहिती मिळताच वाशी पोलिसांनी छापा कारवाई करून लॉजमध्ये धाड टाकली.

कारवाईदरम्यान दोन पीडित महिलांची सुरक्षित सुटका करण्यात आली.

त्यानंतर सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरून वरील सर्व आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३, ३ (५) सह अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ मधील कलम ३, ४, ५ व ७ अन्वये वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
आंबी पोलीस पथकाने २० जानेवारी रोजी पारेवाडी येथील एका घराजवळ छापा टाकला. यावेळी तानाजी केरबा पवार (वय ४५, रा. पारेवाडी, ता. परंडा) यांच्या २५ लिटर गावठी दारु जप्त केली.

## लेडीज क्लब येथे रंगला होम मिनिस्टर खेळ पैठणीचा




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
लेडीज क्लब येथे भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरपरिषद गटनेते अमित शिंदे यांच्या वतीने हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यावेळी महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' होम मिनिस्टर कार्यक्रम उत्साहात अन जल्लोषात पार पडला.

या कार्यक्रमास मल्हार पाटील आणि साक्षी पाटील, लेडीज क्लबच्या अध्यक्ष अर्चनाताई पाटील, नगराध्यक्षा नेहाताई राहुल काकडे, उपनगराध्यक्ष अक्षय ढोबळे, सर्व नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरलेल्या महिलांच्या आनंदाचा 'हा खेळ पैठणीचा' होम मिनिस्टर कार्यक्रमात महिला भगिनींनी मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमात 'बाळा' फेम प्रणाली सूर्यवंशी तसेच सुप्रसिद्ध सिनेअभिनेते क्रांतीनाना मेळगावकर यांनी आपल्या सादरीकरणातून महिलांचे भरपूर मनोरंजन केले. या कार्यक्रमास महिला भगिनींचा उदंड प्रतिसाद लाभला.

स्पर्धेतील पहिले बक्षीस स्कुटी तसेच विविध पैठणी विजेत्या महिलांना बक्षिसांचे वितरण अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# काँग्रेसला घसरण; बॅलेट पेपरवर मतदानाची मागणी

### माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांची धाराशिव दौऱ्यात टीका

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
देशासह महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला मोठी घसरण होत असल्याचे दिसत असून, यामागचे मुख्य कारण इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन (EVM²) असल्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आज धाराशिव दौऱ्यात पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यांचे म्हणणे होते की, भाजपा प्रत्येक निवडणुकीत इव्हीएमच्या जोरावर सत्ता काबीज करत आहे, म्हणून इव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्यात अशी मागणी काँग्रेस सातत्याने करत आहे.

बाळासाहेब थोरात बुधवारी सकाळी हॉटेल किंग्ज गार्डन, धाराशिव येथे पत्रकारांशी



संवाद साधत होते. यावेळी धाराशिव जिल्हा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष विश्वास शिंदे, नगर परिषदेचे माजी गटनेते खलील सय्यद, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शहर काँग्रेसचे उमेश राजेनिंबाळकर, तसेच विलास शाळू, सिद्धार्थ बनसोडे, धनंजय राऊत, अभिषेक बागल, अक्षय जोगदंड, जयसिंग पवार, मन्सुर सय्यद, सरफराज काझी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

थोरात म्हणाले की, मागील अनेक निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाची मोठी घसरण दिसून आली, आणि यामागचे कारण एतच् मशीनवरील मतदान आहे.

त्यामुळे आता जनतेत संभ्रम निर्माण झाला आहे. त्यांनी उदाहरण म्हणून तांदुळवाडी येथे काही तरुणांनी एतच् ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान करण्यासाठी आमरण उपोषण सुरू केले असल्याचे सांगितले आणि काँग्रेस पक्ष त्यांना पाठिंबा देत असल्याचे नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, जाती-पातीचे राजकारण करून सत्ताधारी पक्ष लोकशाहीला बाधक ठरत आहे. तसेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, वीजबिल याबाबत केंद्र आणि राज्य सरकारने कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही, त्यामुळे शेतकरी, व्यावसायिक आणि सर्वसामान्य जनता आर्थिक अडचणीत आहे.

थोरात यांनी सांगितले की, आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या विचारधारेला मानणाऱ्या समविचारी पक्षांना सोबत घेऊन पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाईल.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी
# प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि.२१ जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी ता.०५ फेब्रुवारी रोजी मतदान ० ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची मतदार यादी अंतिम केली असून उमेदवारांना ऑफलाइन पध्दतीने अर्ज सादर करावे लागणार आहेत.चाकूर तालुक्यात ५ गट व १० गणांसाठी १५१ मतदान केंद्रांवर १ लाख ३६ हजार मतदार आहेत.यामध्ये पुरुष ७१,४५७ स्त्री ६४,८१४ असे एकूण १ लाख ३६ हजार २७२ इतके मतदार आहेत. निवडणूक प्रकिया शांततेत पार पाडण्यासाठी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ९५१ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून आचारसंहितेचे राजकीय पक्षासह सर्वांनीच तंतोतंत पालन करावे. निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन तहसिलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी नरसिंग जाधव यांनी केले. यावेळी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. १६ जानेवारी रोजी निवडणूक कार्यक्रमाची सूचना प्रसिध्द करण्यात आली असून शुक्रवार, दि. १६ जानेवारी ते मंगळवार, दि. २० जानेवारी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत आणि बुधवार, दि. २१ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंत ही नामनिर्देशन पत्रे देण्याची अंतिम तारीख आहे. रविवार, दि. १८ रोजी सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र देण्यात येणार नाही. दि. १६ ते दि. २१ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत नामनिर्देशनपत्र स्वीकारली जाणार आहेत. गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली जाणार आहे. त्याचदिवशी छाननी पूर्ण झाल्यावरनंतर वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाणार आहे. शुक्रवार, दि. २३ व शनिवार, दि. २४ रोजी आणि मंगळवार, दि. २७ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे तसेच दि. २५ व दि. २६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने या दिवशी अर्ज मागे घेतले जाणार नाहीत. मंगळवार, दि. २७ रोजी दुपारी ३.३० नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करून त्याच दिवशी चिन्ह वाटप केले जाणार आहे तर गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत प्रत्यक्षात मतदान घेण्यात येणार असून शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी होणार आहे. अशा प्रकारे संपूर्ण निवडणुकीचा कार्यक्रम असणार आहे. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यापासून आचारसंहिता लागू झाली आहे. सर्वच राजकीय पक्षाचे प्रमुख, पदाधिकारी, सर्व जनतेनेही काटेकोरपणे आचारसंहितेचे पालन करावे मतदारसंघात एकूण मतदान केंद्रांची संख्या १५१ इतकी आहे. आदर्श आचारसंहितेचे तंतोतंत पालन होण्यासाठी तालुक्यात भरारी पथके निर्माण केली असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दहा झोनल अधीकार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर ठिकठिकाणी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी लावलेले जाहिरातीसह बॅनर झाकून व काढून ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत. निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर मतदारांना कोणतीही प्रलोभने व आमिष दाखवणे, लाच देणे, गैरवाजवी दडपण व धाकदडपशाही हा निवडणूक अपराध असणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन नरसिंग जाधव यांनी केले आहे.

### निवडणूक आयोगाच्या नियमांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे तहसीलदार नरसिंग जाधव



# यशवंत विद्यालयात हिंद -दी-चादर शहिदी समागम वर्षानिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि.२१ जानेवारी :** यशवंत विद्यालय अहमदपूर येथे हिंद-दी-चादर श्री. गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विद्यालयात चित्रकला स्पर्धा गायन स्पर्धा वत्कृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे सन २०२५-२६ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास, त्यांनी दिलेले बलिदान आणि समाजातील त्यांचे कार्य शालेय विद्यार्थ्यांना माहित व्हावे, या उद्देशाने यशवंत विद्यालयात परिपाठात गौरव गीत वाजविले जाते. तसेच या औचित्याने त्याने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेतील निवडक विद्यार्थ्यांने तालुका स्तरावर यश संपादन करून जिल्हास्तरावर सादरीकरण केले. यात वत्कृत्व स्पर्धेत कु. समीक्षा तुडमे, चित्रकला स्पर्धेत कु. अनुश्री डुब्बेवार कु. तारा तोमर तर निबंध स्पर्धेत कु. श्रुती कांबळे कु. अनुष्का गुट्टे यांना जिल्ह्यावर सादरीकरणाची संधी प्राप्त झाली आहे. सदरील कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी डॉक्टर शरद करकनाळे,कलाशिक्षक महादेव खळुरे यांनी परिश्रम घेतले.

वरील गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक गजानन शिंदे पर्यवेक्षक शिवाजी सूर्यवंशी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या उपक्रमाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव डी. बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर क यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पथनाट्यातून मांडली श्री गुरु तेग बहादूरजींच्या अमर बलिदानाची गाथा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त लातूर जिल्हा शिक्षण विभागामार्फत 'हिंद दी चादर' पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून श्री गुरु तेग बहादूरजी यांची जीवनगाथा उभी केली. हा उपक्रम श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या अमर बलिदानाची आठवण करून देणारा आणि धार्मिक सहिष्णुता, मानवतावाद व धैर्याचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारा ठरला.

या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील विविध शाळांमधील ३४ विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. यामध्ये अहमदपूर येथील संत ज्ञानेश्र्वर विद्यालय, औसा तालुक्यातील सेलू येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भादा येथील जिल्हा परिषद प्रशाला, लामजना येथील अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा यासह इतर शाळातील विद्यार्थ्यांचा समावेश होता.दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य दिलीप नागरगोजे, स्पर्धेचे समन्वयक सतीश भापकर, परीक्षक विजय म्हस्के व हरी कुंभार यावेळी उपस्थित होते.

श्री गुरु तेग बहादूरजींना हिंद दी चादर अर्थात भारताची ढाल म्हणून ओळखले जाते, त्यांनी सहिष्णुता, मानवतावादासाठी आपले बलिदान दिले. त्यांच्या शहीदीला ३५० वर्षे पूर्ण झाली असून, यानिमित्ताने राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने जनजागृतीसाठी लातूर शिक्षण विभागामार्फत जिल्ह्यात विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# उदयगिरीत वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्‌घाटन



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, २१ जानेवारी :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग आणि हायमिडीया लॅबोरेटरीज प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'ॲगरोज जेल इलेक्ट्रोफोरेसिस' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष माधवराव नौबदे, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. शिवशंकर हल्लाळे, डॉ. राहुल आलापुरे, डॉ. जयप्रकाश पटवारी, डॉ. विनय नागपूर्णे, डॉ. राजू नारखेडे, डॉ. बंकट कांबळे, डॉ. प्रवीण शेटे यांची विशेष उपस्थिती होती.

या राष्ट्रीय कार्यशाळेसाठी साधनव्यक्ती म्हणून आयसीटी, मुंबई येथून वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. नवजीत कौर, अंकिता वाला, आयुषी बिरवटकर, ध्रुवी निर्मल, मनोज बोरसे यांनी देशभरातून आलेल्या ६५ विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल्सच्या माध्यमातून सखोल मार्गदर्शन केले.

संस्थाध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना 'डीएनए'चे महत्व उदाहरणासह स्पष्ट केले. दैनंदिन जीवनामध्ये 'डीएनए' महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असतो. त्यामुळे सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे आहे, असे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी 'ॲगरोज जेल इलेक्ट्रोफोरेसिस' या आधुनिक तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला. जैवतंत्रज्ञान व जैवविज्ञान क्षेत्रातील आधुनिक प्रयोगतंत्रांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना व संशोधकांना मिळावी, या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत ॲगरोज जेल इलेक्ट्रोफोरेसिसच्या सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षणावर भर देण्यात येणार आहे. पदवी, पदव्युत्तर व संशोधन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. राहुल आलापुरे यांनी सूत्रसंचालन तर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. कमलाकर गव्हाणे यांनी आभार मानले. दिनांक २१ व २२ जानेवारी या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. शैलेश ममदापूरे, प्रा. अश्विनी भाताडे, डॉ. सबिना शेख, प्रा. हाश्मी, प्रा. सिद्धेश्वर लांडगे, प्रा. मुस्कान मणियार, विनोद आष्टुरे, सुग्रीव रंगवाळ यांनी पुढाकार घेतला.

# रासेयो शिबिरातून युवकांनी विकासासाठी जनजागृती करावी : लता मोरे

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव,दि. २१ जानेवारी :** आजचा युवक देशाचा शिल्पकार असून समाजात वावरताना समाजाच्या गरजा, समस्या जाणून घेऊन रासेयो शिबिरातून युवकांनी चिरकाल विकासासाठी जन जागृती करावी असे प्रतिपादन श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या सहसचिव श्रीमती लताताई मोरे -बोडके यांनी किनगांव येथील महात्मा फुले महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे खानापूर येथे विशेष युवक शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी १९ जानेवारी रोजी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या सहसचिव श्रीमती लताताई मोरे बोडके यांनी केले

या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव तथा प्राचार्य डॉ बबनराव बोडके होते तर उद्घाटक लताताई मोरे प्रमुख उपस्थित खानापूरचे पोलीस पाटील राजकुमार शिंदे, चेअरमन नारायण देशमुख, माजी उपसरपंच अनिल देशपांडे, ग्रा प सदस्य सतिश कांबळे, निळकंठ शिंदे, सुरज चव्हाण, राम शिंदे,उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण, मुख्याध्यापिका मंगलताई भताने रासेयो कार्यक्रमाधिकारी तथा नोडल अधिकारी डॉ भारत भदाडे, प्रा अंकिता जाधव आदि मान्यवर होते




अहमदपूर तालुक्यातील खानापूर येथे १९ जानेवारी ते २४ जानेवारी२०२६ या कालावधी रासेयो शिबीर आयोजित केले असून या शिबीराचा विषय शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासाकरीता विशेष युवक शिबिराचे उद्घाटन संस्था सहसचिव लताताई मोरे आणि मान्यवरांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण आणि दीप प्रज्वलित करून संपन्न झाले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ भारत भदाडे यांनी केले त्यानंतर राजाभाऊ शिंदे यांनी शिबिरार्थीचे ऋणानुबंध खानापूरच्या मातीशी जोडल्याने आभार व्यक्त करत शिबिरार्थींना सर्वोत्तरी सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ बबनराव बोडके म्हणाले की शाश्वत विकास म्हणजे पर्यावरण संरक्षण, सामाजिक बांधिलकी जोपसत राष्ट्रहितासाठी पुढाकार घेणे यासाठी पर्यावरण संरक्षण सोबत सामाजिक समता आणि आर्थिक विकासाचा समतोल राखावा असे हि आवाहन केले त्यानंतर आभार प्रदर्शन प्रा बालाजी आचार्य यांनी केले.

या विशेष शिबिरात रासेयो चे २५ स्वयंसेवक मुले आणि २५ स्वयसेविका मुली एकूण ५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला यात स्वयंसेवक कु विक्रम जाधव आशिष कवडे शिवराम फड, अलका नागरगोजे, मंदाकिनी कराड, प्रज्ञा मस्के,आरती येनकफळे, विशाखा महात्मे, माने विठ्ठल गवळे, सुरज कानगुले, आस्लम फकिर, अंकिता भंडारे,योगीता सुर्यवाड, श्वेता तिगोटे , धनश्री चाटे आदि विद्यार्थी पुढाकार घेतला आहे या उद्घाटन सोहळ्याला महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण, प्रा बालाजी आचार्य, संजय जगताप डॉ बळीराम पवार,डॉ प्रभाकर स्वामी, डॉ विरनाथ हुमनाबादे,डॉ सदाशिव वरवटे ,डॉ पांडुरंग कांबळे, प्रा कृष्णा केंद्रे, प्रा सुमेध जोगदंड, प्रा चंद्रमनी बनसोडे, प्रा विक्रम गायकवाड,डॉ दर्शना कानवटे, अंकिता जाधव,प्रा मीरा शिंदे आदि उपस्थित होते या सोहळयाचे सुत्रसंचालन प्रा डॉ संजय जगताप यांनी केले मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते राष्ट्रगिताने रासेयो उद्घाटन समारंभाची सांगता झाली

# सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल अब्दुल मलिक राजापटेल यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, २१ जानेवारी :** रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजी नगर वेस्ट आणि स्पीस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'साउंड ऑफ लाईफ' या उपक्रमाच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल श्री. अब्दुल मलिक राजापटेल यांचा सन्मान करण्यात आला.

हे सन्मान रोटरी क्लबचे जिल्हा गव्हर्नर व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रोटरीयन सुधीर लातूरे व स्पीस फाउंडेशनचे पंकज शिंदे व शेख शाहिद यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गरजू दिव्यांग व्यक्तींना श्रवणसहाय्य मिळावे, त्यांचे जीवनमान उंचावावे आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा या उद्देशाने स्पीस फाउंडेशन आणि रोटरी क्लब औरंगाबाद तर्फे 'साउंड ऑफ लाईफ' उपक्रम राबविण्यात येतो.या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर वेस्ट तसेच स्पीस फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी अब्दुल मलिक राजापटेल यांच्या कार्याचे कौतुक करत करिअर समुपदेशन व समाजसेवेत त्यांचा सहभाग इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

# जंगम समाज च्यावतीने नगराध्यक्ष, नगर सेवकांचा सत्कार
## रेणुकाचार्य भवनसाठी एक कोटीचा निधी : संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, २१ जानेवारी :** सकल जंगम समाजच्यावतीने उदगीर,मोहोळ,व मैदर्गी नगरपरिषदेच्या महिला नगराध्यक्षा व नगर सेवकांचा सत्कार डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराजांचे हस्ते झाला.

जंगम समाजाच्यावतीने रेणूकाचार्य संस्कार भवन येथे श्री गुरु हावगी स्वामी मठाचे मठाधिश डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्यादिव्य आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास शंकरलिंग मठाचे मठाधिश सुखदेव स्वामी, क्रिडा व युवक कल्याण मंत्री आ.संजय बनसोडे ,महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटिल नागराळकर तर सत्कार मुर्तीमध्ये उदगीर च्या नगराध्यक्षा सौ .स्वातीताई सचिन हुडे, मोहाेळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षा कु.सिध्दी वस्त्रे, मैदर्गी नगर परिषद नगराध्यक्षा सौ. अंजलीताई बाजामठ,लातूर महानगर पालिकेचे नगर सेवक मठपती, निलंगा न.प.चे गट नेता विरभद्र स्वामी ,उदगीर नगर परिषदेच्या नगरसेविका गंगाबाई कपाळे ,सौ. निकिता अंबरखाने,सौ.शिल्पा उप्परबावडे,सौ.संध्या गांजूरे, नगर सेवक विजयकुमार निटुरे,चंदन पाटिल नागराळकर, नागेश अष्टुरे,राजकुमार हुडगे, अनिल मुदाळे,आदि उपस्थित होते.




प्रारंभी आद्य जगदगुरु रेणूकाचार्य यांच्या प्रतिमेचे पुजन करुन व दिपप्रज्वलनाने उदघाटन झाले.

यावेळी डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते नगराध्यक्ष व नगरसेवकांचा आद्य जगदगुरु रेणूकाचार्य यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.प्रास्ताविकात सकल जंगम समाजाचे अध्यक्ष विजयकुमार स्वामी यांनी सत्कार कार्यक्रमामागील भुमिका व रेणुकाचार्य संस्कार भवन बांधकामाच्या प्रगतीचा अहवाल सादरकरुन वाढिव निधीची मागणी केली.

यावेळी बोलताना माजी मंत्री आ. संजय बनसोडे म्हणाले की, गुरुवर्यांच्या अशिर्वादानेच मला दुसऱ्यांदा जनसेवेची संधी मिळाली असुन सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी काम करत असताना सर्वजातीधर्मातील लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. जंगम समाजाने रेणुकाचार्य संस्कार भवन निर्माणासाठी निधीची मागणी केली. डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी जागा उपलब्ध करुन दिल्यामुळे १ कोटी रुपयाचा निधी दिला.उर्वरित कामासाठी अधिक १ कोटी रुपयाचा निधी जाहीर करुन अधिक निधी लागल्यास तो देण्याचे वचन दिले. निवडुन आलेल्या नगरसेवक, महापौरांनी जनतेच्या मुलभूत प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी अधिक लक्ष द्यावे असे सांगुन मोहोळ , मैदर्गी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा व उदगीर नगर परिषदेच्या नगराध्यक्षांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या या प्रसंगी उदगीर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. स्वातीताई सचिन हुडे, महोळ जि. सोलापूरच्या नगराध्यक्षा कु. सिध्दी वस्त्रे ,यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी बस्वराज पाटील नागराळकर, नगरसेवक दिलीप मठपती, योगीनाथ बाजारमठ यांनी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचलन शिवसांब स्वामी यांनी तर आभार गणेश मठपती यांनी मानले. या कार्यक्रमास उदगीर शहर व तालुक्यातील सकल जंगम समाजचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पाचशेघर मठात श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी जन्मोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** लातूर येथील आझाद चौकात असलेल्या श्री पाचशेघर मठ संस्थान येथे माघ शुद्ध पंचमी निमित्त शुक्रवार २३ जानेवारी २०२६ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. श्री मन्मथ स्वामी जन्मोत्सव सोहळ्या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २३ जानेवारी रोजी सकाळी, रुद्राभिषेक, सकाळी ११:३० वा. श्री पाचशेघर मठ महिला भजनी मंडळ पंचपदी, दुपारी १२:०० वा. श्री मन्मथ स्वामी जन्मोत्सव पाळण, आरती व प्रसाद, दुपारी २ ते ५ सामूहिक महिला भजनी मंडळ यांचे शिवभजन व शिवपाठ (सहभाग : श्री पाचशेघर मठ महिला भजनी मंडळ, श्री उदय गणेश महिला भजनी मंडळ, श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी महिला भजनी मंडळ, श्री रेणुकामाता महिला भजनी मंडळ) सायं. ६:३० वा. दिपोत्सव व महाआरती, रात्री ९:३० ते ११:३० श्री पाचशेघर मठ पुरुष भजनी मंडळ यांचे भजन व आरती संपन्न होणार आहे. तरी या कार्यक्रमास सर्व भाविक भक्तांनी सोहळ्यामध्ये तरी सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री पाचशेघर मठ संस्थानच्या वतीने विश्र्वस्त मंडळ, पुरुष व महिला भजनी मंडळ, समस्त भक्तगण यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## तुळजापूरात प्रतिबंधित गुटखा-पानमसाल्यावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व पानमसाला विक्रीसाठी साठवून ठेवल्याप्रकरणी तुळजापूर पोलिसांनी तिघांविरुद्ध कोप्टा क्टअंतर्गत स्वतंत्र तीन गुन्हे दाखल केले आहेत.

पहिल्या कारवाईत गणेश मारुती गोळसे (वय २६, रा. काक्रंबा, ता. तुळजापूर) यास दि. २० जानेवारी रोजी दुपारी १.१५ वाजता जुने बसस्थानक समोरील देवराज कॉम्प्लेक्समधील गणेश पान शॉप येथे बादशहा व विमल पानमसाला तसेच गोवा कंपनीच्या गुटखा पुड्या असा ९०० रुपये किमतीचा प्रतिबंधित साठा विक्रीसाठी जवळ बाळगताना पकडण्यात आले.

दुसऱ्या कारवाईत सुनिल शंकर जेवळे (वय ३०, रा. आरुणचंद्र वाईनच्या पाठीमागे, तुळजापूर) यास सायंकाळी ५.३० वाजता तुळजापूर-धाराशिव रस्त्यावरील सारंग पान शॉप अँड जनरल स्टोअर येथे रजनीगंधा पानमसाला, ९६० रुपये किमतीचा, विक्रीसाठी साठवलेला आढळून आला.

तिसऱ्या प्रकरणात आकाश तुकाराम माळी (वय २४, रा. तुळजापूर) यास सायंकाळी ६.१५ वाजता समाधान टीहाउस स्टोअर येथे डायरेक्टर स्पेशल पानमसाला, ७२० रुपये किमतीचा, विक्रीसाठी ठेवलेला आढळून आला. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हे दाखल केला आहे.

# सहा वर्षात तुळजापूर तालुका काँग्रेस भाजमय; साहेबांची शांतता : मुकसंमती की हतबलता ?

## राजकीय समीकरण बदलले; दादांचा वारू चौफेर...

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**

पूर्वाश्रेमीचा लालबावट्याचा म्हणजे शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला असणारा अभेद्य तुळजापूर तालुका एका रांगड्या पैलवानाने काँग्रेसमय केला, संपूर्ण तालुक्यावर एक हाती काँग्रेसची सत्ता मिळवण्यात यश मिळवले. ग्रामपंचायत असो वा सूतगिरणी, बाजार समिती असो वा पंचायत समिती, तब्बल वीस वर्ष विधानसभा टिकवत कॅबिनेट मंत्री पदापर्यंत झेप घेत जिल्ह्याचे पालकमंत्री ही पद मिळवले. पण आज घर फिरले की वासे ही फिरतात अशी म्हण आहे. अगदी तसंच काहीच घडताना दिसून येत आहे.



तुळजापूर तालुक्यातील राजकीय समीकरणे गेल्या सहा वर्षांत झपाट्याने बदलताना दिसत आहेत. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या तालुक्यात आता भाजपचे वर्चस्व ठळकपणे वाढले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आणि ग्रामपातळीवरील सत्ताकेंद्रांवर भाजपने मजबूत पकड निर्माण केली असून काँग्रेसची संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे चित्र आहे. भाजपच्या या यशामागे धाराशिव जिल्ह्यातील एकमेव भाजपा आमदार राणा 'दादां'च्या रणनीतीची मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. बूथ पातळीवरील संघटन, कार्यकर्त्यांचे जाळे, तसेच विरोधकांतील अंतर्गत मतभेदांचा नेमका फायदा घेत भाजपने तालुक्यात आपले स्थान भक्कम केले आहे. परिणामी काँग्रेस नेतृत्व गोंधळलेल्या अवस्थेत असून अनेक ठिकाणी पक्ष हतबल झाल्याचे चित्र आहे. या राजकीय घडामोडींमध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मधुकरराव चव्हाण साहेबांची शांतता विशेष लक्ष वेधून घेत आहे. भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या नेत्यांबाबत किंवा तालुक्यातील बदलत्या राजकारणावर त्यांनी कोणतीही ठाम भूमिका न मांडल्याने राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. ही शांतता म्हणजे कार्यकर्त्यांच्या भाजपा प्रवेशाला मूक संमती आहे का ? असा प्रश्न कार्यकर्त्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत उपस्थित केला जात आहे. काँग्रेसच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये या मौनामुळे अस्वस्थता वाढली असून नेतृत्वाच्या स्पष्ट भूमिकेची मागणी होत आहे. दुसरीकडे भाजप मात्र या परिस्थितीकडे आपल्या राजकीय यशाचे संकेत म्हणून पाहत असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पकड आणखी मजबूत करण्याच्या तयारीत आहे.

एकूणच, तुळजापूर तालुक्यातील राजकारण निर्णायक वळणावर आले असून, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण साहेबांची भूमिका आणि काँग्रेसची पुढील रणनीती याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मधुकर चव्हाण यांचे खंदे समर्थक सहा वर्षांत भाजपात डेरे दाखल...

तुळजापूर तालुक्यातील काँग्रेसच्या राजकारणाला मोठा धक्का बसला असून माजी मंत्री मधुकर चव्हाण यांचे अत्यंत विश्वासू मानले जाणारे अनेक प्रमुख नेते गेल्या सहा वर्षांत भाजपमध्ये दाखल झाले आहेत. संतोष बोबडे, सचिन पाटील, सुनील चव्हाण, मुकुंद डोंगरे,प्रकाश चव्हाण,बाबा घोंगते, पंडित जोकार, अशोक पाटील, वसंत वडगावे, शिवाजी साठे, सुनील रोचकरी, बसवराज धरणे यांसारख्या युवा नेत्यांनी भाजपची वाट धरल्याने काँग्रेसची संघटनात्मक ताकद लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र आहे. हे सर्व नेते दीर्घकाळ मधुकर चव्हाण यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जात होते. मात्र नेतृत्वाकडून अपेक्षित मार्गदर्शन न मिळणे, स्थानिक पातळीवरील बदलती राजकीय परिस्थिती आणि भाजपची आक्रमक संघटनात्मक रणनीती यामुळे त्यांनी पक्षांतराचा निर्णय घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या घडामोडींचा थेट परिणाम काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांवर होत असून, पक्षांतर्गत अस्वस्थता वाढताना दिसत आहे. एकीकडे कार्यकर्त्यांचे मानसिक खच्चीकरण होत असताना, दुसरीकडे भाजप मात्र या गळतीला आपले राजकीय यश मानत असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पकड अधिक मजबूत करण्याच्या तयारीत आहे.

### राजकीय गोंधळात निष्ठावान कार्यकर्त्यांचे खच्चीकरण...

तुळजापूर तालुक्यातील बदलत्या राजकीय समीकरणांचा थेट परिणाम काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांवर होत असल्याचे चित्र आहे. एकेकाळी पक्षासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे कार्यकर्ते आज मात्र संभ्रम, नैराश्य आणि मानसिक दबावाखाली असल्याची भावना व्यक्त करत आहेत. पक्षातील सातत्याने होणारे गळतीचे प्रकार, नेतृत्वाकडून स्पष्ट दिशा न मिळणे आणि विरोधी पक्षाकडून वाढता दबाव यामुळे निष्ठावान कार्यकर्त्यांचे मानसिक खच्चीकरण होत असल्याची चर्चा आहे. अनेक ठिकाणी कार्यकर्ते स्वतःला एकटे पडल्याची भावना व्यक्त करत असून, पक्षासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेतली जात नसल्याची खंतही व्यक्त होत आहे.

### मधुकरराव चव्हाण यांचा गड आ. राणा पाटील यांनी केला काबीज...

तुळजापूर तालुक्यातील राजकारणात मोठा बदल घडताना दिसत असून, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचा पारंपरिक काँग्रेसचा गड विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी काबीज केल्याचे स्पष्ट चित्र आहे. गेल्या काही वर्षांत झालेल्या राजकीय घडामोडींमुळे काँग्रेसची पकड सैल झाली असून भाजपने या भागात आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. एकेकाळी मधुकरराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जाणारा हा परिसर आता भाजपच्या प्रभावाखाली गेला आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांचे जाळे आणि स्थानिक प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत काँग्रेसचा मजबूत आधार हळूहळू कमजोर केला. या राजकीय बदलात मधुकरराव चव्हाण यांची अलिकडील शांतता देखील चर्चेचा विषय ठरत आहे. काँग्रेसमध्ये अस्वस्थता वाढत असताना त्यांच्या स्पष्ट भूमिकेअभावी कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

## अणदूर परिसरात आंब्याच्या झाडांना मोहोर

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२१ जानेवारी -**

अणदूर परिसरात ग्रामीण भागातील फळांचा राजा आंबा याला ऐन पौष्यात चिक्कार मोहोर लागले असून, यंदा गावरान आंब्याची चव मोठ्या प्रमाणात चाखवायास मिळणार आहे. शेतकरी फक्त एखाद्या नैसर्गिक संकटापासून बचाव होईल अशी प्रार्थना करत आहेत.

वयोवृद्ध, जाणकार मंडळींनी सांगितले की, ज्या वेळी पाऊस जास्त असतो, त्या वेळेस आंबा आणि ज्वारी पिकांना निसर्ग भरभरून वाढ देतो. यंदा त्याचा प्रत्यय दिसून येत असून, जिकडे तिकडे आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात मोहोर लागले आहे. अणदूर परिसरात शेतकऱ्यांनी केशर, हापूस, पायरी आंब्याच्या झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड केली असून, हजारो एकरवर झाडे मोठ्या दौलाने उभी आहेत. अगदी पाच फूट उंच झाडांनाही चिक्कार तोर लागले असून, त्याचा सुगंध परिसरात पसरलेला आहे.



इटकळ ते मंगरूळ रोडवरील जुनाट गावरान आंब्याच्या झाडांचे मोहोर बहरले असून, शेतकरी व नागरिक त्याचे फोटो काढण्यात गुंतलेले दिसत आहेत. शिशिर ऋतूमध्ये झाडांची पानगळती होत असली तरी, मोहोर अधिक खुलून फुलतो. मोहोर आलेल्या आंब्याच्या झाडांचे दर्शन मनाला प्रसन्न करणारे आणि निसर्गाचे उपकार जाणवून देणारे आहे.

अणदूर परिसरातील शेतकऱ्यांनी डोंगर, शेत, बांध, गोठा समोर मोकळ्या जागेत केशर जातीच्या आंब्याची लागवड केली असून, त्यामुळे वृक्षलागवड अधिक बळकट झाली आहे. या आंब्याला वाजवी भाव मिळत असून, मार्केटमध्ये सहज उपलब्धता आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत झाली आहे. अनेक शेतकरी आंब्याची विक्री करून भरपूर नफा कमावत आहेत, आणि शेतकऱ्यांच्या जीवनात नवी पहाट निर्माण झाली आहे.

## मेडसिंगा येथे घरफोडी; दागिने व रोख रक्कम लंपास

### दोन दुचाकींचीही चोरी; गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**

मेडसिंगा (ता. जि. धाराशिव) येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. तसेच गावातील दोन नागरिकांच्या मोटारसायकलीही चोरीस गेल्याची नोंद झाली आहे.

याप्रकरणी फिर्यादी रामेश्वर विठ्ठल गोरे (वय ३१, रा. मेडसिंगा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता ते २० जानेवारी रोजी सकाळी ७ वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचे कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटातून ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच २०,००० रुपये रोख, असा एकूण ७२,००० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला.



याच कालावधीत गावातील रामेश्वर बाळीराम साठे व किशोर मारुती आगळे यांच्या मोटारसायकलीही चोरीस गेल्या असल्याचे समोर आले आहे.

या घटनेप्रकरणी फिर्यादी रामेश्वर गोरे यांनी दि. २० जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास बेंबळी पोलीस करीत आहेत.

## परंड्यात महाराणा प्रताप पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ जानेवारी -**

परंडा शहरात आज राजापुरा गल्ली व महाराणा प्रताप चौक येथे स्वातंत्र्यवीर महाराणा प्रताप पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला.

राजापुरा गल्ली येथील बालवीर गणेश उत्सव मैदानात, परंडा नगरपरिषदचे उपनगराध्यक्ष समरजितसिंह ठाकूर व नगरसेवक मदनसिंह सद्धीवाल यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच महाराणा प्रताप चौक येथे माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्धीवाल यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमास नगरपरिषद सदस्य, उद्योजक, युवा नेते आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती. प्रमुख उपस्थितींमध्ये उपनगराध्यक्ष समरजितसिंह ठाकूर, नगरसेवक मदनसिंह सद्धीवाल, उद्योजक धीरजसिंह ठाकूर, पृथ्वीराजसिंह सद्धीवाल, राहुलसिंह सद्धीवाल, हॉटेल मैत्री पार्कचे मालक पैलवान अतुल भाऊ औसरे, युवा नेते संकेतसिंह ठाकूर, व्यंकटेश दीक्षित, अमरसिंह ठाकूर, स्वरूपसिंह सद्धीवाल यांचा समावेश होता.

याशिवाय कार्यक्रमास अमितसिंह सद्धीवाल, अनुराग ठाकूर, अमरसिंह ठाकूर, सुरजसिंह ठाकूर, राज वळसंगकर, ओमकार काशीद, कुणाल जाधव, यश परदेशी, आयुषसिंह सद्धीवाल, आकाश मदने, ओमकार तबेलदार, योगेश मस्के, आप्पा लोकरे, आशिष सिंह ठाकूर, संतोष गवंडी, राणा सद्धीवाल, रोहन सुरवसे, आनंद मोहिते, मयुर लोखंडे, कार्तीक दीक्षित, बल्ली ठाकूर, सुभाष देशमाने, आर्यन देशमाने, विश्वजीत ठाकूर, रुषीकेश आगरकर, हारीओम दीक्षित, ओम दीक्षित यांसह अनेक नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान महाराणा प्रताप यांच्या जीवन आणि देशभक्तीच्या शिकवणीवर प्रकाश टाकण्यात आला आणि नागरिकांनी त्यांना अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण केली.

## युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा : डॉ. दिलीप गरुड



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२१ जानेवारी -**

युवकांनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. शिकणे, सेवा करणे आणि पुढे नेणे ही युवकांची त्रिसूत्री असून समाजसेवा ही व्यक्तिमत्त्व विकासाचा भक्कम पाया आहे, असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी केले.

मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या वतीने भुसणी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना (NSS) वार्षिक शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते.

यावेळी माजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य डॉ. सादक वली, उपसरपंच दशरथ मंडले, श्रीमंत पाटील, सुभाष बिराजदार, राजेंद्र व्हनाजे, महादेव संगशेट्टी, महादेव व्हनाजे, महादेव पाटील, गुलाब हिरमुखे, मुख्याध्यापक प्रेमनाथ आपचे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शीला स्वामी, सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले.

कार्यक्रमास गावातील बहुसंख्य नागरिकांसह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेंबळी पोलीस कारवाई : मटका जुगार साहित्यासह आरोपी जप्त

**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**

बेंबळी पोलीसांनी २० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:५० वाजता जुगार विरोधी कारवाईत विठ्ठलवाडी चौकातील वडाच्या झाडाखाली छापा टाकला.

यावेळी रुक्षराज बिरु बुरजे (वय ३३, रा. विठ्ठलवाडी, ता. जि. धाराशिव) याच्याकडून मेन बाजार मटका जुगाराचे साहित्य एकूण ६१० रूपये रकमेचे पोलीसांच्या पथकाला आढळले.

पोलीसांनी जुगार साहित्य व रक्कम जप्त करून आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## येरमाळ्याच्या विद्यानिकेतनमध्ये बाल आनंद मेळावा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२१ जानेवारी -**

कळंब तालुक्यातील येरमाळा येथील विद्यानिकेतन प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद मेळावा व विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

बाल आनंद मेळाव्याच्या उपक्रमात इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, भाज्या व विविध वस्तूंचे स्टॉल लावून 'कमवा आणि शिका'चा अनुभव घेतला. पाणीपुरी, भेळ, वडापाव, पनीर चिल्ली, इडली, भजे, मसाला पापड अशा पदार्थांची विक्री पारंपरिक वेशभूषेत करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने ५३,८५० रुपये उलाढाल केली आणि व्यवसाय, संवाद कौशल्य व नेतृत्वगुण अनुभवले.


कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थापक सचिन पाटील, स्वाती पाटील, मुख्याध्यापिका दिपाली शिंदे व रोहिणी शिंदे, तसेच शिक्षक अनिल डोके, प्रिया बारकुल, माधुरी बारकुल, बोधले मॅडम यांनी केले.

याच कार्यक्रमांतर्गत माध्यमिक शाळेतील इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. पत्रकार बालाजी रमेश बारकुल व संतोष बारकुल यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. सुमारे तीस विद्यार्थ्यांनी रोबोट, पवनचक्की, जल शुद्धीकरण, अवकाश यान व जल पुनर्भरण यांसारखे प्रकल्प सादर करून उपस्थितांची प्रशंसा मिळवली.

## नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या आदेशानंतर शहरात स्वच्छता मोहीम सुरु







**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ जानेवारी -**

नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी किल्ला गेट परिसर, शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आठवडी बाजार परिसराची पाहणी करून हा परिसर तात्काळ स्वच्छ करण्याचे आदेश दिल्यानंतर दि.२० जानेवारी रोजी नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने संबंधित ठिकाणी स्वच्छतेचे काम सुरू केले आहे.

नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारताच शहर स्वच्छतेला प्राधान्य देत नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सर्वप्रथम स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. या कामासाठी सर्व नगरसेवकांचे सहकार्य लाभत आहे. किल्ला गेट परिसर, शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र परिसर, पोस्ट ऑफिस कार्यालय परिसर तसेच आठवडी बाजार भरणाऱ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण व कचरा साचल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी केल्यानंतर नगराध्यक्षांनी तात्काळ त्या परिसराची पाहणी केली.

या पाहणीवेळी नगरसेवक रीजवान काझी, व्यापारी मंडळाचे सुभाष कोरे, उमेश नाईक यांच्यासह नगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीनंतर परिसरात साचलेला कचरा तसेच घाणीने भरलेल्या गटारी तात्काळ स्वच्छ करण्याचे आदेश नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी स्वच्छता विभागाला दिले. त्याचबरोबर शहरातील ज्या-ज्या ठिकाणी कचरा साठला आहे किंवा गटारी अस्वच्छ आहेत, ते सर्व ठिकाणे त्वरित स्वच्छ करण्याचे निर्देश देण्यात आले.

शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा आमचा मानस असून यापुढील काळात कुठेही कचरा साचू दिला जाणार नाही. स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

शहर अस्वच्छ आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी दिला आहे.

नगराध्यक्षांच्या आदेशानंतर नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने किल्ला गेट परिसर, पोस्ट ऑफिस कार्यालय परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र परिसर तसेच आठवडी बाजार भरण्याच्या ठिकाणी स्वच्छतेचे काम जोरात हाती घेतले आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संस्थात्मक विकासासाठी दृष्टी आणि त्याची अंमलबजावणी महत्त्वाची

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ जानेवारी :** प्राचीन काळापासून संस्थात्मक विकास आराखडा बनवण्यात व त्याची अंमलबजावणी करण्यात येत होती. शिक्षण क्षेत्रात बदलत्या गरजांनुसार संस्थांनी दीर्घकालीन नियोजन करून त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे असते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथील प्रा. डॉ. स्मिता आचार्य यांनी केले. लातूरच्या शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे येथील राजर्षी शाहू महाविद्यालय येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षद्वारे आयोजित 'प्रिपेरेशन अॅण्ड इम्पलिमिटेशन ऑफ आयडीपी' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. स्मिता आचार्य बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य प्रा. प्रकाश देशमुख हे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अभिजीत यादव, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमीचे निरिक्षक प्रिया चौधरी व गजानन पोतदार यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. अभिजीत यादव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. रेणुका लोंढे यांनी केले. या कार्यशाळेकरिता विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांची उपस्थिती होती.



### जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६

# निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवा - जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.




निवडणूक काळातील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आदर्श आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी असलम तडवी, निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी राजेंद्र नागणे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत उपस्थित होते. तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार व उपविभागीय पोलीस अधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीत आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्यासह मतदान केंद्र व मतमोजणी केंद्र परिसरातील सुरक्षा नियोजनाला प्राधान्य द्यावे. एकाच ठिकाणी पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असल्यास, अशा ठिकाणी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस अधिकारी यांनी संयुक्तपणे प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घ्यावा. याठिकाणी मतदारांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच आदर्श आचारसंहिता भंगाची बाब निदर्शनास आल्यास तातडीने गुन्हा दाखल करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या काळात ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक पूर्वतयारी केली आहे. आवश्यक ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला जाणार असल्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले.

पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी दिली. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके व उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण बाबींची माहिती दिली.

## जन्मदात्या आईकडून दिड वर्षाच्या बालिकेची हत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** किरकोळ कारणावरून घडलेल्या कौटुंबिक कलहातून चक्क जन्मदात्या आईनेच आपल्या दिड वर्षाच्या बालिकेची निर्घृण हत्या केल्याची घटना लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील हासेगाव येथील रहिवासी विक्रम जगन्नाथ चौगुले ( वय ३४ वर्षे) हे मजुरी करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवतात. दि. १८ जानेवारी रोजी ते नेहमीप्रमाणे कामावर गेले असता त्यांच्या पत्नी अश्रि्वनी हिने पतीला फोन करून कामावरून घरी कधी येणार ? असे विचारले. पती वेळेत घरी न आल्याच्या रागाच्या भरात तिने रंगाच्या व मानसिक अस्थैर्याच्या भरात घरातील घरातील चाकूने आपली दिड वर्षाची निष्पाप बालिका नंदिनी हिच्या अंगावर विविध ठिकाणी गंभीर वार करून जखमी केले. या गंभीर जखमांमुळे बालिकेचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला.

सदर घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्याने एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळ पंचनामा केला. तसेच मृतदेहाचा पंचनामा करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. आरोपी अश्रि्वनी विक्रम चौगुले हिला त्वरित ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. गुन्ह्यात वापरलेला चाकू जप्त करण्यात आला आहे. संपूर्ण तपास शास्त्रीय पद्धतीने, पुराव्यांच्या आधारे व कायदेशीर चौकटीत पार पाडला जात आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे, पोलीस अमलदार जाधव, तुरे, कलमुकले यांनी अत्यंत तत्परतेने व जबाबदारीने यशस्वीरीत्या पार पाडली.

## थोडक्यात...

### विद्यार्थी सुरक्षा विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान

**लातूर, :** येथील श्री सदानंद माध्यामिक विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा, मुलींची सुरक्षा, कलकांचे हक्क व बाल कायदा तसेच विद्याम्यांनी घ्यावयाची आवश्यक काळजी या विषयांवर सविस्तर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधाकर चव्हाण हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, आजचा विद्यार्थी हा उद्याचा देशाचा जबाबदार नागरिक आहे. त्यामुळे बालवयातच सुरक्षिततेचे संस्कार , कायद्याची जाणीव व स्वतःचे हक्क ओळखण्याची क्षमता विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. बालकांचे हक्क संरक्षण कायदे, तसेच विद्यार्थ्यांनी स्वतःच्या संरक्षणासाठी कोणती खबरदारी घ्यावी, याची त्यांनी सविस्तर माहिती दिली.

### कुरापतीवरुन मारहाण

**लातूर:** मागील भांडणाची कुरापत काढून संगनमत करुन मारहाण झाल्याची घटना लातूर शहरातील राजीवनगर येथे घडली. लातुरातील राजीवनगर परिसरातील रहिवासी राजू विष्णू पाखरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आदित्य गायकवाड व अन्य तिघांविरुद्ध विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्याद व फिर्यादीच्या आईला भावाला मागील भांडणाची कुरापत काढून मारहाण केल्याचे तक्रारीत नमुद केले आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहेकॉ. दुरे हे करीत आहेत.

### पदग्रहण सोहळ्याचे आयोजन

**लातूर:** महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा लातूर जिल्हा कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवार, दि. २५ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता येशील महात्मा बसवेश्र्वर चौकातील कव्हा रोडवरील चन्नबसवेश्र्वर डी फार्मसी कॉलेजच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून आर्य वैश्य समाज उदगीरचे अध्यक्ष किशोर पंदीलवार, महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे महासचिव गोविंद बिडवई, महासभेचे सल्लागार समिती सदस्य एकनाथ मामडे, संघटन प्रमुख प्रदीप कोकलवार यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महासभेचे लातूर जिल्हाध्यक्ष गजानन पारसेवार , सचिव अतुल कोटलवार, कोषाध्यक्ष धनंजय कोत्तावार, कार्याध्यक्ष संतोष कोटलवार व कार्यकारीणी सदस्यांनी केले आहे.

### लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर:** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २० जानेवारी, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ०३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही.

## शिक्षकांची टीईटी परीक्षा रद्द करणारच : थोरात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** कोणत्याही परिस्थितीत शिक्षकांची पात्रता परीक्षा अर्थात टीईटी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय शासनाला घ्यायला लावू असे आश्र्वासन शिक्षक महामंडळाचे नेते संभाजीराव थोरात यांनी दिली. संच मान्यता शासन आदेशात दुरुस्ती तसेच राज्यातील कमी पटसंख्या असलेली एकही शाळा बंद करू दिली जाणार नाही,असेही त्यांनी बोलून दाखवले.

लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शिक्षक संघटनेचे राज्यस्तरीय नेते उपस्थित होते. संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी शिक्षकांच्या टीईटी परीक्षेच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आलेली आहे. ती परीक्षा रद्द करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, तसेच शिक्षकावरील अशैक्षणिक कामे रद्द करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्र्वासन दिले. शिक्षकांना जुनी पेन्शन योजना मिळवून देऊ, अशा शब्दांत बाळकृष्ण तांबारे यांनी शिक्षकांना आश्वासित केले.

यावेळी शिक्षक नेते बाळासाहेब झावरे, राष्ट्रीय अध्यक्ष आबासाहेब जगताप, राष्ट्रीय महासचिव जे.एम. मोरे, राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष बळवंत पाटील, राज्य सरचिटणीस कैलास दहातोंडे, राज्य कार्याध्यक्ष, किशन इदगे, राज्य कार्यकारी अध्यक्ष विलास चौगुले, राज्य कार्याध्यक्ष संतोष कदम, राज्य कोषाध्यक्ष अनिरुद्ध पवार, राज्य उपाध्यक्ष डी. बी. गुंडुरे, विभागीय अध्यक्ष आप्पाराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## २० वर्षांपूर्वीच्या चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस पोलिसांच्या विशेष पथकाकडून अटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, प्रलंबित गुन्ह्यांचा छडा लावणे तसेच न्यायप्रक्रियेला गती देणे या उद्देशाने लातूर पोलीस दल सातत्याने प्रभावी आणि काटेकोर कार्यवाही करीत आहे. याच धर्तीवर पोलिसांच्या विशेष पथकाने तब्बल २० वर्षांपूर्वीच्या चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस शोधून काढत त्याला अटक करून मोठे यश संपादन केले आहे.



आरोपी बाबु लक्ष्मण संकोळे, वय ४१ वर्षे, रा. बुधोडा, ता. औसा, जि. लातूर (सध्याचे वास्तव्य : याकतपूर रोड, औसा) हा कमालपूर - उजनी शिवारात उसतोडीचे काम करीत आहे. तो मागच्या वीस वर्षांपासून पोलिसांना सातत्याने गुंगारा देण्याचे काम करत असे. आरोपीचा ठावठिकाणा समजल्यानंतर विशेष पथकाने कमालपूर-उजनी भागात सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले.

लातूरच्या शाहूपुरी कॉलनीत राहणाऱ्या अरविंद विठ्ठलराव भोसले यांच्या घरासमोर लावलेल्या अम्बॅसॅडर कार क्रं . एमईक्यू - १५६१ मधून आरोपीने पॉईनर कंपनीचा सुमारे चार हजार रुपये किंमतीचा कार टेप चोरी केला होता. याप्रकरणी लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या गुन्ह्यात आरोपीला दि. १४ जुलै २००६ रोजी अटक करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर तो न्यायालयात वारंवार अनुपस्थित राहत होता. आरोपी गेली २० वर्षे सतत आपले वास्तव्य बदलून कायद्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत होता. त्याला न्यायालयाने दि. २७ जानेवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सदरची संपूर्ण कार्यवाही विशेष पथकातील सपोनि शिवशंकर मनाळे, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, योगेश गायकवाड, श्रीकांत कुंभार यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

## आरोग्यदायी कार्यसंस्कृतीकडे पाऊल; 'दयानंद वाणिज्य'मध्ये मोफत बॅडमिंटन उपक्रमाचा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला असून महाविद्यालयात मोफत बॅडमिंटन प्रशिक्षण व सराव सुविधा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.



या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी सांगितले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी सतत शैक्षणिक, प्रशासकीय व दैनंदिन कामांच्या तणावात कार्यरत असतात. अशा परिस्थितीत नियमित खेळ व व्यायाम अत्यंत आवश्यक असून बॅडमिंटनसारखा खेळ आरोग्य राखण्यासाठी उपयुक्त आहे. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. अशोक वाघमारे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांनी महाविद्यालयाच्या क्रीडागृहात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित सहभागासाठी प्रोत्साहित केले आहे. बॅडमिंटन खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक प्रसन्नता लाभते, तसेच परस्पर स्नेह व सहकार्याची भावना वाढीस लागते, असेही त्यांनी नमूद केले. उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, क्रीडा संचालक डॉ. अशोक वाघमारे यांच्यासह विविध विभागांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मोफत बॅडमिंटन उपक्रमाला कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा हा उपक्रम इतर शैक्षणिक संस्थांसाठी आदर्श ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी हालचाली सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** मागील तीन महिन्यांपासून महापालिका कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यात आले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याबाबत समाजमाध्यमात चर्चा होत असल्याने आस्थापना विभागाने कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठीची प्रक्रिया सुरू केली आहे. महापालिका निवडणुकीच्या कामात मनपा प्रशासन व्यस्त असल्याने तथा अन्य कारणाने अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या पगारी थकल्या होत्या. परंतु आस्थापना विभागानेहालचाल सुरु केल्याने येत्या दोन दिवसांत पगारी खात्यावर जमा होण्याची आशा कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.मागील तीन महिन्यांपासून लातूर महानगरपालिका अधिकारी- कर्मचाऱ्यांना पगारी मिळत नाहीत. यामागे मनपाची आर्थिक स्थितीहीकारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळेही आर्थिक कोंडीत असलेल्या महापालिकेने पगारी देण्यास टाळाटाळ केली आहे. परंतु, मागील एक महिन्यापूर्वी दमदार कर वसुली होऊनही अधिकारी-कर्मचाऱ्यांना पगारी देण्यात आल्या नाहीत.

# एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, अडसूळ यांचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपात जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २१ जानेवारी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांना प्रेरित होऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत सोमवार रोजी भारतीय जनता पार्टीत अनेकांनी जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष बन्सी भिसे, लालासाहेब पाटील, विजय काळे, सुनील पाटील, लक्ष्मीकांत घुटे, दत्ता सप्काळ, राम गाडे, अॅड. धनराज शिंदे, बालाजी गवळी यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती.



भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड हे संपूर्ण मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेऊन जात आहेत. त्यांच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. या निधीतून होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, माजी ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब रोडके, अमर इंगळे, तानाजी शिंदे, शत्रुघन गोरडे, संजय मोरे, प्रभावती इंगळे आणि बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भाजपा जाहीर प्रवेश केला.

भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या प्रत्येकांना सन्मानाची वागणूक दिली जाईल असे सांगून यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी असे आवाहन केले.